# सूरज गाताडे



# ‘अ प्योर् वन-दि एप्रिल चेज्!’

# अ प्योर वन- दि एप्रिल चेज!

# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अ प्योर वन- दि एप्रिल चेज!

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

अ प्योर वन- दि एप्रिल चेज!

सूरज काशिनाथ गाताडे

स्क्रिनरायटर्स असोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठवडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६११२

ई-मेल आयडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहेतसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ईसाहित्यप्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन :२५ मार्च २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

प्रस्तावना -



नमस्कार, मी सूरज काशिनाथ गाताडे. खरं तर प्रत्येक वेळी काय प्रस्तावना किंवा मनोगत लिहावं असा प्रश्न पडतो. त्यामुळे यामध्ये मी 'लांबड' लावणार नाही...

एवढंच सांगतो, की पहिल्यांदाच "अ प्योर् वन - दि एप्रिल चेज!" दीर्घ प्रेमकथा घेऊन आलो आहे. तरी, ही फक्त प्रेमकथा नाही हे कथा वाचून आपल्या लक्षात येईल. इतर प्रेमकथांसारखी यात रूपकं, उपमा, अलंकार, वर्णनं नाहीत. प्रेमी युगुलांचा मिठास संवाद देखील नाही. कारण या कथेतील पात्रांचा तो स्वभाव नाही. ती खूप प्रॅक्टिकल आहेत आणि त्याच दृष्टीने ते जीवनाकडे पाहतात. दुसरं कारण म्हणजे मला ही कथा रॉ ठेवायची होती. आणि (आता) खरं म्हणजे मला ते जमतही नाही...

ही कथा आपल्याला आवडेल अशी आशा आहे. पण मला स्वतःला एक्शन, सायकॉलॉजिकल, थ्रिलर प्रकार आवडत असल्याने ते यातही घुसडवण्याचा मी प्रयत्न केलाय त्याकडे सुजाण वाचक दुर्लक्ष करतील किंबहुना ते आवडून घेतील याची खात्री ठेऊनच मी हा प्रमाद केलाय. तरी यात मी इन्वेस्टीगेशनच्या डिटेलिंगला जास्त महत्त्व दिलं नाही. ते मी टाळलंय, कारण याकडे मी लव्हस्टोरी म्हणून पाहतोय. डिटेलिंग करत बसलो असतो, तर ते पुन्हा सस्पेन थ्रिलर वगैरे झालं असतं अशी मला भीती होती... तरी थोडाफार त्याचा झाला आहेच... शिरकाव होप गुणी वाचक समजून घेतील... आणि माझ्या या प्रयत्नांवर देखील तितकंच प्रेम करतील जितकं मागील प्रयत्नांवर केलं होतं...

वास्तविक ही कथा मी लिहिली आहे ती 2012 ला. त्यावेळी पासून यात खूप बदल झाले... कदाचित इथून पुढे देखील होतील, पण ही माझ्या हृदयाच्या अत्यंत जवळ असणारी कथा आता वाचकांच्या समोर यावी असं मनोमन वाटू लागलं म्हणून ही वाचकांना समर्पित करतोय... अडीच-तीन वर्षांपासून माझ्या कथांना मिळत असलेल्या प्रतिसादाने माझं मनोधैर्य वाढलं आहे... थोडा कॉन्फिडन्स आलाय म्हणूयात आणि म्हणूनच मी ही कथा घेऊन येण्याची हिंमत करतोय. रसिक जणांना देखील ही माझ्या इतकीच आवडेल अशी स्वतःला खात्री देऊन... हा शब्दसाठा तुमच्यासमोर ठेवतोय... गोड मानून घ्या... ही कथा लवकरात लवकर आपल्या समोर घेऊन

यायची गडबड होती. काही त्रुटी वा चूक असण्याची शक्यता आहे. आपण समजून घ्याल व सूचना कराल ही आशा...

कृपया कथा वाचून प्रतिक्रिया कळवाव्यात. काही चुका असतील तर त्याही सूचित कराव्यात ही विनंती... काय बोलायचं म्हणत बराच बोललो... असो...

कथेचा सारांश: हताश होऊन शिथिल बसून राहिल्याने व देव-देव केल्याने आपली दु:खं, समस्या दूर होत नाहीत, तर ती दूर होतात योग्य मार्गाने कर्म केल्याने! आणि हेच आपली कथा सांगते...

आपल्या कथेचा नायक कर्तव्यासाठी आपल्या प्रेमाचा त्याग करतो. पण शेवटी त्याचं कर्तव्यच त्याला त्याच प्रेम परत मिळवून देतं... जे आहे; निरिच्छ कर्म!

धन्यवाद!

सूरज काशिनाथ गाताडे.

पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

## सूरज काशिनाथ गाताडे यांची यापूर्वीची प्रकाशित पुस्तके (अनुक्रमे)

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजिकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf

६) अ हेवी प्राईझ् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf

७) डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/deadly_meeting_wagh_suraj_gatade.pdf

८) एजंट - X - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/agent_x_suraj_gatade.pdf


९) तूमाझासांगाती - (सायन्सफिक्शन)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/tu_majha_saangaati_suraj_gatade.pdf

१०) वृत्र (सायकॉलॉजिकल/एक्शन/मिस्ट्री/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vrutra_suraj_gatade.pdf


सूरज गाताडे
द पॅरासाईट


अ हेवी प्राईझ



सूरज गाताडे


सूरज गाताडे
दै
किस्स
बाय मिस्टेक



सूरज गाताडे
डेथ विल


सूरज गाताडे
वृत्र


सूरज गाताडे


सूरज गाताडे


सूरज
X


तू
माझा
सांगाती

# <u>"अ प्योर् वन - दि एप्रिल चेज्!"</u>

**(सायकॉलॉजिकल/एक्शन/थ्रिलर/सस्पेन्स/ड्रामा&लव्हस्टोरी)**

**(लेखक - सूरज काशिनाथ गाताडे)**

साहित्यप्रेमींना समर्पित

## ०.

जेलची अंधारी खोली... कोणाचा तरी जोरजोराने ओरडण्याचा आवाज जेलभर घुमत होता... छताला लटकलेल्या बल्बमुळे अंधुक प्रकाश त्या सेलमध्ये पसरला होता, पण त्याचा फारसा उपयोग नव्हता.

चिडलेला सूरज एका कैद्याला बेदम मारत होता... आणि याच कैद्याच्या आक्रोशी किंकाळया जेलच्या वातावरणात भरून गेल्या होत्या... त्या आवाजाने की काय कुणास ठाऊक सूरजचा सहकर्मी ऑफिसर ध्रुव पळत त्या सेलमध्ये आला... समोरचं दृश्य पाहून तो काही काळ स्तंभित झाला. रक्तबंबाळ कैदी मूर्च्छित होऊन खांबावर शरीर झोकून देऊन उभा होता... तरी सूरज त्याला मारायचे काही थांबला नव्हता...

"सूरज, तुला सरांनी बोलावलंय." ध्रुवने थोडं घाबरतच सीआयडी चीफचा संदेश सूरजला सुनांवला.

सूरजने चिडलेले भाव चेहऱ्यावर घेऊनच ध्रुवकडे पाहिलं व संदेश समजला याआर्थी मान डोलावली. ध्रुवला समोरील चित्र न पाहून मग त्याने लगेच तेथून काढता पाय घेतला. सूरजनं शेवटचंच पण एकच जोरदार त्या कैद्याला मारलं. आणि त्या अर्धगळीत कैद्याने जमीन पाहिली!

सीआयडी ब्युरो हेडकोर्टर्सची बिल्डिंग, पुणे... सीआयडी चीफ एडिशनल डिरेक्टर जनरल ऑफ पुलीस ' ऍरन गोम्स' ध्रुवला काही सूचना देत होते... ऍरन; अत्यंत हुशार माणूस, पण त्याच्या मनात आणि डोक्यात काय चालू आहे याचा थांग कोणाला लागणं दुरापास्त!

"महिनाभर ब्युरोची जबाबदारी तुझी राहील." चीफ ध्रुवला म्हणाला.

पण का? हे मात्र त्याने सांगितलं नाही. आणि याचं कारण आपल्या बॉसला विचारण्याचं कारण आणि धाडस ध्रुवकडेही नव्हतं. चीफने सोपवलेली जबाबदारी त्याने कर्तव्यदक्षपणे स्वीकारली.

"आणि वेळच्या वेळी मला रिपोर्ट झाला पाहिजे! गॉट इट?" चीफने ध्रुवला ताकीद केली.

"येस सर!" ध्रुव सल्युट करत म्हणाला आणि निघून गेला.

बाहेर - सूरज केबिनच्याच दिशेने येत होता. सूरजशी तो चिडलेला असताना बोलणं म्हणजे आगीत स्वत:ला नाहक झोकून देणं आहे हे माहीत असल्याने ध्रुव त्याला क्रॉस करून तसाच निघून गेला.

क्राईम इन्वेस्टीगेशन डिपार्टमेंट चीफ  ऍरन गोम्सच्या केबिनमध्ये सूरज प्रवेशला. चीफला सल्युट केलं.

त्याच्याकडे दुर्लक्ष करत सूरजला चीफ बोलला,

"ध्रुव म्हणाला, की तू त्या गुन्हेगाराला खूप मारलेस. त्या मामुली चोराला इतकं मारण्याची काही गरज नव्हती!"

"गुन्हा छोटा असो की मोठा, गुन्हा हा गुन्हाच असतो. या अशा लोकांना असंच वागवलं पाहिजे!" सूरज थोडं रागातच बोलला.

आत्ता याच्याशी वाद घालणं उपयोगी नाही हे लक्षात येऊन चीफने विषय टाळला.

"बरं. बस!" सूरजच्या उत्तरावर हसून चीफ त्याला म्हणाला. सूरजचं म्हणणं त्याला पटलं नव्हतं हे त्याच्या स्माईलवरून स्पष्ट दिसत होतं.

सूरज चीफ समोर बसला. चीफने एक रिपोर्ट फाईल सूरज समोर धरली आणि त्याला म्हणाला,

"तूझे हेल्थ चेकअप रिपोर्ट्स! टेक अ लूक."

सूरज ते हाती घेऊन पाहू लागला. दरम्यान... चीफ बोलतच होता,

"डॉक्टरचं म्हणणं आहे, की तू कोणत्या तरी मानसिक तणावाखाली आहेस."

हे ऐकून सूरजने वर त्याच्याकडे पाहिलं. पण डिफेन्ड केलं नाही. चीफ बोलत होता...

"मला वाटतं, तू थोडे दिवस सुट्टी घ्यावीस. तू दोन वर्षांपूर्वी जॉईन झालास. तेव्हापासून तू एकही सुट्टी घेतली नाहीस. अति कामानेही स्ट्रेस येऊ शकतो." सूरजच्या काळजीपोटी चीफ त्याला म्हणाला.

"पण सर, स्वतःपेक्षा काम महत्त्वाचं नाही का?" सूरज थोडं चिंतेनं आणि कळकळीनं म्हणाला.

"अरे पण काम करत असताना स्वास्थ्यच बरं नसेल; तर ते काम पूर्णत्वाला कसं जाणार? आय सजेस्ट यू, यू हॅव टू टेक सम रेस्ट!" चीफने सूरजला समजावण्याचा प्रयत्न केला.

"आय कान्ट सर! प्लिज..." उलट सूरजच चीफला समजावण्यासाठी विनंतीचा सुरात उद्गारला.

"इट्स माय ऑर्डर! मी तुझी सुट्टी स्वतःहून सॅन्क्शन केली आहे!" सूरज अगदीच ऐकत नाही हे पाहून थोडं रागावून चीफ त्याला ओरडला आणि लगेच आपला टोन बदलत तो मृदुपणे समजावण्याच्या सुरात बोलू लागला,

"हे बघ सूरज, तू जॉईन झाल्यापासून मी तुझं काम बघतोय. यू आर द मोस्ट एफिशिएन्ट ऑफिसर ऑफ आवर डिपार्टमेंट! म्हणून माझ्यासाठी तू फक्त एक ऑफिसर नाहीस; तर तू मला माझ्या मुलासारखा आहेस. मग मला तुझी काळजी नाही का वाटणार? सांग बरं?"

सूरजने खाली पाहत फक्त मान डोलवली. सूरज त्याचं म्हणणं मान्य करेल या विचाराने उत्साहित होऊन मग चीफ आनंदी होऊन पुढे बोलू लागला...

"आणि मला खात्री आहे; तू सुट्टीवरून फ्रेश होऊन आलास, की तुला काम करायला अजून मजा येईल."

आपलं काही चालणार नाही हे समजून चुकल्याने सूरजच काही बोलला नाही. गप्प बसणंच त्याने स्वीकारलं. पण सूरजकडून दुजोरा हवा असल्याने स्मित करत चीफने सूरजला विचारलं,

"काय बरोबर ना?"

तोंड न उघडता सूरजने मग कुठंतरी हरवल्यासारखं खाली पाहत फक्त मान डोलावली.

"ठिक आहे जा." चीफने त्याला निघण्यास सांगितलं.

सूरजने शुन्यात हरवून चीफला सल्युट केलं आणि केबिन सोडून निघून गेला...

संध्याकाळी, सूरजने ब्युरोच्या पार्किंग मधून गाडी काढली आणि तो आपल्या कॉटर्सकडे निघून गेला.

मन मारून त्याने आपली बॅग पॅक केली. बाजूला टेबलवर असलेली व तो वाचत असलेली ज्ञानेश्वरी हाती घ्यायलाही तो विसरला नाही. पण स्वतःचं बाकी काही न आवरता, न जेवता त्याने खोली बाहेरून लॉक करून घेतली.

कॉटर्सच्या पार्किंग लॉटमध्ये येऊन सूरजने बॅग डिक्कीत टाकली व ज्ञानेश्वरी पॅसेंजर सीटवर ठेवून दिली. आणि गाडीत बसला. सीटबेल्ट लावून घेऊन तो ड्राइव्ह करू लागला... तो लगेचच आपल्या गावाकडील वाटेला लागला देखील...

इकडे त्याच्या गावांत, एका गल्लीत स्ट्रीट लाईटच्या मंद प्रकाशात घामाळलेला एक माणूस जीवाच्या आकांताने पळत होता. थकलेला, स्वासोच्छवास दीर्घ झालेला व घाबरलेला तो खरंच

आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होता. पण त्याचं दुर्दैव हे की त्याचे पाय बंदुकीने सुटलेल्या गोळीपेक्षा वेगाने धावू शकत नव्हते... त्याच्या मागून चालणाऱ्या दुसऱ्या एका माणसाला हे माहीत होतं, की त्या जीव वाचवण्यासाठी पळणाऱ्या व्यक्तीने कितीही जोर लावला तरी तो त्याच्या बंदुकीच्या रेंजच्या बाहेर जाणार नाही. म्हणून तो त्या माणसाचा वेध घेण्यासाठी शांतपणे त्याच्या मागून चालत होता. पण पुढं वळण आलं. पळणाऱ्या माणसाला चांगली संधी मिळाली होती आपले प्राण वाचवण्यासाठी. पण त्याच्या मागावर असणाऱ्या व्यक्तीला त्याला ती संधी द्यावीशी नक्कीच वाटली नाही. तो आपल्या हातून सुटेल या आशंकेने त्याने मग मागून गोळी झाडली. पुढे पळणारा पहिला माणूस रस्त्यावर कोसळला. त्याचा जमिनीवर आपटण्याचा त्या रात्रीच्या शांततेत मोठा आवाज झाला! पण ऐकणारं तेथे कोणी नव्हतं! म्हणून हे खपून गेलं...

त्याचवेळी सूरजची कार रस्त्यावर सरावल्यासारखी धावत होती. एक तर तिला घरचा, गावाचा रस्ता माहीत असावा, नाही तर कोणालाच्या तरी अस्तित्वाची ओढ... की ही ओढ, ही आस त्या गाडीचं स्टेअरिंग ज्याच्या हाती होतं त्यालाच लागून राहिली होती...?!

असो, सूरजची मोबाईल रींग वाजली. कुठे तरी हरवलेला सूरज भानांवर आला. त्याने मोबाईलला कनेक्ट केलेल्या ब्लुटूथवरून कॉल रिसिव्ह केला.

"हा हॅलो साहेब! बोला!" तो ब्लुटूथवर म्हणाला.

पलिकडून कॉल केलेला माणूस चिंतेने काही तरी बोलला. गंभीर असलेला सूरज मग अधिकच गंभीर झाला. त्याला मिळालेली ही सुट्टी, पण यावेळेत त्याला विसावा नक्कीच मिळणार नव्हता हे तो समजून चुकला. पण त्याला देखील हेच तर हवं होतं. डोक्याला व हाताला काही

तरी काम. कारण जर ते मिळालं नाही, तर तो सैरभैर होणार हे नक्की असतं. त्याच्या मनाची ही चंचलता, विचलता याच्यावर अंकुश ठेवण्यासाठीच तर स्वतःला सतत कामात गुंतवून व्यग्र ठेवायचं असं त्यानं ठरवूनच टाकलं होतं... जी काही अनाठायी घटना घडली असेल, ती सूरजला सुखावून नाही; पण निदान समाधान देऊन नक्कीच गेली होती... ब्युरोकडून काही कामगिरी नाही, तर किमान त्याच्या गावी तरी काही तरी त्याची वाट पाहत होतं, ज्यात त्याला स्वतःला बुडवून टाकता आलं असतं... असं काय होतं जे त्याला विसरून जायचं होतं ते त्यालाच माहीत, की तोच ते विसरला आहे... पण मग त्याचा हा अट्टहास नेमका कशासाठी होता हे त्याला तरी माहीत होतं की नव्हतं...

कोणाला मनातलं काही सांगायचं नाही. आतल्या आत कुढत, जळत रहायचं ही त्याची जुनी खोड. कदाचित ही त्याच्या अंतर्मुखी स्वभावाची चूक असावी, की त्याला उघड लोकांशी बोलताच येत नाही. लोकांमध्ये स्वतःला सामावून घेता येत नाही... पण म्हणून तो माणूसघाण नक्कीच नाही. लोकांबद्दल त्याला प्रेम वाटतं, पण ते बोलून दाखवता येत नाही. म्हणून याच्या विषयी सर्वांनाच याच्याबद्दल नेहमी गैरसमज आणि त्यामुळे याच्या मनात इतरांबद्दल चीड आणि त्याहून अधिक भीती...

पलीकडचं ऐकून घेऊन हे इतकं महत्त्वाचं फोनवर नको, शिवाय गाडी चालवताना फोन चालू नको म्हणून त्याने पुढं चर्चा टाळली आणि...

"मी गावीच येतोय. भेटतो तुम्हाला. आता ड्रायव्हिंग करतोय. ठेवतो. गुड बाय!"

असं सांगून सूरजने ब्लुटूथ ऑफ केला. समोरील नेव्हिगेशन स्क्रिनवर चालू दिसणारा कॉल कट झाला.

हायवेवर धावणाऱ्या गाडीचा वेग वाढला होता...

सकाळी सात - आठच्या दरम्यान सूरज त्याच्या घरी पोहोचला. सूरज लगेजबॅग घेऊन आत आला, जे त्याच्या डाव्या खांद्यावर लटकलेलं होतं. त्याचे वडील न्यूज पेपर वाचत बसले होते. एक ८-९ वर्षांचा मोबाईलवर खेळत असणारा मुलगा, सूरजचा मावस भाऊ "दादा" म्हणून ओरडला आणि पळत जाऊन तो सूरजच्या अंगावर झेपावला. सूरजने स्मित करत त्याला झेललं. माहीत नाही कित्येक दिवसांत पहिल्यांदाच तो एवढं मनमोकळं हसला होता.

सूरजचं लगेज खांद्यावरून हातावर घसरलं. मग त्यानं ते जमिनीवरच सोडून दिलं. एवढी मोठी हालचाल शांत घरात जाणवल्यावर सूरजच्या वडीलांची पेपर वाचण्याची तंद्री भंगली. त्यांनी सूरजकडे पाहत पेपरची घडी केली.

"अरे असा अचानक?!" वडिलांनी आनंदाने पण आश्चर्याने विचारलं.

"हो. आलोय थोडे दिवस सुट्टी घेऊन. पण तुम्ही यावेळी घरात कसे?" सूरजने वडिलांना पदस्पर्श करून नमस्कार करत विचारलं.

वडिलांनी आशिर्वाद देण्यासाठी हात उंचावला.

"आत्ताच जॉगिंग करून आलोय. आज जरा लवकरच गेलो होतो. आता बसलोय पेपर वाचत. रिटायर्मेंटनंतर एका प्रोफेसरला काय काम असतं?" ते सूरजला हसत म्हणाले.

"होय." सूरज सुद्धा स्मित करत मुलाला मांडीवर घेऊन वडीलांजवळ बसला,

"आणि हा दंगेखोर कधी आलाय?" सूरजने त्या मुलाची मस्करी करण्यासाठी त्याला डिवचून विचारलं. मुलगा खिदळला.

"तुझी मावशी आणि सोनू पण आलेत." वडील स्मित करत म्हणाले.

इतक्यात सूरजची सोळा-सतरा वर्षांची मावस बहीण सोनू सूरजसाठी पाणी घेऊन आली. सूरजने तिच्याकडून ग्लास घेतला.

"कशी आहेस सोनू?" सूरजने स्मित करत सोनूला विचारलं. आणि त्याने पाणी प्राशन केलं.

"बरी आहे." एवढंच उत्तर देऊन ती सूरजच्या बाजूला उभी राहली.

"तुझा बॉस तुझ्यावर खूपच मेहरबान दिसतोय! कधीही सुट्टी देतो! आमच्यावेळी चार चार वेळा सुट्टीसाठी मागं लागायला लागायचं. तेव्हा कुठं एका दिवसाची सुट्टी मिळायची." सूरजची मस्करी करत वडिल त्याला म्हणाले.

"तसं काही नाही. त्यांना माझ्याविषयी आपुलकी वाटते इतकंच." सूरज हसत म्हणाला.

"मग?! माझा मुलगा आहेच कोणालाही आपलासा वाटावा असा!" आई पदराला हात पुसत किचनमधून बाहेर येत बोलली.

सूरजची मावशी नलिनी देखील आई मागून आली. सूरज त्यांच्याकडे गेला. दोघींच्या पाया पडला.

"बरं आई, जरा बाहेर जाऊन येतो." सूरज उभारत बोलला.

"आत्ताच तर आलास. आणि लगेच कुठं बाहेर?" आईने नाराज होत विचारलं,

"नाश्ता तर कर." ती सूरजला बोलली.

आणि तिने नलिनीला सांगितलं,

"जा गं नलू, उपमा झालाय का बघ!"

"हो बघते." म्हणत नलिनी किचनकडे वळली. पण सूरजने हाक मारून तिला थांबवलं,

"मावशी!"

नलिनीने त्याच्याकडे पाहिलं. सूरजने तिला 'असुदे' म्हणून सांगितलं. आणि तो आईला म्हणाला,

"आई खरंच नको. वाटेत खाणं झालंय. मी जरा विकास साहेबांना भेटून येतो. गावी येत असतानाच त्यांचा फोन आला होता. आवाजावरून काही तरी गंभीर असल्याचं जाणवलं. मी बघून येतो."

"म्हणजे सुट्टीत पण तू शांत बसणार नाहीस तर... एक तर वर्षभराने परत आलायस, तेही काम घेऊन..." आई जास्तच नाराज झाली.

"आई..." सूरज समजावण्याच्या सुरात आळवला.

"जावा! ऐकलंयत कधी तुम्ही आमचं?" आई अनिच्छेने त्याला बोलली.

"येणार माझ्यासोबत?" सूरजने मुलाला विचारलं.

मुलगा मान डोलवून सूरजकडे पळत आला.

"तू खाणार नाहीस. त्याला तर खाऊ दे!" आई रागावत सूरजला म्हणाली.

"नाही! मी जाणार दादा बरोबर! मी खाईन नंतर दादा बरोबरच!" न ऐकता त्या मुलाने हट्ट केला.

सूरज गुडघ्यावर बसला. त्यानं मुलाला धरलं आणि त्याला समजावत म्हणाला,

"हे बघ! ऐक. तू आत्ता नाश्ता कर सगळयांसोबत. आणि मी तुझ्यासाठी काय काय आणलंय ते बघून घे. तोपर्यंत मी माझं काम करून परत येतो. मग आपण क्रिकेट खेळायला जाऊ. चालेल?" सूरजने त्या लहान मुलाला समजावलं.

"बरं..." मग मुलगा नाखुषीनेच म्हणाला.

आणि त्या मुलाने ती जड बॅग आत ओढत नेली. त्याच्या या कृत्यावर सगळेच हसले.

"येतो."

सूरज उठून उभारला आणि निघून गेला.

विकासच्या 'अमृतकुंभ चहा'च्या ऑफिस बाहेर सूरजची गाडी येऊन थांबली. तो उतरून आत गेला.

सूरजने केबिनच्या बाहेरून दाराच्या काचेवर नॉक केले. सत्तेचाळीस वर्षीय विकासने दाराच्या दिशेने पाहिलं. काचेच्या दारातून बाहेर उभ्या असलेल्या सूरजला पाहून विकासच्या चेहऱ्यावर स्मित उमटतं. कसल्या तरी तणावातून मुक्त झाल्यासारखे भाव त्याच्या चेहऱ्यावर आले. त्याने त्याला आत येण्याची खूण केली. सूरज केबिनमध्ये प्रवेशला.

"अरे सूरज, लवकर आलास. बस. गावी काही काम होतं?" आनंदून विकास सूरजला खुर्ची ऑफर करत म्हणाला.

"नाही. आलोय सुट्टी घेऊन." सूरज समोर बसत स्माईल करत म्हणाला.

"अरे वा! म्हणजे मजा आहे म्हण तुझी!" विकास बोलला.

कदाचित मुद्द्याला हात घालण्यापूर्वी त्याला वातावरण हलकं करायचं असावं, पण त्याचक्षणी एक माणूस परवानगी शिवाय ताडकन आत घुसला. हा तोच होता, ज्याने काल एका माणसाला गोळी मारली होती.

"त्याची मजा आहे, पण तुमचं काय?" धमकीचा सुरात तो माणूस कठोरपणे विकासला बोलला.

सूरज व विकास यांनी त्या दिशेला पाहिलं.

"काय म्हणायचंय काय तुला शोएब?" सूरजने गोंधळून त्या इसमाला विचारलं.

शोएब विकासच्या डेस्कपाशी आला. त्याने मागील रात्री गोळी घातलेल्या माणसाचा फोटो डेस्कवर सूरज समोर फेकला.

"काल रात्री हा ड्रग सप्लायर सापडला. आणि तपासात तो मिस्टर विकास यांच्या गोडाऊनमध्ये काम करत असल्याचं समोर आलंय." तो चेहऱ्यावर रागाच्या छटा घेऊन बोलला.

तशी इकडे भीतीची छटा विकासच्या चेहऱ्यावर डोकावली. सूरजने आश्चर्याने विकासाकडे पाहिलं.

"सॉरी साहेब! मी आधीच तुम्हाला हे सांगायला हवं होतं..."विकास गोंधळून शोएबला बोलला.

"म्हणजे तुम्ही याचसाठी मला फोन केला होता..." सूरज आठवून विचारात असल्यासारखा बोलला.

"हो. म्हणजे... कालच्या घेटनेबद्दल मला काही माहीत नाही. पण... मला वाटतं; मला जे तुला सांगायचं होतं, ते याच्याशीच संबंधित आहे..." विकास अपराधीपणे चाचरत बोलला.

त्याने दीर्घ श्वास सोडला आणि सत्य सांगण्यासाठी त्याने स्वतःला तयार केलं,

"मी एका खूप मोठ्या संकटात सापडलोय सूरज! माझ्या गोडाऊन मधून ड्रग्सचा धंदा चालतोय. माझे कामगारच हा ट्रेड रन करताहेत. अरे; ते माझ्या चहाच्या पॅकेट्समधून आसपासच्या गावात ड्रग्स सप्लाय करत आहेत. मी पोलिसांकडं गेलो असतो, तर त्यांनी मला व माझ्या कुटुंबाला इजा करण्याची शक्यता होती, म्हणून..."

"म्हणून तुम्ही गप्प बसलात?! हे तुम्ही बरोबर नाही केलंत साहेब!" सूरज चिडून ओरडला.

सूरजच्या बोलण्याने विकासला अधिकच अपराधी वाटू लागलं...

"मला माहिती आहे सूरज, की हे योग्य नाही. पण भीती माणसाला सत्य विसरायला लावते रे..." तो म्हणाला.

"साहेब; निदान मला तरी सांगायचंत!" आता मात्र सूरज काळजीने विकासला बोलला.

"सॉरी! मलाही विश्वास आहे, की तू हे रोखू शकतोस. म्हणूनच खूप विचारांती मी तुला फोन केला. खरं सांगतो, माझा यात अजिबात हात नाही. पण कधी इन्क्वायरी झालीच, तर मी विनाकारण यात अडकेन असं मला वाटलं... पण मी असंच शांत बसलो, तर त्यांच्या वाईट कामात त्यांना साथ दिल्यासारखंच होईल. हे मला पटलंय. आणि म्हणूनच माझी अशी इच्छा आहे, की तू ही केस इल्लीगली हाताळावीस. प्लिज सूरज; नाही म्हणू नको..." विकासने विनंती केली.

"हे शक्य नाही..." शोएबने मध्येच बोलत व्यत्यय आणला.

सूरजने हाताने इशारा करून शोएबला गप्प केलं व काही वेळ विचार केला. मग काही तरी ठरवून मान डोलावली. त्याने शोएबकडे पाहिलं व म्हणाला,

"शोएब, डोन्ट मेक एनी रिपोर्ट. काही एक्शन पण घेऊ नको. फक्त या लोकांवर लक्ष ठेव."

"बट..." शोएबला हे पटलं नाही. तो विरोध दर्शवणार तोच सूरजने त्याला टोकलं,

"आय नो इट्स अगेंस्ट दि रुल्स. बट वी हॅव टू डू इट!"

सूरजने विकासकडे पाहिलं व आश्वस्त करत पुढे त्याला बोलला,

"डोन्ट वरी साहेब! आईल् हॅंडल इट पर्सनली. आता तुम्ही एक काम करा. सध्या बिझनेस लॉसमध्ये जातोय असं सांगून गोडाऊन व फॅक्टरीचं काम बंद ठेवा. तुम्हीही घरच्यांना घेऊन कुठंतरी गावी निघून जा. याने कामगारांना संशय येणार नाही आणि ड्रग सप्लायही बंद राहील. तसंही त्यांचा एक माणूस पकडला गेलाय म्हंटल्यावर ते काही काळ गप्पच बसतील. त्यामुळं आत्ता आपल्याला काही करता येणं शक्य नाहीच. पोलिसांची काही एक्शन नाही म्हंटल्यावर ते लोक निर्धास्त होतील. काही वेळाने गोडाऊन पुन्हा सुरू करू आणि त्यांना रेड-हॅन्डेड् पकडू!"

"ठिक आहे. असंच करूयात. तर... येतो मग मी." शोएब विचार करून अनिच्छेने बोलला.

"थांब मी पण येतो." सूरज शोएबला बोलला.

"येतो साहेब." म्हणत सूरजने विकासचा निरोप घेतला.

विकासने चिंतित मुद्रेने त्याला परवानगी दिली. सूरज व शोएबनी केबिन सोडली.

सूरज आणि शोएब त्याच्या नेहमीच्या रेस्टॉरंटमध्ये बसले होते. शोएब त्याच्या आवडीचा इराणी चहा घेत होता. सूरजला हे कधीच समजलं नाही की हा कडवट चहा पिण्यात लोकांना लाय मजा येते... सूरज काहीच न घेता  बसून होता फक्त. तो कुठे तरी हरवला होता...

"हा... कितने दिनों बाद! काम से फुरसत ही नहीं मिलती!" शोएब चहाचा सुगंध नाकात भरून घेत शोएब बोलला.

"हं!" सूरज उद्गारला.

"तुला आठवतंय? आपण शाळेत आणि कॉलेजमध्ये असताना रोज यायचो! इथंच पडीक असायचो सगळे मित्र." सूरजचं लक्ष नाही हे ध्यानात न येऊन शोएब बोलतच होता.

"हं!" सूरज पुन्हा एवढंच हुंकारला.

आता मात्र शोएबच्या लक्षात आलं, की सूरज तिथं नव्हताच. आणि तो नेमकं कुठे होता हे पण तो समजून चुकला होता.

"तू तिला भेटून का येत नाहीस?" शोएब वैतागून सूरजला म्हणाला.

तक्षणी सूरज भानांवर आला,

"हं? कोणाला?" गोंधळात सूरजने शोएबकडे पाहत विचारलं.

"तिलाच; जिचा तू आत्ता विचार करतोयस! तुला चांगलंच माहितेय मी कोणाबद्दल बोलतोय ते. तू तिच्यासाठी आला आहेस ना?! याच महिन्यात तिचा वाढदिवस आहे माहितेय मला. " शोएब गुश्शातच.

"हो. म्हणजे सुट्टी सरांनीच दिली असली, तरी गावी येणं हा माझाही निर्णय होताच. पण माझ्यात हिंमत नाही त्यांच्यासमोर जायची. मी खूप दुखावलंय त्यांना..." सूरज आता उघड बोलत खिन्नपणे म्हणाला.

त्याचं हे बोलणं शोएबसाठी समजायला अवघड आणि त्याहून त्रासदायक होतं,

"मग तू काम सोडून आलासच कशाला? तसंही माणसांपेक्षा तुझं कामच जास्त महत्त्वाचं आहे ना तुला..." शोएब त्रासिक बोलला.

"टोमणा कळाला... पण त्यांच्यासमोर जरी जावू शकत नसलो, तरी त्यांच्या अस्तित्वाची जाणीव तरी होत राहील याच विचारणे आलोय. शिवाय चीफनी स्वतः मला सुट्टी घेण्यासाठी भाग पाडलं. मी कामाचं खूपच प्रेशर घेतोय असं त्यांचं मत आहे." सूरज दुःखी अंतःकरणाने पण समंजस बोलत होता.

"अगदी बरोबर आहे त्यांचं म्हणणं. कामाचं जास्त प्रेशर घेतल्यानं प्रोब्लेम्स सॉल्व्ह होत नाहीत, तर ते अधिक गुंतागुंतीचे होतात. गंमत बघ; इथंही तुझ्या कर्तव्यानं तुला शांत बसू दिलं नाही..." क्षणात सगळा राग विसरून शोएब चहाचा घोट घेत स्मित करत सूरजला बोलला...

"असं तर नाही ना, की ती मुलगी तुला फक्त खेळवत होती...?" स्वर गहिरा करत शोएबने सूरजला शंका निर्माण करत विचारलं.

"त्या तशा नाहीत... तू त्यांना पाहिलंस तर तुझ्याही ते लक्षात येईल..." सूरज उदासीन बोलला.

सूरज त्याच्या खोलीकडे आला... घरी येण्याआधी तो त्याचे आराध्य 'स्वामी समर्थ' यांच्या मंदिरात जाऊन येण्यास विसरला नव्हता. सूरजला एकांत मिळावा म्हणून सूरजची खोली घराच्या आत न असता घराला जोडून बाहेर होती. म्हणजे घरी कोणी आलं, तर त्याला डिस्टर्ब होऊ नये.

सूरजच्या हातात कसलं तरी जाड पुस्तक. गाडीतच सुटलेली "ज्ञानेश्वरी" असेल कदाचित... समोर दारावर त्याच्या रूमच्या मेलबॉक्समध्ये एक लग्न पत्रिका खोवलेली सूरजला दिसली. ती त्याने घेतली. पत्रिकेवर नजर टाकली. एक दुर्दैवी स्मित त्याच्याही नकळत त्याच्या ओठांवर उमटलं. तो पत्रिका सोबत घेऊन आत खोलीत गेला.

संध्याकाळ झाली होती. सूरजने खोलीत आल्या आल्या लाईट्स ऑन केले आणि बेडकडे येऊन सूरजने पुस्तक बेडजवळच्या टेबलवर ठेवलं. सूरजने मग ते पत्रिकेचं इन्वेलोप उघडलं. लग्न पत्रिकेसोबत एक पत्र होतं. सूरजने ते पत्र वाचलं. तो जरा विचलित झाला. त्याने ते पत्र नंतर जसं होतं तसं पत्रिकेसोबत इन्वेलोपमध्येच ठेऊन दिलं व पत्रिका अलगद टेबलवर ठेवली. मग ते जाडजूड पुस्तक (सार्थ ज्ञानेश्वरी) घेऊन तो वाचू लागला... काहीवेळ वाचन करून त्याने ज्ञानेश्वरी देखील बाजूच्या टेबलवर पत्रिके शेजारीच ठेवली व बेडवर पडून राहिला. अगदी शांत डोळे मिटून...

## १. तारीख: एक एप्रिल -

सकाळचे साडेआठ - नऊ झाले होते. सूरज एका डेअरी मधून दुधाचं पॅकेट खरेदी करत होता. तो पैसे देणार इतक्यात त्याचा मोबाईल वाजला. त्याने कॉल रिसिव्ह केला. सूरजच्या हॅलोसाठी ही न थांबता पलिकडून शोएब गडबडीने बोलला...

"हॅलो सूरज एक इमर्जन्सी आहे! स्टँडसमोर एक बेवारस गाडी उभी आहे आणि त्यात एक टाईम बॉम्ब आहे. मी पोहोचतोय. लवकर ये!"

सूरज मग दुधाचं पॅकेट तिथंच सोडून गांवच्या मुख्य बस स्थानकाच्या दिशेने पळाला...

बस स्थानकानजिकच्या रिक्षा स्टँडजवळ एक पांढरी मारुती '800' व तिच्या बाजूला शोएब उभा त्याला दिसला. दूरवर शोएबची जीप उभी केली होती. सूरज धावत शोएबजवळ आला.

"काय झालं?" सूरजनं पृच्छा केली.

"अरे, मघाशी मला एका व्यक्तीचा फोन आला. त्यानं मला सांगितलं, की एका माणसानं ही गाडी इथं लावली आणि बसमध्ये बसून निघून गेला. तेव्हापासून ही गाडी अशीच इथं उभी आहे." शोएबने पिक्चर क्लिअर केलं.

प्रसंगाची गंभीरता लक्षात येताच सूरजने गाडीत वाकून पाहिलं. पॅसेंजर सीटवर त्याला बॉम्ब दिसला, ज्याच्यावरील वेळ सेकंदा-सेकंदाने कमी कमी होत चालली होती. आणि त्याच वेगाने काळ जवळ येत चालला होता...

"मग हे सगळे लोक अजून इथंच कसे?" सूरजने आत डोकावणारे त्याचे डोळे शोएबवर रोखत थोडं रागावूनच शोएबला विचारलं.

"कारण लोकांना याबद्दल अजून काहीच माहीत नाही." शोएब सहज बोलून गेला.

"काय यार शोएब, तू स्टँडवर उभा आहेस. एरिया खाली करण्यासाठी अनाऊन्स तरी करशील की नाही?" सूरजने झिटीने शोएबला झापलं.

"सॉरी यार. मेरी ध्यान में नहीं आया... पण अजून पंधरा मिनिटं आहेत आपल्याकडं." शोएब माफी मागत सूरजला म्हणाला.

"मग काय अजून पंधरा मिनिटं वाट बघायची आहे? कर्तव्यात असा निष्काळजीपणा करू नये शोएब!" सूरजने परत त्याला झापलं आणि घड्याळ पाहिलं,

"बरं ठिक आहे, अजूनही वेळ गेलेली नाही!" काही तरी ठरवून तो म्हणाला.

सूरज गाडीत बसला. सीटबेल्ट लावून घेतला. आणि त्याने गाडी चालू करून स्पीडने वळवली.

गाडी वेगाने धावू लागली... आणि शोएबने जाणाऱ्या गाडीकडे पाहत एक फोन कॉल केला...

"काम हो गया। सूरज को बॉम्बवाली गाड़ी में बिठा दिया गया है। आगे का तुम सम्भालो!" शोएब मोबाईलमध्ये बोलला.

सूरज गाडी चालवत होता. त्याने बॉम्बकडे एक नजरभर टाकली.

बॉम्बला हादरे लागत होतं. त्यामुळे तो सीटवरच उचंबळत होता... जणू कोणत्याही क्षणी तो फुटेल... बॉम्बमध्ये टाईम पडणं चालू होतं...

"7:03... 7:02...7:01..."

हादऱ्याने पॅसेंजर सीटवरील बॉम्ब हलत असल्याने सूरजने मग बॉम्बला सीटबेल्ट आवळला. चिंता त्याच्या चेहऱ्यावर सरळ दिसत होती. चेहऱ्यावर चिता आणि माथ्यावर घाम घेऊन तो पुढं पाहून लक्षपूर्वक गाडी चालवू लागला....

आठवडी बाजार असल्याने सकाळ असून रस्त्यावर खूप ट्रॅफिक होतं. गाड्यांनी रस्ता भरला होता. हे पाहून मग सूरजने वेग कमी न करता घाईने गाडी 180° मध्ये मागे फिरवली. त्याने कच्च्या रस्त्यावर गाडी घातली आणि वेग वाढवून मातीने भरलेल्या खडकाळ रस्त्यावरून मातीचे लोट उठवत  गाडी नेऊ लागला...

सूरज गाडी घेऊन निर्जन तलावपाशी आला आणि त्याने जोरानं ब्रेक लावला. गाडी थोडी पुढं घसटत जाऊन थांबली. मातीचा धुरळा उडाला... आणि तो सगळीकडे पसरला.

सूरजने बॉम्बकडे पाहतच स्टेअरिंगवर जोर देत स्वतःला सावरलं.

बॉम्बची टाईमलाईन झिरो झाली!

पण बॉम्ब एक्सप्लोड झाला नाही. त्या ऐवजी बॉम्बवर "एप्रिल फूल" हा मेसेज शो होऊ लागला. आणि एक चाईल्डिश मेकॅनिकल व्हॉइस बॉम्बमधून ऐकू येऊ लागला... तो सूरजला...

"एप्रिल फूल! एप्रिल फूल!..." असं  चिडवत होता...

आत्ता पर्यंत अत्यंत तणावात असणारा सूरज थोडा रिलॅक्स झाला. पण... पण...

क्षणात अनेको प्रश्नांनी त्याचं मन झाकोळून गेलं...

"अरे हा बॉम्ब तर फेक आहे! पण अशी जीव घेणी चेष्टा केली कोणी असेल?" सूरज शंकेने मनाशी म्हणाला.

पण त्याच्या प्रश्नांची उत्तरं त्याला लगेच मिळणार होती आणि ती देण्यासाठीच त्याला एक फोन आला. सूरजचा मोबाईल वाजला. त्याने खिशातून मोबाईल काढून पाहिला.

"प्रायव्हेट नंबर" होता...

तणावात असल्याने सूरजला गुदमरल्यासारखं होत होतं. गाडीचं दार उघडून बाहेर वळून बसत त्याने कॉल उचलला.

"हॅलो कोण?" सूरजने अंदाज घेत चाचपत विचारलं.

"हॅलो, मिस्टर सूरज क्षीरसागर!" फ़ज़ल पलिकडून बोलला.

"हॅलो कोण बोलतंय? आणि माझा नंबर कोठून मिळाला?" सूरजने गोंधळून विचारलं.

तिकडे जिममध्ये फ़ज़ल सँडबॅगवर बॉक्सिंग व किकिंग करत हँड्सफ्रीवर सूरजशी बोलत होता...

"ते फारसं महत्त्वाचं नाही! मला सांग कसं वाटलं एप्रिलफूल? आवडलं?" फ़ज़ल उद्दामपणे ब्लुटूथमध्ये बोलत सूरजला विचारलं.

"हिंमत असेल, तर समोर ये सांगतो!" सूरज रागाने धमकी देत ओरडला.

"हा हा! सुपरकॉप सूरज क्षीरसागर छोटे़से मजाक से डर गए!" फ़ज़ल उद्दामपणे हसत सूरजला चिडवण्यासाठी बोलला.

त्याच्या चिडवण्यामुळे सूरज जास्तच चिथावला गेला.

"कोण बोलतंय?" तो मोबाईलमध्ये ओरडला.

"रिमेम्बर 26th ऑफ एप्रिल? या वर्षी त्या गोष्टीला एक वर्ष पूर्ण होतंय..." फ़ज़लने त्याच्या ओरडण्याकडे लक्ष न देता सूरजला प्रश्न केला. तो पुढं म्हणाला,

"आणि या वर्षीची २६ एप्रिल ही तारीख तुझ्या आयुष्याची शेवटची तारीख असेल! हा त्याचाच ट्रेलर होता! तुझ्या हातात फक्त २५ दिवस आहेत. तो पर्यंत जमत असेल, तर मला शोधून काढ. युअर टाईम स्टार्ट्स नाऊ!"

फ़ज़लने असुरी हसत मग कॉल कट केला. सूरजची प्रतिक्रिया ऐकण्याची त्याला गरज वाटली नाही म्हणून त्याने तशी तसदीही घेतली नव्हती.

इकडे तलावाकडे गाडीत बसून असलेला सूरज गोंधळून मोबाईलमध्ये ओरडत होता...

"हॅलो, हॅलो... हॅलो!"

फोन कट झाल्याचं देखील भान त्याला राहीलं नव्हतं...

सूरज शॉक्ड् झाला होता. सूरजच्या हातून फोन खाली घसरला. त्याला अस्वस्थ वाटू लागलं... त्याच्या डोळ्यांसमोर अंधारी येऊ लागली... तो बेशुद्ध होऊ लागला... दुरून पोलीस जीप येत असल्याचं अंधुकसं त्याला दिसत होतं. पण नक्की कोण हे समजण्याआधीच त्याचे डोळे मिटले होते!

पोलीस जीप थांबली. जीप मधून शोएब उतरला. तो धावत सूरजकडे आला. पळत येत त्याने मदतीला येण्यासाठी ड्रायव्हिंग सीट वरील कॉन्स्टेबलला खूण केली. मग तो पण जीपमधून उतरून शोएब मागून त्याच्या दिशेने धावला. शोएबने कन्स्टेबलच्या मदतीने सूरजला त्याच्या जीपमध्ये टाकले. मग शोएबने सूरज घेऊन आलेली गाडी सोबत घेण्यासाठी कॉन्स्टेबलला ऑर्डर केली. त्यानुसार कॉन्स्टेबल खोटा बॉम्ब असलेल्या गाडीत जाऊन बसला. शोएबनेही पोलीस

जीपच्या स्टेअरिंगचा ताबा घेतला. आणि त्याने जीप पक्क्या रस्त्यावर घातली. कॉन्स्टेबलनेही फेक बॉम्बची गाडी त्याच्या मागून घेतली...

रात्री फ़ज़ल त्याच्या बेडरूममध्ये कोचवर बसून वाईन घेत होता. ग्लास असलेल्या हातातच सिगरेट देखील होती. तो बसलेल्या ठिकाणी त्याच्या डाव्या हाताला दोन किशोरवयीन मुलांचा फोटो टेबलवर होता. ज्यावर त्याची नजर खिळली होती... त्याचा एक वयस्कर प्रायव्हेट सेक्रेटरी जगदंब शिंदे आदरपूर्वक त्याच्या समोर उभा होता.

"सर आपल्या कंपनीचे स्टॉक्स दिवसेंदिवस लॉसमध्ये जात आहेत. लोकांचा आपल्या कंपनीवरून विश्वास उडत चाललाय. आपले शेअर होल्डर्सही पेशन्स न ठेवता एका मागून एक सर्वच जण आपापले शेअर्स विकत चालले आहेत. इट्स व्हेरी हॉरीबल थिंग टू आवर् बिझनेस सर! कामगार नसल्यानं साखर कारखाना पण बंद पडलाय. मंदी तर आहेच, पण... सॉरी टू से सर; आणि हे सगळं तुम्ही कारखान्याकडे दुर्लक्ष केल्यानं होत आहे..." अत्यंत कळकळीने शिंदे फ़ज़लला समजावत होता.

"आय एम रियलायजिंग युअर कन्सर्न्, पण बुडालेली कंपनी पुन्हा उभी केली जाऊ शकते शिंदे, पण एकदा का माणूस आपल्या आयुष्यात हरला; तर त्याला पुन्हा उभा राहणं कठीण आहे...!" फ़ज़ल गंभीरपणे शिंदेंना बोलला.

"पण सर..." शिंदे अत्यंत काळजीने काही बोलणार तोच फ़ज़लने त्यांना टोकलं,

"जा शिंदे! मला तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. मला अब्बांसारखेच तुम्ही. इतकी वर्षे अब्बांसोबत पण तुम्ही काम केलंत. तुम्ही नाही कंपनी लॉसमध्ये जाऊ देणार. खात्री आहे मला. अजून काही दिवस; मग मी स्वतः लक्ष घालीन बिझनेसमध्ये. काही गोष्टी आहेत ज्या सॉर्ट आऊट करायच्या आहेत. ते जर केलं नाही, तर मनांवरचं ओझं नाही उतरायचं..."

"एज युअर विश सर!" असं निराशेने म्हणूनच शिंदे फ़ज़लच्या रूममधून निघून गेले. फ़ज़लने मग अंतर्मुख होत लहान मुलं असलेली ती फोटो फ्रेम हातात घेतली.

आणि तो भूतकाळात हरवून गेला...

कडाक्याचा उन्हाळा होता. सूर्य आग ओकत होता, पण याची सूद नसलेली मुलं खुल्या मैदानात क्रिकेटची मॅच खेळत होते. गांवांतर्गत त्या मुलांनी आपापसातच एक टुर्नामेंट भरवली होती. आणि यांतील एका टीममध्ये त्या फोटोत असलेले बारा-तेरा वर्षीय किशोरवयीन फ़ज़ल आणि सूरज त्यांच्या काही मित्रांसोबत क्रिकेट खेळत होते. सूरज फिल्डिंग करत होता. आणि फ़ज़ल विरुद्ध टीमच्या बॅट्समनसाठी बॉलिंग करत होता. त्याने टाकलेला बॉल खूप फास्ट होता. इतका, की बॉल बॅटिंग करणाऱ्या मुलाला जोरात लागला आणि तो जखमी झाला. त्याच्या टीममधील दुसरा मुलगा रागाने फ़ज़लकडे आला. त्याने फ़ज़लला धक्काबुक्की सुरू केली. फ़ज़ल खाली पडला... सगळेच तिथं जमा झाले. सूरजही पिळत तिथं आला. फ़ज़लला ढकलणाऱ्या मुलाला सूरजनं रागानं मागं खेचलं...

"सोड त्याला! खेळ आहे हा. खेळात असं व्हायचंच." सूरज फ़ज़लला पाडणाऱ्या त्या मुलाला ओरडला.

"तुम्ही पण मग खेळ खेळा सारखाच खेळा ना! सुहास चांगला खेळत होता. तुम्ही हराल या भीतीने यानं त्याला जखमी केलंय. आम्हाला काय कळत नाही होय हा तुमचा प्लॅन आहे ते?" तो मुलगा रागाने उलट बोलला.

आणि त्याने खाली पडलेल्या फ़ज़लला जोरदार लाथ मारली. हे पाहून सूरजला राग अनांवर झाला. त्याने पुन्हा त्या मुलाला बाजूला खेचलं.

"पुन्हा जर माझ्या भावाला मारलास, तर...!" रागाने लालबुंद होत सूरज पुन्हा मुलावर ओरडला.

सूरजचं वाक्य पूर्ण होण्याआधीच त्याला ऐकून त्या मुलाने फ़ज़लला पुन्हा लाथाडलं. यामुळं सूरजला वेड्यासारखं झालं. त्याने त्या मुलासह सूरजला अडवायला आलेल्या त्या मुलाच्या सर्व टीमला रक्तबंबाळ होईपर्यंत मारलं...

ही घटना आठवत फ़ज़ल त्या फोटोफ्रेम मधील सूरजकडे पाहत होता. फ़ज़लचे प्रतिबिंब फोटोच्या काचेवर पडलं होतं. त्याची आत्ताची छबी आणि काही वर्षांपूर्वीचा फोटोतील तो ही प्रतिबिंबं एकरूप झाली होती, इतकी की मधली सगळी वर्षं फ़ज़लसाठी गायब झाली होती. या आठवणींनी त्याच्या डोळयांच्या कडा पाणावल्या. आणि अश्रूंनी आपली जागा सोडून ते फ़ज़लच्या परवानगीशिवाय त्याच्या गालावर घरंगळले आणि फ्रेमवर ठिबकले. पण तो फोटो पाहत असताना त्याच्या चेहऱ्यावर स्मित हास्य उमटलं होतं. तेही त्याच्या नकळतच.

त्याच्या हातातील सिगरेट तशीच जळत संपत होती. त्या अर्धवट जळलेल्या सिगरेटची राख फोटोतील सूरजच्या चेहऱ्यावर पडली. सिगरेट बोटापर्यंत जळल्याने त्याच्या बोटाला चटका बसला आणि फ़ज़ल भानांवर आला. आणि चेहऱ्यावरील आलेले करूण भाव त्याने जाणीवपूर्वक बदलून क्रूर केले...

"यू ऑलव्हेज हॅड बिन प्रोटेक्टींग मी. भाई कहाँ करता था तू मुझे! पण साल्या तुच एक दिवस माझ्यावर हात उचललास! आपण मित्र असून...! तू विसरला असशील सगळं; पण मी नाही! अँड आय प्रॉमिस! मी तुला हे विसरू पण देणार नाही!" तो कठोरपणे म्हणाला.

आणि त्याने उरलेल्या सिगरेटचा झुरका घेतला. फ़ज़लने फ्रेमवरील राख फुंकली. सिगरेटचा धूर त्याच्या तोंडातून व नाकातून बाहेर पडला. राखेचे कणही हवेत उडाले व सर्वत्र ठिणगीसह पसरले आणि त्या धुरात फ़ज़लचा चेहरा दिसेनासा झाला. उरलेलं थोटूक फ़ज़लने जमिनीवर त्यागून दिलं...

२.

तीव्र स्पॉट लाईटमध्ये, सूरजच्या चार मित्रांनी त्याला जखडून ठेवलं होतं. सूरज जीवाच्या आकांताने सुटण्याचा प्रयत्न करत होता. समोर उभ्या फ़ज़लच्या हाती धारदार चाकू होता. आणि तो अतीव रागाने सूरजकडे पाहत होता. त्यांच्यापासून काही दूर अनुज्ञा त्यांच्यासमोर मंद प्रकाशात उभी होती. तिचा चेहरा गडद अंधारात लपला होता. फ़ज़ल सूरजच्या मागे आला आणि त्याच्या पाठीत त्याने तो धारदार चाकू खुपसला. सूरज वेदनेने विव्हळला. आणि तो गुडघ्यांवर कोसळला. त्याच्या डोळयांतून अश्रू ओघळू लागले. त्याला दुःख त्या झालेल्या या जखमेचं नव्हतंच. त्याला दुःख होतं; ते त्याच्या वेदनांकडं दुर्लक्ष करणाऱ्या अनुज्ञाच्या वागण्याचं... तो आशेने अनुज्ञाकडं पाहत होता. पण अनुज्ञा तिला काही फरकच न पडल्यासारखी मागे फिरली आणि ती गडद अंधारात चालत जाऊन सूरजला दिसेनाशी झाली... आपली शेवटची आशा संपलेल्या सूरजने मग आस सोडली आणि त्यासोबत जमिनीवर आपले शरीरसुद्धा...!

सूरज बेडवर बेशुद्ध पडून होता.

"अनु!!!" सूरज जोरात ओरडून उठला!

घाबरलेला तो अचानक ओरडत उठून बसला. घाम सर्व चेहऱ्यावरून ओघळत होता. शरीरही घामाने निथंबळे होते. त्याच्या स्वासोच्छ्वासाला गती प्राप्त झाली होती. काहीवेळाने...

ते एक दु:स्वप्न होतं हे सूरजच्या लक्षात आलं. मग त्याने एक दीर्घ श्वास घेतला आणि भिंतीचा आधार घेत तो हळूहळू बाथरूममध्ये शिरला.

बाथरूममध्ये - सूरज जोरजोरात स्वासोच्छवास करत आरशासमोर उभा होता. त्याने अधीरतेनं तोंडावर पाणी मारून घेतलं. खाली पाहत थोडावेळ तसाच थांबला. दीर्घ श्वास चालूच होता. त्याने आरशात स्वतःकडे पाहिलं... ते तिरस्कारानं! त्याला आवरण्या पलिकडे स्वतःची चीड आली. म्हणून मूठ आवळून त्याने बाथरूमच्या मोठ्या आरशावर त्या मुठीने जोरात प्रहार केला. काच तडकली. भिंतीवर जोरदार झालेल्या आघाताने लाईटची वायर कनेक्शन्स लुज झाली. आणि बल्ब खाली येऊन लटकू लागला, इकडे तिकडे हेलकावे खाऊ लागला. आरसाही फुटला होता. आणि सूरज स्वतःसाठी राग चेहऱ्यावर घेऊन त्या विस्कळीत काचेत स्वतःला पाहत होता. वरील हेलकावे खाणारा बल्ब कधी मंद तर कधी प्रकाशमान होत होता. त्यामुळे जसा बल्ब इकडे तिकडे हलेल तसा सूरजचा अर्धा चेहरा अंधारात, तर अर्धा प्रकाशात असं होतं होतं... हे योगायोगाने पण संयुक्तिक होतं, की यातून त्याच्या मनाची होत असणारी द्विधा मन:स्थिती त्याची त्यालाच स्पष्ट होत होती...

जिम्नॅशियम मध्ये फ़ज़ल क्रूरपणे काही लोकांना मारत होता... बऱ्याच वेळानंतर त्याचा एक एम्प्लॉई तेथे आला.

"सर तुम्हाला भेटायला ऍरन गोम्स म्हणून कोणी तरी आलेत. तुम्हाला तातडीनं भेटायचं म्हणतायत." एम्प्लॉई फ़ज़लला म्हणाला.

फ़ज़लने फाईट थांबवली. काहीवेळ विचार करून तो बोलला...

"स्टडीमध्ये बसव त्यांना. काही हवं नको बघ. आलोच."

एम्प्लॉई "हो" म्हणून निघून गेला. घामाने निंथबलेल्या फ़ज़लने प्रोटीन ड्रिंकची बाटली तोंडाला लावली.

स्टडीरूममध्ये - चीफ चहा घेत बसला होता. कसलं तरी पुस्तक चाळत होता. फ़ज़ल त्याच्या समोर आला.

"काम झालंय. सूरजला वॉर्निंग दिली आहे." फ़ज़ल चीफला म्हणाला.

"व्हेरी गुड!" चीफने त्याच्याकडे न पाहता पुस्तक चाळतच एप्रिशिएट केलं.

"पण एक शंका आहे..." फ़ज़ल संकोचून म्हणाला.

चीफने पुस्तकात पाहत खूणेनेच त्याला बोलण्याची परवानगी दिली.

"आपल्याला जे काम करायचंय, ते २५ - २६ तारखेलाच केलं असतं तर...? म्हणजे आपला प्लॅन यशस्वी करण्यासाठी हा २५ दिवसांचा गॅप कशासाठी...?" फ़ज़ल पुढे बोलला.

चीफने फ़ज़लकडे पाहिलं. म्हणाला,

"बरोबर आहे तुझं. पण हा गॅप एव्हढ्याचसाठी, की या पंचवीस दिवसांत तो २६ एप्रिल ही तारीख व या तारखेशी संबंधित घटना आठवून अस्वस्थ होत राहील. आणि त्यामुळे तो आपल्याला अपेक्षित असंच वागेल. कळालं?"

"हो सर." फ़ज़ल.

"आणि हो; ठरवल्याप्रमाणे सगळं व्हायला हवं. कोणतीही चूक होता कामा नये! ये!"

फ़ज़ल होकारार्थी मान हलवून जाण्यास वळला. चीफने त्याला पुन्हा हाक मारली,

"फ़ज़ल; प्लॅन जरी तुझा असला, तरी इग्झेक्युशन माझं असेल; डील झालंय आपल्यात. सो नो मोअर क्वेश्चन्स फर्दर! अंडरस्टँड?" चीफने बजावलं.

"सर्टन्ली!" फ़ज़ल मागे चीफकडे मान वळवत म्हणाला.

"नाऊ लिव्ह! चहा थोडा राहिलाय. संपवून निघतो." चीफने त्याला जाण्याची ऑर्डर दिली.

चीफच्या ऑर्डरवरून फ़ज़लने त्याचीच असलेली स्टडीरूम सोडली... चीफने मग एका घोटात चहा संपवला.

फ़ज़ल जिममध्ये परतला. त्याने त्याच्या एका साथीदाराला पुढे येण्याची खूण केली. साथीदाराने पुढे होऊन सँडबॅग पकडली. फ़ज़लने सँडबॅगवर एका मागून एक किक्स केले. आपला सगळा राग तो त्या सँडबॅगवर काढत होता. शेवटी एक फोर्सफुल पंच त्याने सँडबॅगवर थ्रो केला. त्या फोर्सने साथीदार सँडबॅगसह काही इंच वर उचलला गेला. आणि गुडघ्यांवर आदळून सँडबॅगसोबतच पुन्हा फ़ज़लच्या दिशेने गुडघ्यांवर घसटत काही इंच पुढे आला. त्याला तिथंच सोडून मग फ़ज़ल इतर साथीदारांकडे जाऊन त्याच्याशी पुन्हा फाईट करू लागला...

यावेळी दुसरीकडे सूरज विकासच्या घरी विकास सोबत बसला होता...

"तू सांगितल्याप्रमाणं मी घरातल्यांना गोव्याला पाठवलंय." विकासने सूरजला सांगितलं.

"मग तुम्ही मागं का थांबलात?" सूरजने काळजीने त्याला विचारलं.

"तुला संकटात सोडून मी कसा जाऊ? शिवाय काम माझंच आहे!" विकासने त्याची काळजी बोलून दाखवली.

"ठिक आहे. साहेब; असा कोणी तुमचा कामगार आहे का, की ज्याच्यावर तुमचा विश्वास आहे? आणि तोही गोडाऊनमध्ये कामाला आहे?" सूरजने विचारलं.

"नाही. आता गोडाऊन मधल्या कोणत्याच कामगारावर माझा विश्वास उरला नाही." विकास नाराजीने म्हणाला.

सूरजने टेबलावर नजर रोखत निराशेने मान डोलावली. अचानकच त्याचा मोबाईल वाजला.

"एक्स्क्यूज मी..." असं विकासला म्हणत सूरजने मोबाईलकडे न पाहताच कॉल घेतला.

"हॅलो?" सूरज मोबाईलमध्ये बोलला.

"हॅलो सूरज, ऍरन बोलतोय!" पलिकडून चीफ.

"बोला ना सर, काही काम होतं?" सूरजने चिंतेने चीफला विचारलं.

"काही विशेष नाही रे. सहज फोन केला होता. म्हंटलं बघावं काय करतोय आमचा वाघ. बोल कशी चाललीये सुट्टी?" चीफनी विचारलं.

"मजेत सर. तुमची तब्येत कशी आहे?" सूरज स्माईल करत म्हणाला.

"ठिक आहे. पण लक्षात आहे ना? २६ एप्रिलला तुझी सुट्टी संपते आहे. २७ तारखेला तू कामावर रुजू झाला पाहिजेस." चीफनी सूरजला आठवण करून दिली.

हे ऐकून सूरजला पुन्हा अस्वस्थ वाटू लागलं.

"हा... हो... होय सर..." सूरज अस्वस्थपणे उद्गारला.

आणि त्याने नकळत हळूहळू मोबाईल खाली घेतला. डोळे ओले झाले. त्याने न पाहता फोन कट केला.

तिकडे फ़ज़लच्या स्टडीरूममध्ये बसून असलेला चीफ मोबाईलकडे पाहत स्वतःशी बोलला,

"सूरज, तू आता फक्त पाहत रहा, कसं तुझं आयुष्यच बदलून टाकतो मी ते!" आणि तो मोठयाने हसला.

इकडे चीफच्या कॉलने सूरजला अस्वस्थ वाटू लागलं. विकासच्या हे लक्षात आलं.

"सूरज... सूरज! ठिक आहेस ना?" विकासने काळजीने विचारलं.

"हो... हो... मी ठिकाय... ठिकाय मी..." सूरज अस्वस्थपणे पुटपुटला.

"नाही, मला तू ठिक वाटत नाहीस. चल आपण डॉक्टरकडं जाऊ." विकासने सूरजला सल्ला दिला.

पण सूरज ऐकायला तयार नव्हता.

"न... नाही नको. जरा आराम केला, की वाटेल बरं..." तो एवढंच म्हणाला.

आणि त्याने जाण्यासाठी उभारण्याचा प्रयत्न केला, पण तोल जाऊन पुन्हा खुर्चीत पडला. विकास काळजीने घाईत उठला व सूरजला आधार देण्यासाठी पुढं झाला.

"नको काय? तुझी अवस्था बघ!" विकास काळजीने, पण कठोर अधिकारवादी आवाजात सूरजला ओरडला.

"नको...! मी जाऊन आराम करतो थोडावेळ..." सूरजने हट्ट काही सोडला नाही.

"बरं ठिकाय. माझ्या खोलीत आराम कर. बरं वाटलं की जा. ओके?" विकास हतबल होत म्हणाला.

सूरज मानेने हो म्हणून उठला. विकासने त्याला आधार देऊन स्वतःच्या खोलीच्या दिशेने नेलं...

विकासची बेडरूम - विकासने सूरजला बेडपाशी आणलं. सूरज बेडवर पडला. विकास त्याला नीट झोप घेण्यास सांगून त्याला व्यवस्थित आराम करण्याविषयी ताकीद देऊन दार लावून निघून गेला...

दुपारचे 4:30 झाले. सूरजला जाग आली. तो विकासच्या घरी आहे हे समजायला त्याला थोडा वेळ लागला. नीट भानांवर आल्यावर तो बाथरूममध्ये गेला. बेसिनकडे जाऊन त्याने तोंड धूतले.

"सूरज! सूरज!" विकास बाहेरून ओरडला.

"हा आलो!" सूरजने हाकेला प्रतिसाद दिला व घाईने बाहेर पळाला.

"उठलास? तुला जाग आली का बघावं म्हंटलं. कुठे दिसला नाही म्हणून काळजीने हाक मारली." कसं वाटतंय आता?" विकास अजूनही काळजीतच होता.

समोर विकासला सुखरूप पाहून तो स्थिर झाला. विकासने कपाटातून सूरजला टॉवेल देऊ केला.

"थोडं बरंय..." सूरज त्याला चिंतामुक्त करण्यासाठी आपले तोंड पुसत म्हणाला.

"सूरज. एक विचारू?" विकासने परवानगी मागत विचारलं.

"हं." सूरजने संमती दिली.

"काही प्रॉब्लेम आहे का? नाही म्हणजे काही असेल, तर तू हे काम ड्रॉप करू शकतोस. डिव्हिजन इंचार्ज तुझ्या सांगण्यावरून मला मदत करतीलच..." विकासने कन्सर्न् दाखवत विचारलं.

"नाही तसं काही नाही. थोडा स्ट्रेस आहे. पण काही मेजर इशू नाही. तुम्ही काही काळजी करू नका. मी सांगेपर्यंत चहा पावडरचा सप्लाय तेवढा बंद ठेवा. येऊ मी?" सूरजने विषय टाळला.

"बरं ये. का सोडू तुला?" विकासने विचारलं.

"नाही नको. जाईन मी. गाडी घेऊन आलोय." सूरज म्हणाला.

"ठिक आहे जा." विकासने त्याला एकट्याला जाण्यास परवानगी दिली.

सूरजने खोली सोडली. विकास चिंतेने काहीवेळ  जाणाऱ्या सूरजकडे पाहून तोही त्याच्या मागून गेला.

सूरजची गाडी श्री स्वामी समर्थ मंदिराबाहेर थांबली. तो गाडीतून उतरून मंदिराच्या दिशेने चालू लागला... मंदिराजवळ पोहोचल्यावर अचानक त्याचा तोल गेला. त्याने गेटला धरून स्वतःला सावरलं आणि आत गेला.

मंदिरात - सूरज प्रवेशद्वारापाशी आला. दाराला धरून तो खिन्न भावनेने श्री स्वामी समर्थांच्या मूर्तीकडे पाहत काही काळ तसाच उभारला. त्याचे डोळे पाण्याने भरले होते. ते अश्रू गालांवर ओघळले. तसा तो आत प्रवेशला.

गर्भगृहाजवळ - पुन्हा अचानक तोल जाऊन सूरज गुडघ्यांवर आला. डोळे मिटून रडू लागला. त्याचा विलाप तर त्याच्या आत धगधगत, आक्रंदत होता; पण तो त्याच्या मुखावाटे बाहेर पडत नव्हता. बाहेर पडत होते ते फक्त अश्रू... त्याच्या त्या अनुच्चारीत शब्दांची साक्ष देत...

तो अतिशय गहिवरला होता.

तक्षणी मस्जिद मध्ये - फ़ज़ल व शोएब इतर बाधवांसह नमाज अदा करत आहेत. त्या रांगेत दोघे पुढे बसले होते...

रात्रीच्यावेळी सूरज व शोएब गांवच्या बाहेरील तलावाजवळ भेटले. शिकत असताना सगळे मित्र मिळून निर्जन असलेल्या या निसर्गाच्या कुशीत अभ्यासाला, तर उन्हाळयात रात्री झोपायला सुद्धा यायचे. पण आज दोघांचेही तलावाच्या शांत पाण्याकडे, थंडगार वाहणाऱ्या वाऱ्याकडे, सळसळणाऱ्या झाडांच्या पानांकडे, चौफेर भिरभिरणाऱ्या रातकिड्यांकडे; अगदी कशाकडेच लक्ष नव्हते. आज दोघे इथं निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी जमलेच नव्हते. सूरजला वाटणारी अस्वस्थता या ठिकाणी येऊन तरी कमी होईल हा त्यामागचा समज होता, जो खोटा ठरला होता... तसं काहीच झालं नव्हतं...

सूरज गाडीच्या हूडवर बसला होता. शोएब त्याच्या बाजूला उभा होता.

"चल यार होता है। अरे सुखं-दुःखं तर यायचीच. आणि एक लक्षात घे, समुद्रातही ओहोटीनंतर भरती ही येतेच. तू काही काळजी करू नको; सगळं काही ठिक होईल." शोएब सूरजच्या मांडीवर थोपटत म्हणाला.

"हो; पण भरतीनंतर ओहोटी आली, तर बरं ना...?" सूरज असहाय्यपणे डोळयांत आसवं घेऊन निराशेने म्हणाला.

आणि तो डोके गुडघ्यांमध्ये घेऊन हमसून रडू लागला. काही करणे शक्य नाही हे लक्षात घेऊन शोएबने मग सांत्वना देण्यासाठी सूरजच्या डोक्यावर हात ठेवला फक्त...

## ३. तारीख: तीन एप्रिल -

सूरजची रूम अंधुक प्रकाशमान होती. अंधार त्याचा जणू सोबतीच बनला होता... निलेश, सावधपणे दार उघडून आत आला आणि हळूवार दार लावून घेतलं. सूरज बेडवर झोपला होता. निलेशने त्याची बॅग काढून टेबलवर ठेवली आणि काही तरी शोधण्यास सुरू केलं... त्याने सूरजचा लॅपटॉप, मोबाईल तपासला. पण त्याला जे काही हवंय, ते सापडलं मात्र नाही. लॅपटॉप बॅग, सूरजची लगेजबॅग, टेबल ड्रॉव्हर्स, इ. देखील तपासलं. हवं ते काही मिळत नव्हतं. इकडे-तिकडे शोधाशोध करून मग निलेशने कपाट उघडलं. थोडा आवाज झाला. त्या आवाजाने सूरजची निद्रा भंग झाली.

"कोण आहे?" सूरजने त्रासिकपणे बंद डोळयांनीच विचारलं.

निलेश जरा घाबरला आणि कपाट झटकन बंद केलं. त्याने खिडकीकडे जाऊन पडदे उघडले. सूरजचे डोळे दिपल्यासारखे झाले. प्रकाशापासून डोळे सांभाळण्यासाठी सूरजने डोळयांसमोर हात घेतला व डोळयांना प्रकाशाची सवय होईपर्यंत तसाच ठेवून मग खाली घेतला.

"दादा मी आहे, निलेश. उठ. किती वेळ झोपतोस? लोक आलेले पण तुला कळत नाही. एका ऑफिसरला इतकी गाढ झोप बरी नाही." निलेश सूरजकडे वळत बोलला.

"सुट्टीवर आहे म्हणून." सूरज उठून मागे सरकत भिंतीलगद बसत म्हणाला.

निलेश त्याच्यासमोर खुर्चीत बसला.

"तू गावी आल्याचं कळालं, म्हणून भेटायला आलो." निलेश त्याला म्हणाला.

"स्वप्निल नाही आला?" सूरजने विचारलं.

"नाही. त्याची ट्रान्स्फर झालीये." निलेशने उत्तर दिलं.

सूरजने मान हलवली. निलेश गंभीर झाला. तो पुढं बोलला...

"दादा, का असं स्वतःला या अंधाऱ्या खोलीत कोंडून घेतलंयस? काकी सांगत होत्या मला; काल संध्याकाळी कोठून तरी आल्यापासून तू खोलीच्या बाहेरच पडला नाहीस म्हणून. रात्री जेवलाही नाहीस ना?!"

निलेशने सूरजला नको असलेला विषयच छेडला होता त्यामुळे मग सूरज गंभीर झाला...

"लोकांच्या गर्दीत माझा जीव गुदमरतो रे... लोकांची भीती वाटते आता मला... मित्रांनी तर मला कधी समजून घेतलं नाहीच; वाटलं होतं, अनु तरी मला समजून घेतील... पण त्याही मला सोडून निघून गेल्या. आता तूच सांग, अशा स्वार्थी लोकांच्या गर्दीत मी कशासाठी जाऊ?" सूरजही हताश होत बोलला.

"तू तुझ्या माणसांपेक्षा तुझ्या तत्त्वांना जास्त महत्त्व देतोस. आणि हेच कारण आहे त्यांनी तुला एकटं सोडण्याचं. ते स्वार्थी आहेत म्हणून नाही. फक्त तू हे समजून घेत नाहीस. दादा, अशा तत्त्वांचा काय उपयोग, जी तुला तुझ्याच माणसांपासून दूर करतायत. तोडतायत. सोडून का देत नाहीस तू तुझी ही तत्त्वं?" निलेश नाराजीने बोलला.

सूरज मृदू आवाजात, हरवल्यासारखं खाली पाहत त्याला म्हणाला,

"मी तसं नाही करू शकत निलेश. कारण माझी तत्त्वं ही सत्याचं प्रतिबिंब आहेत. माणसं बदलतात, पण सत्य हे कधीच बदलत नाही! आणि माणसांसारखं ते कधी आपल्याला सोडूनही जात नाही."

दुर्दैवी स्मित करत त्याने निलेशकडे पाहिलं व पुढे बोलला,

"आणि हे माझ्याच माणसांनी सिद्ध केलंय! आणि तू ज्यांना माझी माणसं म्हणतोस ना; त्यांनी तरी स्वतःचा इगो बाजूला ठेऊन मला समजून घेण्याचा प्रयत्न करायला हवा होता, नाही का?!"

निलेश हसला. म्हणाला,

"असो! बोलण्यात तू काही कोणाला ऐकणार नाहीस. बरं, मी कॉलेजला जातोय. येतोस माझ्यासोबत?"

सूरजने नजर दुसरीकडे घेतली,

"नाही नको!"

"का? जवळजवळ वर्ष झालं तुला अनुज्ञाला भेटून. तिला पाहण्याची इच्छा होत नाही तुझी?" निलेशने विचारलं.

"होते रे... पण त्यांनाच माझं तोंड पण पाहायचं नाही. मी तिथं आलो, तर त्यांना त्याचा त्रास होईल. आणि त्यांना त्रास झालेला मला सहन होणार नाही. त्यापेक्षा नकोच ते..." सूरज नाराजीच्या सुरात समंजसपणे बोलला.

"जशी तुझी इच्छा. चल तर मग; येतो मी."

निलेशने बॅग खांद्याला अडकवली. दार उघडलं.

"काळजी घे." जाणाऱ्या निलेशला सूरज बोलला.

"तू पण!" निलेशनेही मागे पाहत सूरजला सल्ला दिला.

निलेश बाहेरून दार लावून घेऊन निघून गेला.

बाईकवर बसत मग निलेशने खिशातून मोबाईल काढला. डायल केला. मोबाईलवर फ़ज़लचे नांव व नंबर फ्लॅश होत होता.

"हॅलो, मी शोधलं. पण काही क्लू मिळाला नाही. बहुतेक त्यानं तुझा शोध चालू केलेला नाही." निलेश पलीकडील फ़ज़लला बोलला.

"गुड! तो अंदाजाप्रमाणेच वागतोय. मी बघतो काय करायचं ते." फ़ज़ल फोनमधून निलेशला म्हणाला.

निलेशने कॉल कट केला. मोबाईल खिशात टाकून निघून गेला...

सूरज पुन्हा 'श्री स्वामी समर्थ मंदिरात' प्रवेशला. पुजारी पूजेची तयारी करत होते. एक शिवलिंग देखील स्वामींच्या मूर्तीसोबत तिथं लाल कपड्यांवर स्थापित होते. त्या शिवलिंगाच्या पूजेची तयारी चालू होती. स्वामींच्या मूर्तीला नमस्कार करून सूरज पुजाऱ्यापाशी आला.

"इतक्या वेळानं पूजा?" सूरजने पुजाऱ्याला विचारलं.

"ही दुपारची पूजा आहे. मंदिर बंद करण्याआधी करावी लागते. स्वामींची पूजा झाली आहे. फक्त शिवलिंग पुजायचं बाकी आहे." पुजाऱ्याने सूरजची शंका दूर केली.

सूरजने मान डोलावली व एक पात्र घेऊन तो मंदिरासमोरच्या बागेत गेला.

बागेतील जी पूर्णपणे उमलली आहेत अशी उपयुक्त अशीच फूलंच सूरजने पात्रात गोळा केली आणि तो पुन्हा मंदिरात आला.

आत - गर्भगृहात - सूरजने फूलांनी भरलेलं पात्र पुजाऱ्यापाशी ठेवलं. आणि आदर व नम्रपणे बाजूला उभा राहिला.

"नांव काय तुझं?" दुसऱ्या पात्रात फूलं काढून घेत पुजाऱ्याने सूरजला विचारलं.

"सूरज. सूरज क्षीरसागर."

"पूजा करणार?" सूरजकडे पाहत पुजाऱ्याने विचारलं.

"मी? केली तर चालेल?" आश्चर्याने सूरजने विचारलं.

"का नाही?! त्या परमात्म्याला त्याची सर्व लेकरं सारखीच आहेत. पूजा करण्यासाठी ब्राम्हण किंवा गुरवच असावं लागत नाही. शुद्ध व निखळ भक्तिभाव आणि प्रेम असलं की झालं. तो लगेच आपली पूजा स्वीकारतो. ये इकडं. तुला पूजा कशी करायची ते शिकवतो."

सूरज गाभाऱ्यात प्रवेशला. पुजारी दुसऱ्या चटईवर सरकले आणि स्वतःचं आसन त्यांनी त्याला देऊ केलं.

"बस इथं." पुजारी त्याला म्हणाले.

सूरज शिवलिंग समोर चटईवर बसला.

"प्रत्येक जाती धर्माचा माणूस आपापल्या घरी देवाची पूजा करतोच की! तिथे जर देव विटाळत नाही, तर मंदिरातल्या देव कसा विटाळेल?! शेवटी देव एकच! यांच्याही पुढं जाऊन विचार करायचा म्हंटलं, तर देवा हा निर्गुण आहे. त्याला शरीर नाही. आणि ज्याला शरीर नाही तो मलिन कसा होईल? नाही का?!" पुजारी सूरजचा संकोच दूर करण्यासाठी म्हणाले व त्यांनी स्मित केलं.

सूरजनेही फक्त मान डोलावून 'हो' म्हटलं.

"बरं हात जोड."

पुजाऱ्याने शिवलिंगला नमस्कार केला. सूरजने सुद्धा त्यांचं अनुकरण करत शिवलिंगला नमस्कार केला. पुजाऱ्याने मंत्रोच्चार आरंभ केला व त्यासोबत पूजा आरंभ झाली...

"श्री गणेशाय नमः। ओम नमः शिवाय! श्री स्वामी समर्थ!..."

पुजारी सूरजला जसजशी पूजेची विधी सांगत गेले; त्याप्रमाणे सूरज क्रिया करत गेला...

आणि असेच काही दिवस लोटले... सूरज रोजच मंदिरात जाऊन पूजा करू लागला होता. दिवसभर तेथेच बसू लागला. त्याला त्याचा विषाद दूर करण्यासाठी हा एकच मार्ग दिसत होता... अध्यात्माचा...! पण खरंच! काय तो योग्य मार्गावर होता...???

## ४. तारीख: २१ एप्रिल -

कारागृहाचे दार उघडे होते. चीफ आत होता. तो दोन्ही हात खिशात ठेऊन नंदन नांवाच्या गोल्ड माफिया समोर उभा होता. गोल्ड माफियाचे 10 साथीदार जमिनीवर इकडे तिकडे बसून होते. गोल्ड माफिया बाकावर एक पाय वर घेऊन काडीने दात कोरत बसला होता. चीफच्या तेथे असण्याला तो अजिबात महत्त्व देत नाहीये हे त्याच्या या अविर्भावरून सहज दिसतं होतं. तेच त्याच्या साथीदारांचंही...

"माझं तुमच्याकडं एक काम आहे!" चीफ माफियाला म्हणाला.

"कसलं काम?" माफिया चीफकडं न पाहताच मग्रूरीने उद्गारला.

"तुमच्या फायद्याचंच! सूरज क्षीरसागरचा काटा काढायचाय!" चीफ शांतपणे बोलला.

माफियाने काहीवेळ अविश्वासाने चीफकडं बघितलं,

"पण आम्हाला काय मिळणार?" माफियाने विचारलं,

"सांगायचं काम करा. फायद्याचं आहे का नाही ते आमी ठरवू!" तो पुढे म्हणाला.

चीफला थोडं हसू आलं. तो म्हणाला,

"तुला खरंच असं वाटतं, की तू डिमांड करण्याच्या परिस्थितीत आहेस? एक लक्षात घे; तुम्ही पोलीस कस्टडीत आहात. त्यामुळं तुमच्याकडं माझं ऐकण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही! मला माहित आहे, तुमचाही त्याच्यावर राग आहे. शिवाय मी तुम्हाला वचन देतो, हे काम तुम्ही केल्यानंतर तुम्ही सर्वच कायमचे मुक्त असाल! ट्रस्ट मी!"

"आणि यात तुमचा फायदा काय?" माफियाने शंकीत नजरेनं विचारलं.

"त्याच्याशी तुला घेणंदेणं नाही!" चीफ आवाजात जरब आणत म्हणाला.

"ठिकाय. आम्ही हे काम करायला तयार आहोत." माफियाने थोडावेळ विचार करून मंजुरी दिली.

"फाईन! २५ तारखेला रात्री फ़ज़ल तुम्हाला येथून ठरवलेल्या ठिकाणी घेऊन जाईल!" चीफने माफियाला माहीत असणं जेवढा आवश्यक, तेवढाच प्लॅनचा हिस्सा सांगितला.

गोल्ड माफियाने क्रूर भाव चेहऱ्यावर घेऊन होकारार्थी मान हलवली आणि...

"हं!" एवढंच तो हुंकारला.

चीफ सेलमधून बाहेर पडला, कॉन्स्टेबलला त्याने खूण केली. ती समजून कॉन्स्टेबलने सेल लॉक केलं. चीफ एग्झिटकडे चालला...

जेलच्या बाहेर फ़ज़ल थोडं दूर कारपाशी उभा होता. चीफ त्याच्याजवळ आला.

"यांच्यावर लक्ष ठेव!" चीफने फ़ज़लला ताकीद दिली.

"तुम्ही काही काळजी करू नका सर. हे सगळेच माझ्या ओळखीचे आहेत. आणि मला नाही वाटत, की ते पळून जातील. कारण सूरजचा सूड घेण्याची संधी यांना पुन्हा मिळणार नाही. आणि हे संधी ते सोडणार नाहीत हे नक्की!" चीफला आश्वस्त करण्यासाठी फ़ज़ल म्हणाला.

चीफने समाधानाने गंभीरपणे मानेला झटका दिला व गाडीला वळसा घालून गाडीत पॅसेंजर सीटवर बसला. फ़ज़लही गाडीत ड्रायव्हिंग सीटचा ताबा घेतला. तो गाडी चालवू लागला...

**५. तारीख: २२ एप्रिल -**

सूरज व पुजारी यांनी नुकतीच सकाळची पूजा संपवली होती. सूरजने श्री स्वामी समर्थ व शिवलिंग यांना फूलं वाहिली. नमस्कार केला व पुजाऱ्याच्या देखील पाया पडला. तोच त्याचा मोबाईल वाजला. त्याने फोन काढून पाहिलं व कॉल रिसिव्ह करत बाहेर गेला...

मंदिराबाहेरील बागेत सूरज फोनवर बोलत उभारला...

"हा सर?..."

"बरायस?" चीफने विचारलं.

"हो. बराय आता."

चीफ गाडीत होता. त्याची गाडी सूरजच्या गांवच्या दिशेनेच चालली होती. ड्रायव्हर गाडी चालवत होता. बाजूला बसलेला चीफ सूरजशी मोबाईलवरून बोलत होता...

"गुड! सूरज, एक महत्त्वाची केस आली आहे. त्याची इन्क्वायरी तू करावीस अशी माझी इच्छा आहे. मी तुझी राहिलेली सुट्टी कॅन्सल करतोय!"

"पण सर..." सूरज चीफला मनवण्याच्या हेतूने पलिकडून बोलला.

"नाही, मी तुझं काही ऐकून घेणार नाही! मला माहितेय, मीच तुला सुट्टी घ्यायला भाग पाडलं होतं. पण ही तुझ्याच गांवातली केस आहे. आणि ती हँडल करण्यासाठी दुसरे कोणी योग्य नाही असं मला वाटतं. मी गांवी येतोय. तुझ्या घरी भेटू." चीफ ऐकून न घेता सूरजच वाक्य मध्येच कापत बोलला.

आणि चीफने फोन बाजूला घेतला.

इकडे सूरज फोन बाजूला केलाय हे लक्षात येऊन देखील चीफला मनवण्याच्या सुरात मोबाईलमध्ये ओरडत होता,

"पण सर, सर..."

पण फोन कधीच कट झालेला होता. सूरजने चिंतित होत मोबाईल खाली घेतला.

"आता काय करू? जे काम हातात घेतलंय, ते तर अपूर्णच आहे. शिवाय ते काम झाल्याखेरीज मी ही असाईनमेंट कशी स्वीकारू? की या दोन्ही केसेस एकच असतील? काय करू मी...? सध्यातरी मी कसलंही काम करायला केपेबल नाहीये... पण हे सरांना कसं पटवून देऊ...?" सूरज विचलित होत स्वतःशीच बोलला.

पुजारी पूजेचं पाणी तुळशीला घालण्यासाठी बाहेर आलेले होते. सूरजचं पुटपुटणं त्यांच्या कानांवर पडलं. त्यांनी सूरजकडं नजर टाकत एक स्मित केलं व मंदिरात गेले. सूरज येऊन पायरीवर बसला. कुठल्यातरी आठवणींत हरवून...

काही वेळाने पुजारी "ज्ञानेश्वरी" घेऊन सूरजपाशी आले. त्यांनी सूरजच्या खांद्यावर हात ठेवला.

"काय झालं सूरज, कुठं हरवलायस?" त्यांनी सूरजच्या खांद्यावर हात ठेऊन त्याला विचारलं.

त्यांच्या आवाजाने व स्पर्शाने सूरज भानांवर आला.

"अं? क... कुठं नाही..." सूरज स्वतःला सावरून बोलला. आपली मन:स्थिती तो लपवू पाहत होता.

"बरं, ही ज्ञानेश्वरी घे. आणि तिसऱ्या अध्यायातील आठवा श्लोक वाच." पुजारी त्याला म्हणाले.

सूरजने काही प्रश्न न करता पुजाऱ्याकडून ज्ञानेश्वरी घेतली व उघडून वाचू लागला...

"नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः। शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥"

आणि त्याने पुजाऱ्याकडे पाहिलं.

"आता जरा याचा अर्थ वाच." असं पुजाऱ्याने स्मित करत पुन्हा त्याला सांगितलं.

सूरजने पुन्हा ज्ञानेश्वरीमध्ये पाहून श्लोकाचा अर्थ वाचला...

"तू नित्य कर्म कर, कारण कर्म मुळीच न करण्यापेक्षा कर्म करणेच श्रेष्ठ आहे. तसेच कर्म न करण्याने तर तुझे शरीर निर्वाह ही सिद्ध होणार नाही!"

"आणि हेच तुझ्या प्रश्नाचं उत्तर आहे!" पुजारी सूरजला म्हणाले.

सूरज गोंधळून पुजाऱ्याकडे पाहू लागला.

"मी काही दिवस झाले पाहतोय..." पुजारी थोडे थांबले व पुढं म्हणाले,

"तुझ्या आत स्वतःशीच तुझं द्वंद्व चालू आहे. हे बघ सूरज; मला माहित नाही, की तू काय काम करतोस. म्हणजे तुला यासंबंधी विचारावं अशी मला कधी गरज वाटलंच नाही. पण, गेले २०-२२ दिवस तू इथं येऊन पूजा करतोस, दिवसभर इथंच बसून राहतोस, हे बरं नाही. तू समर्थांना गुरू, माता-पिता, सर्व काही मानतोस, होय ना?"

नकळतच सूरजची होकारार्थी मान हलली. पुजाऱ्यांचं बोलणं चालूच होतं,

"मग विचार कर; तू असं वागलेलं समर्थांना आवडत असेल?"

"म्हणजे?" सूरजने अधिक गोंधळून विचारलं.

पुजाऱ्याने सूरजच्या खांद्यावर ठेवलेला हात बाजूला घेतला. पुढं पाहिलं व बोलले,

"म्हणजे, तू तुझं निर्धारित कर्म करायचं सोडून रोज इथं येऊन पूजा करतोस. पण ही पूजा त्या परमात्म्याला मान्य होत नाही. कर्तव्याचा त्याग केल्यानं आपली भक्ती कितीही निखळ असली, तरी ईश्वर तिचा स्वीकार करत नाही!"

पुजाऱ्याने पुन्हा सूरजच्या खांद्यावर हात ठेवला म्हणाले,

"अरे कर्म कोणाला चुकलंय? तो जगन्नियंताही या कर्मजाळातून सुटला नाही. तर तू-मी कोण आहोत? तो परमात्मा हा निर्गुण आहे. त्याला कसलीही इच्छा नाही! कोणतीच अशी गोष्ट नाही, जी त्याला मिळवायची आहे! तरीही तो कर्म करतो. कारण त्यानेच जर कर्म करायचं सोडून दिलं, तर हा समाजही त्याचंच अनुकरण करेल व कर्म त्यागेल. आणि या सर्व लोकांचा सर्वनाश होईल! आणि तू कर्म त्यागतो म्हणालास; तरी कर्माचा त्याग करणं कोणालाही शक्य नाही. त्यामुळं सत्य आणि धर्माचं रक्षण करायचं असेल, तर समर्थ आणि सर्वज्ञ लोकांनी कर्माचा त्याग करू नये; असं स्वतः समर्थच सांगतात. बरोबर ना?!"

सूरजने गंभीर मुद्रेने होकारार्थी मान डोलावली.

"स्वतः भगवंतच सांगतात, की माझ्यामागे लागण्याची गरज नाही. आपले कर्म करा. तितके पुरेसे आहे. तुला ठरवून दिलेलं कर्म केल्यानं तुझ्या सर्व इच्छाही पूर्ण होतील. पण फक्त इच्छा पुर्तीसाठी पण तू कर्म आणि भक्ती करू नको. त्यानेच तुला ईश्वर प्राप्ती होईल. त्यासाठी तू रोज इथं येऊन पूजा करण्याची आवश्यकता नाही. मी हे करतो, कारण हे मला ठरवून दिलेलं कर्म आहे म्हणून!"

दीर्घ श्वास सोडत पुजाऱ्याने पुढं पाहिलं,

"मी काय सांगतोय ते तुझ्या लक्षात येतंय, की नाही ते मला माहित नाही. पण सांगायचं कर्तव्य माझं होतं, ते मी केलं. आता काय करायचं ते तुझं तू ठरव!"

सूरज गप्पच राहिला. म्हणून पुजारी पुढं बोलले,

"बघ बाबा काय करतोस. मी एवढंच सांगेन, की आपल्या कर्तव्याचं पालन करणं हा प्रत्येकाचा धर्म आहे. त्यामुळं तू तुझं कर्तव्य पार पाडण्यास चुकू नकोस. अरे हा देखील भक्ती करण्याचा एक मार्गच आहे! यानेच तुला तुझा देव भेटेल! कर्म पालन हीच तर ईश्वरप्राप्ती!"

सूरजचे डोळे पाणावले होते...

"आजोबा, मी चुकलो; मला माफ करा!" गहिवरून तो म्हणाला.

पुजाऱ्याने सूरजकडे पाहिलं.

"माफी माझी नाही, स्वामींची माग. जा." ते म्हणाले.

पुजाऱ्याने सूरजकडून 'भावार्थ ज्ञानेश्वरी' परत घेतली व मंदिरात गेले. सूरजही त्यांच्या मागून गेला... तो ओल्या डोळयांनी स्वामी समर्थांकडे पाहत उभा राहिला. डोळयांतून गालांवर अश्रू ओघळत होते आणि ते हनुवटी जवळ एकत्र होऊन मंदिराच्या जमिनीवर सिंचित होत होते. काही काळ दारातच उभारून तो आत गेला...

गर्भगृहात सूरज आला. डोळयांत अश्रू होते. डोळयांबरोबर मन सुद्धा भरून आलं होतं. गुडघ्यांवर बसून तो स्वामींसमोर लीन झाला.

"समर्था; मला माफ करा. मी चुकलो. मी... मी स्वतःच्या दुःखांना इतका कवटाळून बसलो, की मी माझं कर्तव्यच विसरून गेलो... मला माफ करा. प्लिज मला माफ करा समर्था..." तो स्वामींना कळवळीने म्हणाला.

"तथास्तु!" पुजारी बाजूला हात बांधून उभे होते ते उद्गारले.

सूरजने ठामपणे डोळे उघडले. तो उठला. तो पुन्हा स्वामी समर्थांच्या पाया पडला व बाजूला उभ्या असलेल्या पुजाऱ्याकडे गेला. त्याने त्यांचे पदस्पर्श केले.

पुजाऱ्याने डोक्यावर हात ठेवून त्याला आशीर्वाद दिला,

"यशस्वी भव:!"

सूरज मनात पक्का निश्चय घेऊन उभारला. ठामपणे मान हलवून पुजाऱ्याला आश्वस्त करत निघून गेला. पुजारी समाधानी स्मित ओठांवर घेत जाणाऱ्या सूरजकडे पाहत उभारले...

सूरज दार उघडून आत बेडरूममध्ये आला. दार लावून घेतलं आणि स्वतःला त्याने बेडवर झोकून दिलं.

## ६. तारीख: २३ एप्रिल -

मानसिक थकव्याने सूरजची झोप लागली होती. बाहेरून कोणीतरी दार ठोठावलं. त्या आवाजाने झोप गाढ असूनही सावध असलेल्या सूरजची झोप भंगली. तो उठला. त्याने टेबलवरील गन घेतली आणि सावधपणे दरवाजाकडे गेला. तो भिंतीलगद सावधपणे उभारला. त्याने हळूवार दरवाजा उघडला. चीफने आत प्रवेश केला. सूरजने जलदगतीने चीफवर मागून त्याची सर्व्हिस पिस्टल पॉईंट केली. सावध होऊन चीफने पण त्याची गन बाहेर काढली. सूरजने चीफला खाली पाडलं व त्याच्यावर गन रोखली. काही काळ शांतता... कोणी काहीच बोललं नाही. चीफ हात वर करून पडून होता व सूरज रागाने त्याच्यावर पिस्टल ताणून होता...

चीफला पाहून सूरजची तंद्री भंगली. तो पूर्ण भानांवर आला. त्याने  त्याची गन खाली घेतली. सूरजला आपल्या प्लॅनबद्दल अजून काही समजलं नाही हे ध्यानात येऊन चीफचा श्वास मोकळा झाला व तो धापा टाकू लागला...

"सर तुम्ही?" सूरज गोंधळून उद्गारला.

सूरजने मागे वळत घाईने लगेच दार बंद करून घेतलं आणि चीफकडे आला.

"काय रे सूरज? माझा जीव घेतोयस की काय?" चीफने नेक टाय सैल करत सूरजला विचारलं.

"माफ करा सर, इतक्या लवकर तुम्ही याल असं वाटलं नव्हतं. त्यामुळं सेफ्टी म्हणून..." सूरजने चीफला उभा रहायला मदत केली.

"असू देरे. ठिक आहे. सावध असलेलंच बरं." चीफ हसत म्हणाला.

"या ना सर. बसा." सूरज खुर्चीकडे हात करत चीफला म्हणाला.

दोघे बसले. सूरज बेडवर, चीफ त्याच्यासमोर खुर्चीवर...

"सूरज मी सांगितल्याप्रमाणे ही जी केस आहे, ती इथलीच आहे. तुमच्या गावातील एक बिझनेसमन आहेत ना, पुरुषोत्तम जाधव..." चीफने डिरेक्ट विषयाला हात घातला होता! पण...

"हो आहेत ना, काय झालं?" सूरजने त्याचे वाक्य तोडत अधीरतेनं विचारलं.

"त्यांची मुलगी किडनॅप झाली आहे!" चीफने बॉम्ब फोडला व त्याच्या मोबाईल मधील अनुज्ञाचा फोटो सूरजला दाखवला,

"हा बघ तिचा फोटो."

गंभीर होऊन सूरजने मोबाईल हाती घेतला. नीट पाहिला. हा फोटो पाहून सूरजला धक्काच बसला.  हा तोच फोटो होता जो एक वर्षांपूर्वी सूरजनेच चीफला पाठवला होता... आणि ही तीच अनुज्ञा होती! जिच्यावर सूरज जीवापाड प्रेम करत होता!...

"अ... अनु?!" सूरज अविश्वासाने उद्गारला. ही अक्षरं पुसटशीच त्याच्या तोंडून बाहेर पडली.

"हो अनु! तुझी अनु! म्हणून तर तुझ्याकडं आलोय..." चीफ त्याला म्हणाला.

अनुज्ञाच्या अपहरणाची बातमी ऐकून सावरलेल्या सूरजला पुन्हा अस्वस्थ वाटू लागलं. त्याने हळूहळू डोळे मिटून घेतले...

"सूरज, सूरज, सूरज..." सूरजला जागं ठेवण्याच्या प्रयत्नात चीफ ओरडत होता...

पण चीफची हाक ऐकण्याच्या पलीकडे सूरजची अवस्था कधीच गेली होती...

## ७. एका वर्षांपूर्वी - एप्रिल महिना -

सूरजला नंदन इनामदार या माफियाला पकडण्याच्या असाईंमेटवर अपॉइंट केलं होतं. त्यासाठीच तो गावी आला होता. आणि त्या संदर्भातच सूरज चौकशी करत होता...

चप्पल दुकानांचे दुकानदार डिस्प्लेसाठी चपला लावत होते. काहीजण दुकान झाडत होते. तर काही रस्त्यावर पाणी शिंपडत होते. बुट्स लावणाऱ्या एका दुकानदारापाशी सूरज आला.

"दादा..." सूरजने त्या दुकानदाराला हाक मारली.

"बोला साहेब काय दाखवू? काय हवंय?" दुकानदाराने त्याचं काम थांबवून सूरजला विचारलं.

सूरज काही न बोलता दुकानात शिरला. दुकानदार मागून आत आला. सूरजने मोबाईल मधील गोल्ड माफिया नंदनचा फोटो त्याला दाखवला.

"याच्याबद्दल माहिती." सूरज हळू आवाजात त्याला म्हणाला.

दुकानदाराने सूरजच्या हातातूनच फोटो पाहिला. आणि त्याच्या चेहऱ्याचा रंगच उडाला. सूरजकडे दुर्लक्ष करून तो बोक्सेस घेऊन बाहेर गेला. जाताना...

"नाही!" एवढंच तो उद्गारला.

आणि त्याने सूरजकडे दुर्लक्ष करून बुट्स लावायला पुन्हा सुरुवात केली. बोक्सेस अरेंज करून तो दुसरे बॉक्सेस घेण्यासाठी परत आत आला. सूरज त्याच्याकडे गेला.

"हे बघा, मला माहीत आहे, की तुम्ही सब-इंस्पेक्टर शोएबचे खबरी आहात. मी सीआयडी इंस्पेक्टर सूरज क्षीरसागर. शोएब हे माझे चांगले मित्र आहेत. त्यांनीच मला आपली मदत घ्यायला सांगितलंय. हवं तर तुम्ही फोन करा त्यांना." सूरज त्याला मनवण्याच्या सुरात म्हणाला.

"साहेब! खरंच सांगतोय, मला काही माहीत नाही! मी फक्त एवढंच सांगू शकतो, की मागच्या महिन्यात त्यानं ५०० किलो सोन्याची डील केल्या. मंदीचा काळ असल्यानं आणि सरकारनं इम्पोर्ट टॅक्स वाढवल्यानं त्याच्या या सोन्याला बाजारात खूप मागणी वाढल्या. याशिवाय माझ्याकडं त्याच्या विषयी काही माहिती नाही. तो खूप खतरनाक माणूस आहे. त्याच्यापासून दूर राहिलेलंच बरं. आणि तसंही कोणीतरी सीआयडीवाला त्याच्या शोधात आलाय हे त्याला समजलंय. सावध रहा. एवढंच सांगेन!" दुकानदार थोडं वैतागून म्हणाला.

"बरं ठिकाय. धन्यवाद..." सूरज निराशाजनक बोलला.

सूरज मागे वळला. तोच फ़ज़लची कार समोरून पास झाली. सूरज घाईने पुढं जाऊन आनंदाने त्याने त्याला हाक मारली...

"फ़ज़ल!!!"

फ़ज़ल गाडीत मागील सीटवर होता. त्याने खिडकीतून मागे पाहिलं. सूरजला पाहून एक मोठं स्मित त्याच्या ओठांवर आलं.

फ़ज़लने गाडी थांबवण्यासाठी ड्रायव्हरच्या खांद्यावर टॅप केलं. ड्रायव्हरने गाडी बाजूला घेतली.

रस्त्यावर - गाडी बाजूला पार्क झाली. फ़ज़ल खाली उतरला.

"हेय् सूरज!!!" फ़ज़ल आनंदाने सूरजकडे येत उद्गारला.

तो सूरजपाशी आला. त्याने त्याला आनंदाने मिठी मारली.

"क्या भाई किधर है तू? कितने दिनों बाद मिल रहे हो!" फ़ज़ल सूरजला म्हणाला.

"क्या करूँ यार? तुझे तो पता है मेरी नौकरी कैसी है। अरे एक दिवसही सुट्टी घेता येत नाही. " सूरज त्याला बोलला.

"मग आज तू गांवात कसा?" फ़ज़लने सूरजला विचारलं.

"आलो होतो एका केस संदर्भातच." सूरज म्हणाला.

"कोणती केस?"

"सॉरी भाई। ते नाही सांगू शकत. इट्स कॉन्फिडेंशिल." सूरजने सांगणं टाळलं.

फ़ज़ल हसला,

"असू दे."

"बरं तुझं काय चालू आहे? वडिलांचा बिझनेस तू टेकोव्हर केलास म्हणे?" सूरजने त्याला विचारलं.

"हो ३ महिने झाले. सतत आजारी असतात. म्हंटलं आता आराम द्यावा त्यांना." फ़ज़ल म्हणाला व पुन्हा हसला. म्हणाला,

"पण आमचं काम काय तुमच्या नोकरी सारखं थ्रिलिंग आणि एडवेन्चरस नाही ना..."

फ़ज़लच्या वाक्यावर सूरज मोठ्यानं हसला.

"रनिंग अ बिझनेस इटसेल्फ इज एन एडवेनचरस अँड थ्रिलिंग थिंग!" तो म्हणाला.

"हो! तेही आहेच!" फ़ज़लला पटलं. तो हसत म्हणाला.

त्याचवेळी, एक बस तेथून पास झाली. सूरजची नजर येणाऱ्या बसवर पडली. त्याला दिनेश बसमध्ये खिडकी लगत मागील सीटवर बसलेला दिसला. तो बाहेरच पाहत होता. सूरज गंभीर झाला. दिनेश हा नंदन इनामदार या गोल्ड माफियाचा माणूस असल्याचं त्याच्या लक्षात आलं.

हे आठवून सूरजचे डोळे विस्फारले. अचानक बाहेरच पाहत असलेल्या दिनेशची नजरही सूरजवर पडली. तो ताडकन उभारला.

बसमध्ये - दिनेशने रॅकवरून त्याची ब्रिफकेस घेतली व गन काढून तो ड्रायव्हरच्या दिशेनं धावला. त्याने ड्रायव्हरच्या डोक्याला गन लावली. ड्रायव्हर घाबरला. तो ब्रेक मारणार इतक्यात...

"चालवत रहा!" दिनेश दटावत त्याला म्हणाला.

रस्त्यावर - सूरज बसच्या मागे धावला. हे पाहून फ़ज़ल गोंधळला. काय झालंय हे त्याच्या लक्षात आलं नाही आणि विचारण्यासाठी सूरज तेथे नव्हता. बसच्या डाव्या बाजूस येऊन सूरज उडी मारून बसच्या खिडकीचे बार पकडून लटकू लागला...

बस वेगाने धावत होती. सूरज मागील खिडकीला लटकत होता. बस बसस्टॉपच्या एंटरेन्सला वळली. त्या झटक्यामुळे सूरजची पकड सुटली व तो रोडवर कोसळला. शरीराला इजा होऊ नये म्हणून पडताक्षणी रस्त्यावर रोल करून सूरज उभारला व पुन्हा बसमागे धावला.

बस स्टॉपमध्ये प्रवेश करून सूरज थांबला. दूर बस थांबत आहे हे तो पाहत होता. दिनेश बसमधून ब्रिफकेससह उतरला आणि तो बस पासून थोड्याच अंतरावर उभ्या एका कारकडे धावला. सूरजही त्या दिशेने धावला. एक माणूस गाडीतून उतरला. दिनेश कारपाशी पोहोचला. दिनेशने त्या माणसाला सूरजला मारण्याची खूण केली व गडबडीने कारमध्ये बसला. तो माणूस सूरजकडे पळत आला. पण न थांबता धावतच सूरजने जोराचा पंच करून त्या व्यक्तीला आडवा केला. तोपर्यंत गाडी पुढं जाऊन वळलेली होती. गाडी कुठं जाईल याचा अंदाज घेऊन सूरज मागे वळला आणि स्टॉपच्या मागील बाजून धावत गेला...

बसस्टॉच्या मागे - सूरज पळत रस्त्यावर आला. तो रस्त्याच्या मधोमध थांबला. दिनेशची गाडी वेगाने त्याच्या दिशेने येत होती. स्वतःला वाचवण्यासाठी सूरजने बाजूला उडी मारली. पुढं जाऊन गाडी थोडी घसटून थांबली. दिनेशने ब्रेक मारला होता. गाडीची काच खाली झाली. दिनेशने खिडकीतून मागे पाहिले. सूरज उठून उभारला होता. तो पुन्हा रस्त्याच्या मध्ये आला. दिनेशने गाडी 180° वळवून पुन्हा सूरजच्या दिशेने आला. यावेळी सूरज बाजूला होऊन गाडीच्या मागे पळाला व उडी मारून गाडीच्या मागील डिक्कीवर चढला. सूरजने त्याची गन काढून मागच्या काचेवर डाव्या बाजूला तिरकी गोळी चालवली. काच तडकली. मग त्याने गनच्या बटने काचेवर जोरात मारले. काच फुटली तशी गाडीही थांबली. सूरजने बलेन्स टिकवण्यासाठी विंडशिल्ड्ची वरील बाजू पकडली. दिनेशने ब्रेक मारलेला होता व तो मागे सूरजकडे पाहत होता.

"पोलीस स्टेशनला घे!" सूरजने दिनेशवर गन रोखून त्याला ऑर्डर दिली.

सूरज तुटलेल्या खिडकीतून आतील सीटवर गेला. त्याने तुटलेल्या काचेचे तुकडे बाजूला केले व आपला कोट काढून सीटवर अंथरूण तो सीटवर बसला. दिनेश पुढं पाहून गाडी चालवू लागला...

सूरजने दिनेशवर गन रोखल होती. दिनेशची गाडी पोलीस स्टेशनकडे धावत होती. दुसऱ्या हाताने सूरजने मोबाईल काढून नंबर लावला.

"हॅलो शोएब, बसस्टॉपवर एक क्रिमिनल बेशुद्ध पडलाय. एक हवालदार पाठवून त्याला कस्टडीत घे. मीही पोलीस स्टेशनला पोहोचतोय!" सूरज मोबाईलमध्ये शोएबला म्हणाला.

आणि त्याने कॉल कट करून मोबाईल खिशात टाकला. काही वेळाने... सूरजने खिडकीतून बाहेर पाहिलं. त्याला एक पोलीस जीप विरुद्ध दिशेला बसस्टॉपकडे जाताना दिसली. दिनेश चालवत असलेली कार पण पुढे काही वेळ धावत राहिली...

...आणि ती गाडी पोलीस स्टेशनबाहेर पोहोचली.

"थांबव!" सूरज रागात ओरडला.

दिनेशने गाडी थांबवली. सूरज उतरला. त्याने आपला कोट घेतला व ड्रायव्हिंग सीटकडे गेला. त्याने दिनेशचा दरवाजा उघडला व त्याची कॉलर पकडून दिनेशला कारमधून बाहेर खेचलं. सूरजने दिनेशची ब्रिफकेस पण घेतली व दिनेशला पोलीस स्टेशनमध्ये ओढत नेलं.

सूरजने त्याचा कोट व ब्रिफकेस सेल जवळील बेंचवर फेकले आणि सूरजने दिनेशला सेलमध्ये ढकललं. स्वतःही आत जाऊन त्याला मारू लागला...

"हे... हे तुम्ही असं एका सिविलीयनला मारू शकत नाही..." दिनेश कण्हत सूरजला ह्युमन राईट्सची आठवण करून देऊ लागला.

"सिविलीयनला ना? क्रिमिनलला मारूच शकतो! बस मधील सगळे याला विटनेस आहेत! स्मगलिंग, किडनॅपिंग, इल्लीगल आर्म पजेशन, युसिंग वेपवन इन ओपन टू थ्रेटन पिपल अशी बरीच चार्जेस तुला लागणार आहेत!" सूरज मारतच त्याला म्हणाला.

काही वेळात बस स्टॉपकडे गेलेला कॉन्स्टेबल तिथे बेशुद्ध पडलेल्या क्रिमिनलला घेऊन आला व त्याने त्याला त्याच सेलमध्ये ढकलले. सूरज त्यालाही मारू लागला...

"अरे बोला; बोला काही तरी..." सूरज चिडून मारत ओरडला.

"सांगतो! सांगतो...!" मार सहन न होऊन शेवटी दिनेशने तोंड उघडलं.

सूरज मारायचं थांबला आणि रागाने नजर रोखून दिनेशकडे पाहू लागला. दिनेश सांगेल तो शब्द न शब्द तो कानात साठवू लागला...

दिनेशने सांगितलेल्या वर्कशॉपच्या पत्त्यावर येऊन सूरजची कार थांबली. त्या मधून सूरज उतरला. वर्कशॉपकडे चालू लागला... 2 कामगार बाहेरच तिजोऱ्या रंगवत होते. सूरज वर्कशॉपमध्ये गेला.

वर्कशॉपमध्ये 4 कारागीर तिजोरी बनवायचं काम करत होते. तर दोघे कोपऱ्यात गादी विणत होते. गोल्ड माफिया तेथेच बसला होता. त्याने सूरजकडे पाहिलं, पण आपण याला ओळखलं आहे हे भाव त्याने चेहऱ्यावर येऊ दिले नाहीत. पण आपल्या माणसांना हल्ल्यासाठी अलर्ट होण्याची खूण करायलाही तो विसरला नाही. तो अनोळखीपणेच सूरजला म्हणाला,

"बोला साहेब काय पाहिजे?"

सूरजशी बोलत असताना माफियाने त्याच्या लोकांना हल्ल्यासाठी तयार राहण्यास खुणावून ठेवलेलं होतं. तसे सगळे सावध झालेले होते व आपापले काम करतच सावध नजर सूरजकडे टाकत होते.

"हतकडी!" सूरज त्याला म्हणाला.

"माफ करा साहेब. आम्ही इथं तिजोऱ्या आणि गाद्या बनवतो, हतकडी नाही." माफिया चेष्टेचं हसून म्हणाला.

"चुकतोयस तू! मी इथं तुम्हाला हतकडी घालायला आलोय!" सूरज धमकीचं स्मित हास्य ओठांवर घेत माफियाला म्हणाला.

माफियाचे भाव अचानक बदलले. तो चिडून ओरडला,

"पण आमचा गुन्हा काय आहे?"

"चार्जेस ऑफ मर्डर, किडनॅपिंग, एक्स्टॉर्शन अँड स्मग्लिंग द गोल्ड!" सूरज शांतपणे बोलला.

"असं होय! होय करतो आम्ही हे धंदे! एरियात सगळयांना माहिती आहे. पण कुणाच्यात हिंमत नाही आम्हाला अडवण्याची! तुझ्यात असंल, तर प्रयत्न करून बघ!" माफिया त्याच्या खऱ्या रुपात आला. तो मग्रूरीने उच्चारला व त्याने कामगारांना हाक दिली...

"हिरा, रामा, ज्योत्या, दासू या रं इकडं! आज याला इथनं जीवंत जाऊ द्यायचा नाय!"

"मी प्रॉब्लेम्सना सॉल्व्ह करत नाही; तर प्रॉब्लेम्सना फोडतो! आणि आत्ता प्रॉब्लेम्सना फोडण्याची वेळ आली आहे!" सूरज ठामपणे त्याला म्हणाला.

पण त्याची वॉर्निंग लक्षात न घेता सगळे कामगार सूरजभोवती गोळा झाले. त्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला. फाईट चालू झाली... सूरज त्यांना मारू लागला... एकटा सूरज आपल्या एवढ्या कामगारांना आवरत नाही हे पाहून माफिया थोडा घाबरला आणि त्याने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. सूरजने मागून त्याची कॉलर पकडली, पण एका कामगाराने त्याच्या हातावर किक केली. सूरजची पकड सुटली व तो त्या कारागीराशी व इतरांशी फाईट करण्यात पुन्हा व्यस्त झाला...

ही संधी साधून गोल्ड माफिया त्याची गाडी घेऊन तेथून निसटला. सूरज व कामगार फाईट करत रस्त्यावर आले. सूरजने एकेक करत त्या सगळयांना अनकॉन्शियस केले व फोन लावत तो त्याच्या कारकडे आला.

"हॅलो सर, मी बोलतोय सूरज. सर कारागीर ताब्यात आलेत, पण वर्कशॉपचा मालक नंदन पळून गेलाय. त्यामुळं मला इथं आणखी थोडे दिवस रहावं लागेल." तो चीफशी बोलत होता.

"ओके. टेक युअर टाईम अँड टेक केअर ऑफ युअरसेल्फ. ओके?" चीफ त्याला म्हणाला.

"ओके, थँक्यू सर. ठेवतो."

इतक्यात शोएबची जीप व पोलीस व्हॅन तेथे आल्या. शोएब पळत सूरज जवळ आला. 3-4 कॉन्स्टेबल व्हॅन मधून उतरले.

"ऑलवेज प्लेईंग ए हिरो हं?" शोएब नाराजीने सूरजला ओरडत म्हणाला.

"शनायस लय. जा माणसं गोळा कर." सूरज त्याला चिडवत बोलला.

"तुम्ही गांवात आला की दुसरं काय काम असतं आम्हाला?" शोएब पडलेल्या कामगारांकडे पाय आपटत जात मागे न पाहता सूरजला म्हणाला.

त्याच्या नाराजीवर सूरजला हसू आलं. कॉन्स्टेबलनी देखील शोएबला फॉलो केलं...

८.

काही सूर्यकिरणं खिडकीतून आत डोकावत होती. त्याच प्रकाशात सूरज त्याच्या स्टडीटेबलवर गोल्ड माफियाचा रिपोर्ट तयार करत बसला होता. सोनाराकडे असते तशी एकाच डोळ्याला बसणारी मॅग्निफाईन ग्लास सूरजच्या डाव्या डोळ्याला होती. तो काळजीपूर्वक जप्त केलेल्या सोन्याचं सॅम्पल पाहत होता. काहीतरी लिहित होता. बाहेरून नॉक झालं.

"कोणाय?" सूरज दाराकडे पाहून ओरडला.

"अरे मी आहे स्वप्निल!" बाहेरून मित्राने आवाज दिला.

"हा. आलो!" सूरज प्रतिसाद देत ओरडला.

त्याने जवळच जमिनीवर पडलेली सॅक उचलली आणि सोनं व रिपोर्ट पेपर्स त्याने एका झटक्यात सॅकमध्ये सरकवले. सॅक बांधून ती कपाटात टाकून ते लॉक केले व दार उघडलं. स्वप्निल, सूरजचा शाळकरी मित्र आणि त्याचा लहान भाऊ निलेश बाहेर उभे होते. निलेशच्या पाठीला कॉलेज बॅग होती. स्वप्निलच्या चेहऱ्यावर खूप दिवसांनी मित्राला भेटल्याचा आनंद व त्यातून उमटलेलं स्मित होतं. पण निलेश संकोचला होता. सूरजने हसून स्वप्निलला मिठी मारली.

"ये ना आत ये. किती दिवसांनी भेटतोय आपण...!" बेडपाशी येत सूरज स्वप्निलला म्हणाला.

"हो." स्वप्निलनेही हसून दुजोरा दिला.

निलेश व स्वप्निल सूरज मागून आत आले.

"बसा." म्हणत सूरज बेडवर बसला.

स्वप्निलच फक्त सूरजसमोर खुर्चीवर बसला. निलेश त्याच्याजवळ उभा राहिला.

"तू उभा का? बस ना." निलेश सूरजला म्हणाला.

"नाही मी ठिक आहे..." निलेश संकोचत म्हणाला.

सूरजने मान डोलवून स्वप्निलकडे पाहत त्याला विचारलं,

"बोल, आज सकाळी सकाळी इकडं कसा काय?"

स्वप्निल आता जरा संकोचत बोलला,

"सूरज, माझं तुझ्याकडं थोडं काम होतं..."

"अरे मग बोल ना." सूरज हसून म्हणाला.

"हा निलेश. माझा लहान भाऊ." स्वप्निल अजूनही संकोचत होता.

सूरजने स्मित करत निलेशकडे नजर टाकली,

"हो ओळखलं मी. मोठा झालाय." तो हसून म्हणाला.

स्वप्निल चिंतित मुद्रेने हसला,

"हो. एमएसएसी करतोय. काय आहे ना, की याच्या कॉलेज मधली मुलं याला खूप त्रास देतात. शोएबकडं जाणार होतो, पण तू आल्याचं कळालं म्हणून तुझ्याकडं आलो... प्लिज यार मदत कर ना..." स्वप्निलने कळकळीची विनंती केली.

"तू काही काळजी करू नको. मी बघतो काय करायचं ते." सूरजने स्वप्निलला निश्चियी आश्वासन दिले व निलेशला विचारले,

"मला वाटतं तुझं कॉलेज तासाभरात सुरू होईल, नाही?"

निलेशने निर्विकार होकारार्थी मान हलवली.

"स्वप्निल; तू निघ. तुला ऑफिसला जायला उशीर होईल. डोन्ट वरी मी आहे याच्यासोबत." सूरज स्वप्निलला म्हणाला.

"बरं ठिक आहे. येतो मी." स्वप्निल उभारत म्हणाला व तो निलेशकडे वळला,

"निलेश, मी जातोय. तू काही काळजी करू नको. सूरज तुला काही होऊ देणार नाही. येतो मी." त्याने निलेशला आश्वस्त केलं.

निलेशने पुन्हा निर्विकार मान डोलावली.

"येतो." स्वप्निल सूरजला म्हणाला.

"ये." सूरजने हसून त्याला जाण्यास परवानगी दिली.

स्वप्निल निघाला तसा सूरजही उठून उभारला. त्याने अडकवलेलं जॅकेट घेऊन अंगात चढवत व निलेशला म्हणाला,

"चल बघू तुला कोण त्रास देतंय ते!"

सूरज खोली बाहेर पडला. निलेशने त्याला फॉलो केलं. सूरजने बाहेरून दार ओढून घेतलं.

सूरज व निलेश बाईकवरून निलेशच्या कॉलेजवर आले. बाईक पार्क करून दोघे कॉलेजमध्ये गेले.

कॉलेज कॅम्पसमध्ये, चार-पाच मुलं एका विध्यार्थ्याची मस्करी करत उभे होते. निलेशने प्रवेशद्वारापासूनच ती मुलं बोटाने सूरजला दाखवली. सूरजने धावत जाऊन त्या पाचही मुलांना

मारण्यास सुरवात केली. त्या पोरांनी देखील सूरजवर हल्ला चढवला.. फाईट झाली... पण पोलिस असलेल्या सूरज समोर त्या कॉलेज कुमारांचा काय निभाव लागणार होता... सूरजने सर्वांना मारले. पण गंभीर जखमी नाही केलं. ताकीद देण्यापुरतेच त्याने त्यांना गारद केलेले होते.

मग सूरजने निलेशला व फाईट चालू झाल्यावर लांब सरकलेल्या मघासच्या मुलाला जवळ येण्याची खूण केली. घाबरत पण वेगानं निलेश सूरजपाशी येऊन त्याच्यापासून थोडं मागे उभारला. तो मुलगा देखील येऊन बाजूला उभारला. काही क्षणांत, खाली पडलेली मुलं स्वतःला सावरत उठू लागली... गयावया करत माफी मागू लागली...

"फक्त निलेशच नाही; तर इतर कोणालाही पुन्हा तुम्ही त्रास दिलात, तर यापेक्षाही वाईट अवस्था करेन! समजलं?" सूरज रागाने ताकीद देत त्या मुलांना म्हणाला.

"हो... होय... आम्ही पुन्हा कुणालाही त्रास देणार नाही..." त्या टोळक्यांचा म्होरक्या कण्हत बडबडला. आणि त्याने निलेश व मघाशी चेष्टा चालवलेल्या मुलाची व त्याचसोबतच सूरजची देखील माफी मागितली...

"सॉरी..."

रॅगिंग होत असलेल्या मुलाने कृतज्ञतेने सूरजचा हात हातात घेतला.

"थँक्यू सर..." तो सद्गदीत म्हणाला.

सूरजने राग झटकून स्मित केले.

"इट्स ओके. पण अशा लोकांना प्रतिकार करायला शिका. आपली भीती हीच यांची ताकद असते." तो म्हणाला.

"हो सर." तो मुलगा सूरजचे म्हणणे मान्य करत उद्गारला.

"पुन्हा जर काही त्रास झाला, तर सब-इंस्पेक्टर शोएबकडे जायचं. ते तुम्हाला हवी ती मदत करतील. सगळयांना सांगा. ओके?" सूरजने त्या मुलाला व निलेशला एकत्र सूचना केली.

दोघांनी माना डोलावल्या. सूरजने मग नजरेनंच त्या रॅगिंग करणाऱ्या मुलांना जाण्याची खूण केली. वेदना होत असलेली मुलं आपापल्या क्लासरूमकडे निघून गेली. सूरजने मग त्या रॅगिंग झालेल्या मुलाला "या" म्हणत जायला सांगितले.

मुलगा हो म्हणत त्याच्या वर्गाकडे निघून गेला. सूरज निलेशकडे वळला.

"चल तुला तुझ्या वर्गात सोडतो." तो म्हणाला.

निलेशने पुन्हा मान डोलावली. तो पायऱ्यांच्या दिशेनं चालला. सूरजने त्याला फॉलो केलं. चालता चालता त्याची नजर वर गेली. त्याला दिसलं, की दुसऱ्या मजल्यावर पोर्चमध्ये काही मुली खाली पाहत उभ्या होत्या. त्यांच्यात आत्ताच झालेल्या मारामारीबद्दल चर्चा सुरू होती... अनुज्ञाही त्यांच्यातच होती आणि ती सूरजकडेच पाहत होती. अनुज्ञाला पाहून सूरज जणू संमोहितच झाला होता... अगदी पाहताक्षणी!

अनुज्ञाला नीट पाहता यावे म्हणून त्याने इतकावेळ डोळ्याला लावलेला त्याचा गॉगल काढला आणि अनुज्ञाकडे पाहतच पायऱ्यांपाशी पोहोचला. अनुज्ञाच्याही हे लक्षात आल्याशिवाय राहिलं नाही... आणि त्यामुळेच ती क्लासरूममध्ये निघून गेली. तिच्या मागून मग तिच्या मैत्रिणीही गेल्या. निलेश व सूरज यांनी पायऱ्या चढून वर्गाचा मार्ग धरला...

निलेश व मागून सूरज वर्गात आले. सूरजचं नशीब असेल वा निव्वळ योगायोग, पण अनुज्ञा ही निलेशच्याच वर्गात होती. गावातील कॉलेज असल्याने साहजिक मोकळं वातावरण नक्कीच नव्हतं. साहजिक मुलांची व मुलींची बैठक व्यवस्था वेगवेगळी होती. ती प्रवेशाला लागूनच असलेल्या मुलींच्या रांगेत पहिल्या बाकावर बसली होती. तिचं बोलणं त्याच्या कानांवर पडत होतं...

"सकाळी रडत का होतीस?" अनुज्ञाने तिच्या एका मैत्रिणीला विचारलं.

"पप्पांचं डायलॅसिस करायचंय. पुरेसे पैसे नाहीत... पार्टटाईम जॉब मधून तेवढे उभे राहत नाहीत... बॉस पण एडव्हास द्यायला नाही म्हणतायत... त्यांनी याआधी मदत केली आहे, पण आत्ता जमणार नाही म्हणतायत..." ती मैत्रिण खिन्न चेहऱ्याने म्हणाली.

"संध्याकाळी माझ्या सोबत घरी चल. बाबा देतील." अनुज्ञाने तिला क्षणात चिंतामुक्त करण्याचा प्रयत्न केला.

"तू कशाला...?" ती मैत्रीण संकोचत म्हणाली.

"गप्प! नाही तर मार खाशील." असे म्हणून अनुज्ञाने विषय व वाद निकालात काढला आणि ती गोड हसली.

त्या काळजीत असलेल्या मैत्रिणीला देखील अनुज्ञाच्या बोलण्याचं हसू आलं. सगळं टेन्शन विसरून मैत्रीण देखील हसली. मैत्रिणींची पुन्हा काहीतरी बोलाचाली सुरू झाली. इथून पुढे सूरजला त्यांचं बोलणं ऐकू येणं बंद झालं होतं. तो अनुज्ञाला पाहत संमोहित झालेला होता. वर्गातला बाकीचा गोंगाट देखील त्याच्यासाठी शांत झालेला होता... त्याला फक्त अनुज्ञा मैत्रिणींसोबत बोलताना, हसताना दिसत होती. सूरज  निलेशच्या मागून मुलांच्या रांगेपाशी पोहोचला. नजर अनुज्ञावरच! निलेश पहिल्या बेंचवर बसणार, तोच सूरजने अनुज्ञाकडे मनमोहित होऊन पाहत निलेशला मागे खेचून स्वतः तेथे थोडं आत सरकून बसला. मग निलेशही गोंधळलेल्या मन:स्थितीत बॅग काढून सूरज शेजारी बसला. सूरजचं डेस्कवर झुकून अनुज्ञाला पाहणं चालूच होतं. हे पाहून मग निलेशला सगळा प्रकार लक्षात आला. सूरज अनुज्ञाच्या प्रेमात पडला होता!

"दादा जातोयस ना?" निलेश चेष्टेने म्हणाला.

"अं? हो..." अनुज्ञाला संमोहित झालेला सूरज एवढंच उद्गारला.

सूरज पापणीही न लवता अनुज्ञाकडे पाहत होता. अनुज्ञाला देखील हे जाणवलं होतं, पण त्याच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून अनुज्ञा हसत तिच्या मैत्रिणींसोबत बोलत होती...

'जणू असंख्य सूर्य-तारे अनुज्ञाच्या तेजाने प्रकाशित होण्यासाठी तिच्या आजूबाजूला घिरट्या घालताहेत असं सूरजला भासू लागलं होतं...'

"अनुज्ञा जाधव!" निलेश उद्गारला.

सूरजचं संमोहन भंगल्यासारखं तो भानांवर आला. त्याने अचानक निलेशकडे पाहिलं.

"हा? काय?" सूरजने गोंधळून विचारलं.

"तू इतका वेळ ज्या मुलीकडं बघतोयस, तिचं नांव!" निलेश हसत चेष्टेने म्हणाला.

"कोण मुलगी? मी कोणत्याही मुलीकडं बघत नाही... मी... मी तर बाहेर बघत होतो...!" सूरज अधिक गोंधळून गडबडून बोलला.

"हो... ते आलंय माझ्या लक्षात!" निलेशने पुन्हा खुदकत सूरजची मस्करी केली.

एमबेरेस होऊन सूरज जाण्यास उठला. त्याला जागा देण्यासाठी निलेश उठून बाजूला झाला. सूरज वर्गातून बाहेर आला. तोच पोर्चमध्ये एक वॉचमॅन सूरजसमोर येऊन उभारला. सूरजला थांबावं लागलं. अनुज्ञा तिरकस नजरेने सूरजकडे पाहत होती. हे लक्षात आल्यावर सूरजने तिच्याकडे पाहिलं. पण अनुज्ञाने नजर फिरवली.

"प्रिन्सिपल सरांनी बोलावलंय." वॉचमन तोंडातली तंबाखू सावरत सूरजला म्हणाला.

सूरजने त्याच्याकडं पाहून फक्त मान हलवून 'हो' म्हंटलं व अनुज्ञाकडे आणखी एक नजर टाकून वॉचमॅनच्या मागून निघून गेला. सूरजची नजर तिच्याकडे फिरताच अनुज्ञाने त्याच्यावर पुन्हा रोखलेली आपली नजर त्याच्या पासून हटवलेली होती.

"वाचायला येतंय ना?" सूरजने चालता चालता वॉचमनला विचारलं.

"हो येतं की!" तंबाखूची मळी तोंडातून खाली पडू नये म्हणून वॉचमन तोंडवर करून म्हणाला.

"तंबाखूच्या पुडीवर मोठ्या लक्षात लिहिलेलं असतं. तंबाखूने कर्करोग होतो. ते वाचता की नाही? खाणं बंद करा! निदान कॉलेजमध्ये तरी... मुलं शिकतात इथं. हेच शिकायचं का त्यांनी..." असं आणि बरंच काही सूरज वॉचमनला झापत होता.

आणि पर्याय नसल्याने वॉचमन ऐकून घेत होता. तंबाखूमुळे तोंड उघडता येत नव्हतं ना...

पायऱ्या उतरून खालच्या पोर्चला आल्यावर कॉलेज ऑफिस क्रॉस केलं, की प्रिन्सिपलचं ऑफिस होतं. वॉचमॅनने बोटानेच केबिन दाखवली. नखांमध्ये चुना व तंबाखूचे कण तसेच होते. याला बोलून काही फायदा नाही हे लक्षात येऊन सूरजने वैतागाने मान डोलावली. वॉचमन निघून गेला होता. सूरजने प्रिन्सिपलच्या केबिनच्या दरवाजावर नॉक केलं. प्रिन्सिपलने वर पाहिलं.

"या. आत या." प्रिन्सिपल सूरजला म्हणाले.

सूरज डेस्कपाशी आला.

"बसा." प्रिन्सिपल खुर्चीकडे नजर करून बोलले. त्यांच्या आवाजात जरब नव्हती, पण अधिकारवाद नक्कीच होता.

सूरज समोर बसला.

"आपण आमच्या विद्यार्थ्यांना का मारलंत?" प्रिन्सिपलनी शांत आवाजात जाब विचारायला सुरूवात केली.

"गरज होती. मी सूरज क्षीरसागर. फ्रॉम सीआयडी. आपल्या कॉलेजमध्ये शिकत असलेला निलेश जांभळे माझ्या मित्राचा भाऊ. ती मुलं त्याची आणि इतर विद्यार्थ्यांची रॅगिंग करत होती. म्हणून मी त्यांना थोडी शिस्त शिकवण्याचा प्रयत्न केला!" सूरज शांतपणे बोलला.

"तसं असेल, तर धन्यवाद ऑफिसर! अशा असुरी प्रवृत्तींना आळा घालणं गरजेचंच आहे." प्रिन्सिपल.

"तुम्हाला खरंच असं वाटत असेल, तर अशा घटनांकडे दुर्लक्ष करणं बंद करा! तुमचं कॉलेज इतकं काही मोठं नाही की हे प्रकार तुम्हाला समजू नयेत. माझं भांडण तुमच्यापर्यंत आलंच की. पुन्हा असं काही झालं; तर तुम्हीही सुटणार नाही! येतो मी!" सूरज शांत स्मित चेहऱ्यावर घेऊन धमकी वजा बोलून गेला.

प्रिन्सिपल मात्र आपली चूक लक्षात येऊन गंभीर झाले.

सूरज बसस्टॉपच्या रस्त्यावरून पोलीस स्टेशनच्या दिशेने ड्राइव्ह करत होता...

सूरजच्या कारमध्ये, सूरज ब्लुटूथच्या माध्यमातून बोलत होता...

"शोएब, नंदनचा काही ट्रेस?" त्याने स्टेशन इंचार्ज ऑफिसर असलेल्या त्याच्या मित्राला विचारलं.

"नाही. दिनेशला माहीत असलेल्या सगळया ठिकाणी छापे मारलेत. पण नंदन काही मिळाला नाही. कुठं अंडरग्राऊंड झालाय काय माहीत. त्याच्या महत्त्वाच्या माणसाला माहीत नाही म्हणजे काय?" शोएब पलिकडून बोलला.

"आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. दिनेश आपल्या ताब्यात असल्यानं नंदन दिनेशला माहीत असलेल्या ठिकाणी लपणं शक्य नाहीच. पण आपल्याला तो काहीही करून मिळाला पाहिजे! मी येतोय पोलीस स्टेशनला. बोलू आपण..." सूरज शोएबला म्हणाला.

गाडी चालवत असताना समोरील विंडशील्ड्च्या काचेतून त्याची नजर समोरच्या एंटरेन्समधून आपल्या मैत्रिणींसोबत बसस्टॉपमध्ये जाणाऱ्या अनुज्ञावर पडली. सूरजने तातडीने कॉल कट केला.

बाहेर - सूरजने त्याच्याही नकळत कार बाजूला पार्क केली. सूरज पुन्हा तिच्याकडे संमोहित होऊन गाडीतून उतरला. अनुज्ञाकडे पाहतच त्याच्या जवळील एंटरेन्सकडे चालू लागतो...

समोर स्टॉपवर सूरजचे मित्र उभे होते.

"सूरज!" एका मित्राने सूरजला हाक मारली.

त्या हाकेने सूरज भानांवरती आला. त्याने आवाजाच्या दिशेने पाहिलं. सूरजचे पाच मित्र फ़ज़लसह तेथे उभे होते. आनंदाचं स्मित सूरजच्या चेहऱ्यावर उमटलं. तो वेगाने आपल्या मित्रांकडे पळाला.

"अरे तुम्ही सगळे इथं काय करताय?" त्याने त्यांच्याकडे जात त्यांना विचारलं.

तो मित्रांपाशी पोहोचला. फ़ज़लने खुल्या दिलाने हसत सूरजच्या खांद्यावर हात ठेवला. फ़ज़लने स्माईल करत सूरजला जवळ घेतलं.

"सांगतो. ती समोर मुलगी आहे ना, ती मला खूप आवडते यार!" तो म्हणाला.

सूरजच्या कदाचित लक्षात आलं होतं, की फ़ज़ल कोणाबद्दल बोलतोय...

"कोण मुलगी?" सूरजने खात्री करण्यासाठी फ़ज़लला मध्येच थांबवत विचारलं.

फ़ज़लने हसत अनुज्ञाकडे बोट केलं.

"ती गुलाबी ड्रेसची." फ़ज़ल म्हणाला.

सूरजने त्या दिशेने पाहिलं आणि त्याची भीती सत्यात उतरली.

"एका डील संदर्भात तिच्या वडिलांच्या घरी गेलो होतो. तेव्हा पहिल्यांदा पाहिलं. आणि..." फ़ज़ल बोलत होता...

आणि त्याचवेळी सूरजचे भाव अचानकच पूर्ण बदलले. त्याला कळलं, की फ़ज़ल देखील अनुज्ञाच्याच प्रेमात पडलाय. सूरजने अचानक रागाने फ़ज़लची कॉलर पकडली. त्यामुळे फ़ज़ल मध्येच बोलायचा बंद झाला होता. सर्वच मित्र सूरजच्या या सडन रिएक्शनने गोंधळून गेले...

"काय झालं सूरज?" एका अभिजीत नांवाच्या मित्राने गोंधळून 'फ़ज़लला सोड' हे इंडिकेट करण्यासाठी सूरजच्या खांद्यावर हात ठेवून सूरजला विचारलं.

"बिकॉज आय लव हर अभिजीत!" सूरजने अधिकच चिडून अभिजीतकडे पाहिलं.

"कोण?" फ़ज़लने गोंधळून चेहऱ्यावर आठ्या आणत विचारलं.

"अनुज्ञा!" हे नांव मोठ्याने उद्गारून सूरजने चिडून फ़ज़लकडे पाहिलं व कॉलरवरची पकड घट्ट केली.

अभिजीतने सूरजचा हात दूर करण्यासाठी त्याच्या खांद्यावरील आपली ग्रीप अधिक बळकट केली.

"हे बरोबर नाही सूरज. तसं असेल, तर तुम्ही दोघेही प्रयत्न करा. कोणाला मिळेल त्याला मिळेल..." तो म्हणाला.

हे ऐकून सूरजचा पारा अधिकच चढला. त्याने फ़ज़लला मागे ढकललं. दोन मित्र फ़ज़लला सपोर्ट देण्यासाठी पुढं झाले व त्यांनी फ़ज़लला पडण्यापासून सावरलं.

सूरजने चिडून ओरडत अभिजीतला छातीवर पंच केलं. आणि...

"शी इज नॉट ए ट्रॉफी!" तो ओरडला!

सूरजच्या मारण्याचा इम्पॅक्ट इतका होता, की अभिजीत मागे ढकला गेला व जोरात खाली पडला. हे पाहून फ़ज़ल सूरजच्या दिशेनं जरा पुढं झाला. सूरजने फ़ज़लकडे धाव घेतली. त्याने फ़ज़लच्याही पोटात किक केली. फ़ज़ल मागे जाऊन त्याला आधार दिलेल्या मित्रांना घेऊन खाली पडला. मग आणखी दोन मित्र सूरजला शांत करण्यासाठी त्याला पकडण्याचा प्रयत्न करू लागले,

पण सूरजच्या संतापाला ते देखील बळी पडले. त्याने त्यांनाही मारलं. हे चालू असताना बसस्टॉप वरील लोकांची त्यांच्या भोवती गर्दी गोळा झाली होती. आणि अनडाऊटेड्ली त्या गर्दीत अनुज्ञा व तिच्या मैत्रिणी देखील होत्या. आणि हा सगळा प्रकार अनुज्ञाच्याही नजरेखालून गेलेला होता...

सूरजचा मार खाल्याने मित्र जमिनीवर पडून विव्हळत होते. सूरज फ़ज़लपाशी आला. फ़ज़लच्या तोंडातून रक्त येतं होतं. सूरज त्याच्यापाशी बसला. त्याने त्याची कॉलर पकडली...

"पुन्हा जर अनुंकडे त्या नजरेनं पाहिलंस, तर तुला माहीत आहेच, की मी काय करू शकतो ते!" सूरज फ़ज़लला रागाने म्हणाला.

फ़ज़लही आता पुरता चिडला होता. त्याने त्याच्या कॉलरवरील सूरजचा हात झटकला आणि त्याला मागे ढकललं. सूरजचा बॅलन्स गेला. सूरज मागे होऊन सावरत उभारला. फ़ज़ल धगधगती नजर सूरजवर रोखलेली ठेवून तोंडातून आलेलं रक्त एका हाताने पुसत पोट धरून तो सावरत उभारला.

"सूरज्या! एका मुलीसाठी तू मित्रांवर हात उचललास! आपली इतक्या वर्षांची मैत्री विसरलास तू! साल्या!..." फ़ज़ल चिडून जागेच भान न ठेवता ओरडला.

पण सूरजला पुढं बोलण्यात काही अर्थ नाही हे लक्षात येऊन  फ़ज़लने बोलणं थांबवलं व इतर मित्रांना उभारण्यास मदत केली. एकमेकांना सावरत सूरजचे पाचही मित्र मग फ़ज़लच्या जिप्सीमध्ये बसून निघून गेले. अनुज्ञासह जमलेले सगळे सूरजकडेच पाहत होते. अनुज्ञाच्या चेहऱ्यावर गोंधळलेले भाव... तिला लपवता लपवत नव्हते. या भांडणामागे तीच मूळ होती हे तिच्याच समोर उघड जे झालं होतं...

अनुज्ञा आपल्याकडेच पाहत आहे हे एक नजर तिच्याकडे टाकल्यावर सूरजच्या लक्षात आलं. म्हणून मग सूरज अनुज्ञाची नजर चुकवून त्याच्या गाडीत जाऊन बसला व घराच्या दिशेने निघून गेला...

सूरज अनुज्ञाची वाट पाहत कॉलेज बाहेर बाईकवर बसून होता. त्याचा मोबाईल वाजला. दुरून अनुज्ञा येताना त्याला दिसत होती. तिच्याकडे प्रेमाने हरवून बघत त्याने न पाहताच फोन रिसिव्ह केला...

"हॅलो?" सूरज मोबाईलमध्ये.

"अरे सूरज, अजून किती दिवस लागणार आहेत तुला?" चीफ फोनमधून.

चीफचा आवाज ऐकून सूरज भानांवर आला. फोनवर चीफ असल्याचं त्याला लक्षात आलं.

"येस सर?" त्याने विचारलं.

"अरे मी म्हणालो, अजून किती दिवस लागणार आहेत नंदनला पकडायला?"

"सॉरी सर. एक्चुअली, नंदन सापडत नाहीये. मी इथले पोलीस कॉन्टॅक्स वापरून त्याला शोधण्याचा प्रयत्न करतोय. पण अजून तरी काही ट्रेस नाही." सूरज अपराधीपणे.

"ऑल राईट." चीफ.

"सर, तुम्हाला एक गोष्ट सांगायची होती..." सूरज संकोचत मोबाईलमध्ये.

"सूरज तू लाजतोयस?" चीफनी आश्चर्याने हसून विचारलं.

"नाही. तसं नाही. पण... इथं एक मुलगी भेटलीये. आणि... पाहताक्षणी मी त्यांच्या प्रेमात पडलोय... मला कळालं नाही, हे कसं..." सूरजने आपली भावना बोलून दाखवली, पण एक्साईटमेंट लपवण्याचा प्रयत्न केला.

"अरे या वयात असं होतंच. बरं कोण आहे ती मुलगी जिनं तुझ्यासारख्या संन्याशावर मोहिनी टाकली?" चीफ हसून बोलले.

"अनुज्ञा; नांव त्यांचं." सूरजने नांव सांगितलं.

"वाह! मस्त नांव आहे! अनुज्ञा... अनु! सूर्याचा; सूरजचा शक्तीस्रोत! छान! छान!" चीफ हसत पलिकडून म्हणाले.

"त्यांच्याशी बोलणं झालं तर मी तुम्हाला त्यांचा फोटो पाठवतो." सूरज चीफला म्हणाला.

"ठिक आहे पाठव. आणि केसकडेही लक्ष दे." चीफनी त्याला सूचना केली.

"हो सर!"

म्हणत सूरजने कॉल कट केला. तो अनुज्ञाला गेट मधून आत जाताना पाहत उभा राहिला. अनुज्ञाला कळालेलं होतंच, की सूरज तिच्यासाठीच तिथं आलाय, पण त्याच्याकडे न पाहता ती आत निघून गेली होती. सूरजही मग बाईक स्टार्ट करून निघून गेला...

संध्याकाळची वेळ... सूरज बाजूला बाईक लावून बस स्टॉपवर अनुज्ञाच्या प्रतीक्षेत थांबला होता. अनुज्ञा व तिची मैत्रिण नंदिनी कॉलेजकडून आल्या... त्यांनी एकमेकांना "बाय!" केलं.

नंदिनी बससाठी बाजूला उभारली आणि अनुज्ञा रिक्षात जाऊन बसली. रिक्षात ड्रायव्हर नव्हता. अनुज्ञाला रिक्षात एकटीला पाहून अनुज्ञाशी बोलण्याची ही चांगली संधी आहे असे वाटून सूरज तिच्या दिशेने चालू लागला. त्याचं सगळं लक्ष अनुज्ञावर असल्यानं बाजूने येणाऱ्या कारला तो थडकला. कार ड्रायव्हरने लगेच ब्रेक मारला. कार थांबली. सूरज खाली पडला. एक्सिडेंटचा इम्पॅक्ट मोठा नसल्याने सूरजला इजा झाली नव्हती. पण हे पाहून अनुज्ञा चांगलीच घाबरली होती. तिचा श्वास अडकला होता...

"ये मरायचाय काय?" कार ड्रायव्हर रागाने ओरडला.

इम्पॅक्ट लहान असल्यानं सूरजला काही झालेलं नव्हतं. तो उभारला व अनुज्ञाकडे पाहतच त्याने आपले कपडे झाडले. अनुज्ञा त्याच्याकडेच पाहत होती. त्याला गाडीला थडकलेलं पाहून लटकलेला तिचा श्वास त्याला सुखरूप पाहून मोकळा झाला. ती रिलॅक्स झाली.

"आएम सॉरी!" सूरज शांतपणे कार ड्रायव्हरला म्हणाला.

व सूरज रिक्षाकडे चालला. सूरजला आपल्याच दिशेने येताना पाहून मग अनुज्ञा दुसरीकडे पाहू लागली.

"लोकांना बघून चालायला काय होतं कोण जाणे?!" असं स्वतःशीच रागाने बडबडत कार ड्रायव्हरने कार चालू करून रस्ता मोकळा केला.

रिक्षात - सूरज येऊन अनुज्ञाच्या शेजारी बसला. त्याच्या अचानक अशा वागण्याने अनुज्ञाला ऑकवर्ड् वाटू लागलं. ती जरा सावरूनच बसली.

"हाय. मी सूरज क्षीरसागर. मी दोन मिनिटं आपल्याशी बोलू शकतो?" मनात असिमीत भीती असताना सूरज कसं तरी साहस एकवटून अनुज्ञाला बोलला.

"नाही!" क्षणाचाही विलंब न लावता थोडं रागानेच अनुज्ञाने सूरजचं साधं बोलण्याचं प्रपोसल देखील धुडकावलं!

"प्लिज..." सूरजची भीती गायब झाली होती, पण असंख्य दुःखाने त्याचं मन भरून गेलं होतं... त्याने कळवळीने आर्जव केली होती...

पण नाही! काहीच फायदा झाला नव्हता... त्याची विनंती अनुज्ञाकडून पुन्हा धूडकावली गेली...

"नाही!" अनुज्ञा आवाजात पूर्वीपेक्षा अधिक कठोरता आणत ओरडली.

"ठिक आहे अनु. मला माहिती आहे तुमचा माझ्याबद्दल काय समज झालाय ते.... पण मी वाईट नाही ओ. आणि तुम्ही सूंदर आहात म्हणून मी तुमच्यावर प्रेम करतोय असंही नाही... मी पहिल्यांदा तुमच्याकडे अट्रॅक्ट झालो हे खरंय, पण मी प्रेम मात्र तुमच्या गुणांकडे पाहूनच केलंय. आपल्यातला हा निष्पाप, निरागस आणि हा साधेपणा मला खूप भावला. मला माहितेय अनु; मी

जे बोलतोय, ते कदाचित तुम्हाला पटणार नाही. पण हेच सत्य आहे! माझ्याकडून जर तुम्हाला काही त्रास झाला असेल, तर प्लिज मला माफ करा..." सूरज निराशेनेच बोलला आणि...

...आणि तो निराश मनःस्थितीतच तेथून निघून गेला... पण त्याला आपल्या पायाखाली काहीच जाणवत नव्हतं. जणू जमीन त्याच्या पायाखालून सरकली होती...

सूरज हताश होऊन त्याच्या बाईककडे येऊन बाईकवर बसला. मान खालीच. काहीवेळाने त्याने वर रिक्षाकडे पाहिलं. अनुज्ञा अजिबात त्याच्याकडे पाहत नव्हती! मुद्दाम दुर्लक्ष करत होती. आणि हे त्याला समजत होतं. अनुज्ञाच्या चेहऱ्यावर त्याला बेफिकिरी दिसत होती. तिचा चेहरा कोरडा होता. जणू तिला काही वाटतच नाही... आणि हेच सूरजला निराश करणारं होतं. आशा संपल्यासारखं त्याला झालं. काही वेळाने रिक्षाचालक रिक्षात येऊन बसला. रिक्षा निघून गेली. सूरज त्या रिक्षाकडे ती जाईपर्यंत पाहत राहिला. पण अनुज्ञाने काही त्याच्याकडे शेवटपर्यंत पाहिलं नाही. रिक्षा गेली तशी अनुज्ञाची मैत्रीण नंदिनी सूरज जवळ आली...

"एक्स्क्यूज मी..."

सूरजने तिच्याकडे पाहिलं.

"हाय. मी नंदिनी. अनुज्ञाची फ्रेंड!" ती पुढं म्हणाली.

"हॅलो. मी सूरज क्षीरसागर." सूरजने भावना रहितपणे आपलं नांव सांगितलं.

"सॉरी, पण मी तुला अनुज्ञाशी बोलताना पाहिलं. तू काळजी करू नको. मला वाटतं, ती देखील तुझ्यावर प्रेम करते. कारण मघाशी तुझा एक्सिडेंट झाला ना, तेव्हा तिच्या डोळयांत तुझ्या विषयीची काळजी बघितलीय मी." नंदिनी सूरजला आश्वस्त करत म्हणाली.

"मी पण पाहिलंय. पण कळत नाही त्या का मान्य करत नाहीत..." सूरज खिन्नपणे खाली पाहत बोलला.

"मेबी घरातल्यांच्या विचाराने असेल..." नंदिनीने शक्यता बोलून दाखवली.

"असेल...!" सूरजलाही ती पटली.

त्याने नंदिनीकडे पाहिलं व स्माईल केलं. तरी चेहऱ्यावरची निराशा काही लपली नव्हती.

"इनीवे थँक्स! गुड बाय!" सूरज नंदिनीला म्हणाला.

"बाय!" नंदिनी हसून बोलली.

सूरजने बाईक चालू केली आणि घराचा रस्ता धरला. नंदिनी देखील परत पूर्व स्थानी जाऊन बसची वाट पाहू लागली.

अनुज्ञाचे क्लासरूम... सूरज आत आला. कॉलेज सुरू होण्यास वेळ असल्याने वर्गात विद्यार्थी कमी होती. अनुज्ञा नेहमी प्रमाणे पहिल्या रांगेत. तिने त्याच्याकडे पाहिलं, पण सूरज तिच्याकडे न पाहता निलेशच्या दिशेने निघून गेला. निलेशही मुलांच्या पहिल्या रांगेत पुस्तक वाचत बसला होता.

"हाय!" सूरजने स्मित करत निलेशला हाक दिली.

"अरे दादा? तू इथं?" आवाजाच्या दिशेने पाहत निलेशने विचारलं. सूरजला पाहून त्याच्या चेहऱ्यावर हसू उमटलं होतं.

सूरज त्याच्यापाशी पोहोचला.

"आलोय तुला भेटायला." हसतच तो म्हणाला.

सूरज उडी मारून निलेशच्या पलीकडे बसला. जेणेकरून त्याला अनुज्ञाला पाहता येईल.

"मला, की दुसऱ्या कोणाला?" निलेश हसून चिडवत म्हणाला.

सूरजने थोडं चिडून निलेशकडे पाहिलं. निलेशने खोटं घाबरून पुस्तकात बघितलं. सूरजने चेष्टेतच निलेशचा हात धरून पिरगळला व त्याचे तोंड बेंचवर दाबले.

"तुला गप्प काही बसवत नाही; होय का नाही!" तो निलेशला म्हणाला.

"अरे दादा! सोड की दुखतंय!" निलेश हसत, पण वेदनेने ओरडला.

निलेशला तसाच धरून सूरजने अनुज्ञाच्या दिशेने पाहिलं. पण अनुज्ञा तेथे नव्हती. सूरजकडे पाहणाऱ्या अनुज्ञाच्या मैत्रिणी चपापल्या व त्यांनी एकमेकींकडे पाहत बोलणं कंटीन्यू ठेवलं.

"अरे अनु कुठं गेल्या?" सूरज गोंधळून पुटपुटला.

आणि त्याने निलेशला सोडले.

"तू आत आलास त्याचवेळी ती चिडून बाहेर गेली." निलेश अवघडलेली मान सैल करत बोलला.

"अरे मग आधी सांगायचं नाहीस का?" म्हणत सूरज घाईने उठत बोलला.

सूरज बेंचवरून उडी मारून दरवाज्याकडे पळू लागला.

"पण तू तर मला भेटायला आलायस ना?" निलेशने पुन्हा सूरजची मस्करी केली.

सूरजने मागे फिरून निलेशच्या डोक्यात मारलं व बाहेर पळाला. सूरजची अधीर अवस्था पाहून निलेशला काही हसू आवरलं नाही.

संपूर्ण पोर्च मोकळा होता. एकटी अनुज्ञा बाल्कनीत कठड्याला टेकून बाहेर पाहत उभी होती. सूरज तिच्याकडे गेला.

"हाय!" सूरजने स्मित करून अनुज्ञाकडे पाहत तिला अभिवादन केलं.

अनुज्ञाने त्याला काहीच प्रतिक्रिया दिली नाही. सूरज पण मग गंभीर होऊन पुढं पाहू लागला,

"अजूनही आपला माझ्याबद्दलचा राग गेला नाही तर..." तो तिला म्हणाला.

"नाही; तसं नाही. पण मला वाटलं होतं, तू इथं मला भेटायला आलायस; पण तू तर माझ्याकडं पाहिलं देखील नाहीस..." सूरजचा गैरसमज दूर करत अनुज्ञा त्याला म्हणाली.

"मी काल बोलायला चुकीची जागा निवडली ना?" सूरजने तिला विचारलं.

"हं..." अनुज्ञा होकारार्थी उद्गारली.

"माझ्याही ते लक्षात आलं. आणि आजची जागा ही तशीच आहे. म्हणून... मला माफ करा अनु. खरं तर मी इथं तुम्हाला भेटण्यासाठीच आलोय. पण काय आहे ना, माझं थोडं काम आहे. ते झालं, की मी लगेच तुमच्या वडिलांशी आपल्याबद्दल बोलायचं म्हणतोय. पण तोपर्यंत माझ्यामुळं तुमच्या चारित्र्यावर कोणी संशय घेतलेला मला चालणार नाही. म्हणून मी तुम्हाला इग्नोर केलं... सॉरी." सूरज गंभीरपणे अनुज्ञाकडे पाहत बोलला.

"आय एम सॉरी सूरज. मी तुझं इंटेन्शन समजू शकले नाही..." अनुज्ञाने माफी मागितली.

"इट्स ओके." म्हणत सूरजने स्मित केलं,

" एक फोटो काढू?" थोडं संकोचत सूरजने विचारलं.

त्याच्या अशा अचानक विनंतीने अनुज्ञा जरा दचकली. ते पाहून सूरज तिला म्हणाला,

"म्हणजे आपली परवानगी असेल तरच."

थोडा विचार करून अनुज्ञाने त्याला फोटो काढण्यास परवानगी दिली. सूरजने स्मित करून तिचा फोटो काढला. तिला दाखवला. अनुज्ञाही फोटो पाहून हसली.

"अचानक फोटो का?" सूरजच्या नजरेला नजर देत तिने विचारलं.

"माझ्या सरांना पहायचंय तुम्हाला."

अनुज्ञा जरा बावरली.

"डोन्ट वरी ही इज ट्रस्टवर्दी. ही इज लाईक फादर टू मी. माझं काम झालं, की आपलं बोलणं करून देईन. चालेल ना!" सूरजने तिचा संकोच दूर केला.

मग अनुज्ञाने मान डोलावून परवानगी दिली.

"बरं चला. मी निघतो." सूरज तिला म्हणाला.

"बाय!" अनुज्ञाने गोड स्मित करून सूरजला निरोप दिला.

सूरज अजूनच ब्रॉड स्माईल करून निघून गेला. जाता-जाता त्याने अनुज्ञाचा फोटो चीफला मेल केला.

संध्याकाळची वेळ होती... सूरज बाईकवरून बसस्टॉपला आला. अनुज्ञा व तिच्या मैत्रिणी बसस्टॉपमध्ये असणाऱ्या एका प्लाझा बाहेर उभ्या होत्या. फ़ज़ल देखील त्यांच्या मागे उभा होता. पण त्याने आपलं तोंड टी-शर्टच्या हूडने झाकून घेतलं होतं. नाकापर्यंत कव्हर करणारा मास्क घातला होता. तो सहज ओळखू येत नव्हता. सूरज त्यांच्या दिशेने येऊ लागला. नंदिनीने अनुज्ञाला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी सूरजला खूण केली. पण तिला काय म्हणायचंय ते सूरजच्या लक्षात आलं नाही. सूरज अनुज्ञापाशी पोहोचला. तशी अनुज्ञा त्याला इग्नोर करून निघून गेली. सूरज पुरता गोंधळला.

"यांना काय झालं?" सूरजने नंदिनीला विचारलं.

"आज तारीख काय?" नंदिनीने विचारलं.

"लक्षात नाही. आएम बॅड विथ डेट्स... का?" सूरजने गोंधळूनच उत्तर दिलं.

"२६ एप्रिल!" नंदिनीने सूरजकडे होपलेस लूक दिला. हळू किंचाळत ती ओरडली.

"हा मग?" सूरजला अजूनही काही समजलं नव्हतं.

"म्हणजे तुला काहीच माहीत नाही?" नंदिनीने त्याला विचारलं.

"नाही..." सूरज निरागसपणे म्हणाला.

"आज तिचा वाढदिवस आहे. पण अजून तू तिला विश केलं नाहीस. तू येण्याआधी हाच विषय चालू होता. म्हणून तर तुला खुणवून तिला विश करायला सांगत होते." हा किती मूर्ख आहे असा भाव चेहऱ्यावर आणत नंदिनी सूरजला म्हणाली.

"खरं तर आज त्यांचा वाढदिवस आहे हे मला माहीतच नव्हतं. त्यांनी कधीच मला सांगितलं नाही..." सूरज साळसूद बोलला.

नंदिनीने कपाळावरच हात मारून घेतला.

"बरं आता तरी विश कर तिला. जा!" ती म्हणाली.

"पण कसं?" त्याने विचारलं.

"आता हे पण मीच सांगू?" नंदिनी वैतागाने बोलली.

"प्लिज..." भोळा चेहरा करून सूरजने विनंती केली.

'याचं काही होऊ शकत नाही' या विचाराने नंदिनीने मान डोलावली. तिला एक कल्पना सुचली. तिने तिच्या वहीत ठेवलेलं गुलाब काढून सूरजला दिलं.

"हे घे. दे तिला. आणि तिला एका चांगला रेस्टॉरंटला घेऊन जा." नंदिनी सूरजला म्हणाली.

"थँक्स!" फूल घेत सूरज हसून नंदिनीला म्हणाला.

नंदिनीने स्माईल केलं. सूरज अनुज्ञा गेलेल्या दिशेला पळाला...

रिक्षा स्टॉपजवळ - सूरजने पहिल्या रिक्षात नजर टाकली. अनुज्ञा आत बसलेली होती. रिक्षाचालक रिक्षा चालू करणार इतक्यात सूरज घाईने जाऊन रिक्षा समोर उभारला.

"थांबा!" तो रिक्षा चालकाला बोलला.

अचानक आवाजाने रिक्षाचालकाने चुकून क्लच सोडला आणि रिक्षा झटक्याने थांबली. सूरज धावत जाऊन अनुज्ञा शेजारी बसला. त्याने अनुज्ञाला गुलाब ऑफर केला. अनुज्ञा रागातच होती. ती गुलाब न स्विकारता सूरजकडे दुर्लक्ष करून चालकाला बोलली...

"रिक्षा सुरू करा!"

चालक रिक्षा सुरू करणार इतक्यात सूरजने गडबडीने त्याचं पाकीट बाहेर काढलं.

"नको थांबा!" 100₹ ची नोट चालकासमोर धरून सूरज त्याला म्हणाला.

नोट पाहून चालक खूप खुश झाला. त्याची लालची नजर त्या नोटेकडे आशाळभूत पाहत आहे हे अनुज्ञाने ताडले म्हणून मग अनुज्ञाने पण चालकाला 200₹ ची नोट देऊ केली.

"चला!" ती रागात म्हणाली.

चालक अजूनच खूश झाला व लोभी स्मित चेहऱ्यावर घेऊन त्यानं दान स्वीकारल्यासारखं दोन्ही हातांनी ती नोट अनुज्ञाच्या हातून घेतली.

सूरज व अनुज्ञा पुन्हा-पुन्हा त्याला पैसे देऊ लागले. सूरज रिक्षा थांबवण्यासाठी, तर अनुज्ञा रिक्षा चालू करण्यासाठी...

"याला म्हणतात, भगवान देता है तो छ़प्पर फाड़ के देता है। या दोघांची अशीच रोज भांडणं व्हावीत, म्हणजे रोज आपला पण फायदा होत राहील..." चालक आनंदाने पुटपुटला.

एका पॉईंटला मात्र सूरजचे पैसे संपले. अनुज्ञाने चालकाला 500₹ ची नोट देऊ केली.

"आय वोन! आता करा रिक्षा चालू!" ती बोलली.

सूरजने मग निराश होऊन रिक्षाचालकाकडून सगळे पैसे परत घेतले. आपले पैसे मोजून घेऊन त्याने अनुज्ञाने दिलेले पैसे चालकाच्या हाती परत ठेवले.

"साहेब..." चालक कळकळीने उच्चारला.

"आता तुम्ही रिक्षा चालू करणार ना. मग तुम्हाला माझ्या पैशांची काय गरज...?" सूरज अनिच्छेने आपले पैसे परत पाकिटात ठेवत बोलला.

मग अनुज्ञानेही आपले पैसे चालकाच्या हातून हिसकावले.

"ताई..." चालक पुन्हा हळहळला.

आणि त्याने आपले हात पैशांच्या दिशेने पुढे घेतले. पण अनुज्ञावर काही परिणाम झाला नाही. तिने पैसे तिच्या पर्समध्ये ठेवले. निराश होऊन चालकाने मग हात मागे घेतले.

"त्याने पैसे परत घेतले ना; मग मी का नको घेऊ?" अनुज्ञा चालकाला म्हणाली.

"साहेब; ताई! हवं तर दोघंही पैशे देऊ नका. तुम्हाला हवं तिथं फुकट नेऊन सोडतो. पण कृपा करून गरिबाचा असा छळ करू नका..." चालक कळकळीने हात जोडून बोलला.

आता मात्र सूरज खरंच गंभीर झाला.

"माफ करा दादा. मला फक्त दोन मिनिटं द्या." तो चालकाला म्हणाला आणि त्याने अनुज्ञाकडे पाहिलं,

"अनु, तुमचा वाढदिवस असून मी तुम्हाला विश केलं नाही म्हणून तुम्ही नाराज आहात ना? पण विचार करा अनु, तुम्ही मला तुमचा वाढदिवस कधी असतो हे कधी सांगितलंच नाहीत. मग मला कसं माहीत असेल?..."

"तू कधी विचारलंस का पण? मी सांगितलं नाही म्हणून काय झालं? तुलाही माझ्याविषयी जाणून घ्यावंसं वाटलं नाही!" अनुज्ञाने तिला वाटणारी भावना बोलून दाखवली.

"मला तुमच्याशी कर्तव्य आहे अनु! ना की तुमच्या बॅकग्राऊंडशी! तुम्ही कुठल्या घरच्या, तुमचा जन्म कुठं, कधी झाला याच्याशी मला देणं-घेणं नाही. तुम्ही आहात; इतकंच माझ्यासाठी महत्त्वाचं आहे. तरीही मी चुकलोय असं जर तुम्हाला वाटत असेल, तर आएम सॉरी!"

असं बोलून सूरजने रिक्षातून बाहेर पाऊल टाकलं.

"सॉरी..." अनुज्ञा बोलून गेली.

हे ऐकून सूरजचा चेहरा आनंदी झाला. तो पुन्हा आत बसला आणि त्यानं गुलाब पुन्हा अनुज्ञाला ऑफर केलं.

"हा गुलाब नंदिनीने दिला ना?" अनुज्ञाने हसत सूरजला विचारलं.

"तुम्हा मुलींना सगळं कसं कळतं?" सूरज तिला हसून म्हणाला.

कसं व्हायचं तुझं?"अनुज्ञाने हसून तो गुलाब घेतला.

सूरजही हसला,

"तुम्ही सोबत आहात. चांगलंच होईल." तो म्हणाला.

अनुज्ञाला अजूनच हसू आलं.

"माझ्यासोबत याल?" सूरजने पुन्हा तिला विचारलं.

"कुठं?" अनुज्ञाने विचारलं.

"सरप्राईज आहे!" सूरज तिला म्हणाला.

"तुम्ही काळजी करू नका. तुमचं भाडं चुकलेलं नाही." सूरज चालकाला बोलला आणि त्याने पाकिटातून काढून 500₹ चालकाला देऊ केले.

"पण भाडं तर चाळीस रुपयंच आहे..." चालक गोंधळून म्हणाला.

"असू द्या. शिवाय आमच्या भांडणात तुम्ही रेफ्रि झालातच की!" सूरज त्याला हसून म्हणाला.

चालकाने मग मनमोकळं हसून पैसे घेतले.

"त्रास दिल्याबद्दल सॉरी!" सूरजने पुन्हा एकदा चालकाची माफी मागितली.

"देव करो आणि तुमची जोडी अशीच कायम टिकून राहो!" चालक स्मित करत दोघांना आशीर्वाद देत म्हणाला.

सूरज व अनुज्ञा यांनी अभिवादनाचं स्मित केलं. आणि दोघे रिक्षातून उतरले.

अनुज्ञा व सूरज बाईकच्या दिशेने चालू लागले. नंदिनी व इतर मैत्रिणी रिक्षाकडे पाहतच उभ्या होत्या. अनुज्ञाने हात हलवून त्यांना बाय केलं. सूरज अनुज्ञाच्या नकळत नंदिनीला ओठ हलवून 'थँक्स' म्हणाला. आणि सूरज व अनु बाईकवर बसून निघून गेले.

बाहेर जरा अंधारलं होतं. अनुज्ञा व सूरज रेस्टॉरंटमध्ये बसले होते. त्यांचा टेबल मधोमध व दरवाजासमोर होता. भोवती काही इतर कस्टमर देखील रेस्टॉरंटमध्ये होतेच. सूरजने प्रेमाने अनुज्ञाचा हात हाती घेतला होता...

"हॅपी ब'डे अनु! मेनी मेनी हॅपी रिटर्न ऑफ द डे!" सूरजने स्मित करत अनुज्ञाला शुभेच्छा दिल्या.

"आत्ता खऱ्या अर्थाने माझा ब'डे हॅपी झाला!" अनुज्ञा हसून म्हणाली.

आणि तिने दुसरा हात सूरजच्या हातावर प्रेमाने ठेवला. काही क्षणांतच मग तिने मूड चेंज केला.

"बरं मला सांग, तू काही घेत नाहीस? एकटीसाठीच ऑर्डर दिलीस. बिलाची काळजी वाटते?" अनुज्ञाने चेष्टा केली.

"नाही तसं नाही. मी बाहेरचं काहीच घेत नाही." सूरज हसत म्हणाला.

"का?" जरा विचित्र वाटून अनुज्ञाने विचारलं.

"मी कॉलेजमध्ये असताना मी आणि माझे मित्र नेहमी या रेस्टॉरंटला यायचो. एक दिवस मी पाहिलं, एक लहान मुलगा दोन दिवस जेवला नाही म्हणून भीक मागत होता." सूरज कारण सांगू लागला. तो गंभीर होत पुढे म्हणाला,

"मला सांगा अनु, आपल्या देशात असेही लोक आहेत, ज्यांना पोटभर अन्न पण मिळत नाही. तेव्हा आपण असं नको त्या गोष्टींवर पैसे खर्च करणं कितपत योग्य आहे?..."

अनुज्ञाही गंभीर झाली. तिने सूरजचे दोन्ही हात हातांत घेतले.

"सूरज; या जगात इतकं साधं राहून नाही चालत रे... कधी कोण आपला गैरफायदा घेईल, सांगता येत नाही. मघाशी ही तू काही कारण नसताना त्या ड्रायव्हरला ५०० रुपये दिलेस..." अनुज्ञा गंभीरपणे सूरजला समजावत म्हणाली.

सूरजने ओल्या डोळयांनी, जड ओठांनी स्मित केलं.

"काही नाही ओ! आपण सगळयांशीच चांगलं वागलो, तर कशाला कोण आपल्याशी वाईट वागतंय?! काही झालंच तर आपण आहातच की मला सावरायला! आणि त्या ड्रायव्हरचं म्हणत असाल, तर त्याने ५०० रुपयांच्या बदल्यात लाख मोलाचे आशीर्वाद दिलेच की! दॅट वॉज अ ग्रेट डील! वॉजन्ट इट? कष्ट करणाऱ्यांचे आशीर्वाद कधी वाया जात नाहीत अनु!"

सूरजच्या या उत्तराने अनुज्ञा अधिक चिंतित झाली,

"तू समजतोस तितकं हे जग साधं-सरळ नाही रे!" ती कळकळीने व काळजीने म्हणाली.

"लेट्स फर्गेट अबाऊट इट फॉर नाऊ! आपण दुसरं काही तरी बोलू. एक मिनिट..." सूरजने हात बाजूला घेत विषय बदलला. त्याने वेटरला हाक मारली,

"दादा!"

आणि ऑर्डर झाली का अशी खूण केली. वेटरने जागेवरूनच 'थोडावेळ लागेल' हे सांगणारी खूण केली. सूरजने मान डोलवली. मग...

"तू तुझ्याबद्दल काही सांग ना. इतक्या दिवसांत आपण एकमेकांबद्दल नीट बोलूच शकलो नाही. तू तुझ्या कामाबद्दल काही बोलला होतास..." अनुज्ञा सूरजशी काही बोलावं म्हणून बोलली.

"आणि ही चूक कोणाची?" सूरज तिला थांबवत मस्करीत बोलला.

अनुज्ञाने सूरजच्या हातावर मारले. सूरजला हसू आवरले नाही. त्याचवेळी, त्यांच्या टेबलावरील पाण्याची बाटली अचानक एक्सप्लोड झाली. याने अनुज्ञा घाबरली. सूरजने मात्र निर्भीडपणे दरवाज्याकडे पाहिलं. इतर कस्टमर्स पण गोंधळून सूरजच्या टेबलकडे व एंटरन्सकडे पाहत होते. ५ गुंड समोर उभे होते. त्यांची तोंडे कव्हर केलेली. त्यांच्या मागे चेहरा लपवलेला फ़ज़ल देखील होताच. त्यांतील समोरच्या माणसाच्या हातात गन होती आणि ती त्याने असुरी हास्य चेहऱ्यावर घेत सूरजवर रोखलेली होती. त्याने गन खाली घेतली. तो सूरज व अनुकडे आला. सूरजला चिडवण्यासाठी त्या माणसाने अनुज्ञाच्या दिशेने हात नेला. सूरजच्या मस्तकात आग गेली. त्याने त्याचा हात मधेच अडवून धरला आणि पिरगळला. इतक्या जोरात, की त्या माणसाचा चेहरा टेबलवर आदळला. सूरजने त्याच्या तोंडावर फुलफोर्सने पंच केला. काच फुटली. त्या माणसाचं तोंड टेबलच्या आरपार गेलं होतं आणि तुटलेल्या काचेने जखमी झालं होतं. अनुज्ञा घाबरून उठली. कस्टमर्सही घाबरलेले, गोंधळलेले. हा प्रकार पाहून इतर चार थोडे दचकले. सूरज उठून त्यांच्याकडे फिरला. सावरून ते सूरजच्या दिशेने पळत आले. सूरजने पायाने आपली खुर्ची त्यांच्या दिशेने भिरकावली. एकाला ती खुर्ची हिट झाली. पण इतर तीन पुढे आलेच. सूरज त्यांच्याशी फाईट करून लागला...

घाबरलेल्या कस्टमर्सनी ही संधी साधून रेस्टॉरंट सोडले. सूरजने सगळ्या गुंडांचा प्रतिकार करून त्यांना खाली पाडलं. परिस्थिती सूरजच्या हातात आहे हे पाहून कामगार व मॅनेजर तेथे आले.

"सीआयडी! यु ऑल आर अंडर अरेस्ट!" सूरज त्या गुंडांना म्हणाला.

त्याने एका गुंडापाशी वाकून त्याची कॉलर पकडली,

"बोल तुला कोणी पाठवलंय!" सूरजने रागाने पृच्छा केली.

"नंदन... नंदन इनामदार...!" गुंड कण्हत त्याच्या एम्प्लॉयरचं नांव सांगून गेला.

"कुठं भेटंल तो?" सूरजने त्या गुंडावर नजर रोखत पुन्हा विचारलं.

"म... माहीत नाही... फ... फोनवरनं काम दिलं..."

सूरजने त्याची कॉलर झटकली. तो उभारला. मॅनेजरकडे वळला.

"यांना बांधून ठेवा. पोलीस स्टेशनला फोन करा. आणि तुमचं जे काही नुकसान झालंय, ते यांच्याकडून भरून घ्या!" सूरज मॅनेजरला म्हणाला.

"हो सर..." मॅनेजर.

सूरज अनुज्ञाकडे वळला. पण अनुज्ञा सूरजकडे दुर्लक्ष करून तेथून निघून गेली. सूरज पुन्हा मॅनेजरकडे वळला.

"काही प्रॉब्लेम आला, तर कॉल करा." सूरजने मॅनेजरला सूचना केली.

मॅनेजरने मानेने 'हो' म्हंटलं. आणि मग सूरज अनुज्ञाच्या मागे पळाला...

दरवाजाजवळ फ़ज़ल हूड घालून उभा होताच. सूरजने त्याला क्रॉस केलं, पण गडबडीत फ़ज़लला नोटीस केलं नाही. फ़ज़लनेही अधिक सावधगिरी म्हणून तोंड वळवून घेतलं. सूरज गेटबाहेर धावत गेला. एव्हाना रात्र झालेली होती.

रेस्टॉरंट बाहेर रागावलेली अनुज्ञा रिक्षाला आवाज देत उभी होती. हे पाहून सूरज बाईक पार्कींग मधून काढून अनुज्ञाकडे घेऊन आला.

"काय झालं अनु? अशा अचानक का निघून आलात?" सूरजने गोंधळून तिला विचारलं.

आतापर्यंत सूरजला दुर्लक्षित करणारी अनुज्ञा निराशेने पण रागावून त्याला बोलली...

"तू मला सांगितलं का नाहीस, की तू सीआयडी ऑफिसर आहेस!"

सूरज हसला. म्हणाला,

"आपल्यात तसं बोलणं कधी झालंच नाही. तसंही त्यानं काय फरक पडतो अनु? "

अनुज्ञा सूरजकडे पाहून ओरडली,

"फरक पडतो!"

मग जागेचं भान लक्षात घेत शांत होत दुसरीकडे पाहत बोलू लागली,

"हे बघ सूरज, तुला मी किंवा तुझी नोकरी यांपैकी एकाची निवड करावी लागेल!"

अनुज्ञाची अट ऐकून सूरज शॉक्ड् झाला.

"अनु..." त्याच्या तोंडून तिचं नांव अचानक बाहेर पडलं.

"हे तुझं असं सततचं भांडणं... तेही एकवेळ मी सहन केलं असतं. कारण तू साधारण व्यक्ती असतास, तर तुझी ही सवय मला सोडवता आलीही असती... पण, आता तीही सोय नाही... तू जर सीआयडी ऑफिसर आहेस हे आधी कळलं असतं, तर..." अनुज्ञा डिसपॉईंटिंग्ली बोलली.

"तर?" सूरज अविश्वासाने विचारलं.

"तूला होकारच दिला नसता..." अनुज्ञा रूडली बोलून गेली.

"मी विनाकारण कोणाशीही भांडत नाही अनु! गुन्हेगारी रोखणं हे माझं काम आहे..." सूरज तिचं वाक्य तोडत गंभीरपणे बोलला.

"असू देत!" अनुज्ञा ओरडली.

तिने सूरजपासून नजर चोरली. ती भावुक झाली. दीर्घ श्वास सोडला...

"पुढं तू जीवंत घरी येशील, की नाही या काळजीत मी रोज क्षणाक्षणाला मरत राहणार... मला हे असलं आयुष्य नकोय...!" ती म्हणाली.

सूरजनेही तिच्यापासून नजर फिरवली. तो ठामपणे म्हणाला,

"अनु! माझं काम; म्हणजे माझं कर्तव्य! आणि मी कोणत्याही परिस्थितीत माझ्या स्वार्थासाठी माझ्या कर्तव्याचा त्याग नाही करणार!"

सूरजचा निर्णय ऐकून अनुज्ञा अधिकच रागावली. तिनेही  तिचं तोंड फिरवलं...

"असं असेल, तर माझा विचार सोड! आपण एकमेकांपासून दूर राहिलेलंच बरं! गुड बाय!" अनुज्ञाने ठामपणे आपला निर्णय सुनावला.

"अनु?..." सूरज अजूनच शॉक्ड् झाला. तो स्तंभित झाला. काय बोलावं, काय करावं त्याला कळेना...

"जमीन आणि आकाश कधीच एक होऊ शकत नाही सूरज!" अनुज्ञा गंभीरपणे बोलून गेली.

"होतं ना... क्षितिजावर..." सूरजला काही केल्या अनुज्ञाला सोडायचं नव्हतं. तिच्या विचाराला छेद देण्याच्या इच्छेने निराशपणे त्याने खाली पाहत तिला उत्तर केलं.

अनुज्ञाला त्याच्या या वाक्याचा मात्र रागच आला. तो आलेला राग कंट्रोल करत तिने सूरजकडे पाहिलं,

"हं! तो फक्त आभासच असतो. वास्तव तर हेच आहे ना, की दोघांमधलं अंतर हे कधीच न भरून निघणारं आहे! आपल्यातलं अंतर पण तसंच आहे, कधीही भरून न निघणारं!" ती म्हणाली.

आणि जोरात रिक्षाला आवाज दिला...

"रिक्षा! रिक्षा!"

काही वेळ तसाच गेला. सूरजला काय बोलावं समजत नव्हतं. तो खाली मान घालून होता फक्त. अनुज्ञा समजून घेईल याच आशेवर... पण नाही! अनुज्ञाही शांतच राहिली. तिने आपला निर्णय जो सुनांवला होता...

रिक्षा आली. अनुज्ञा रिक्षात बसली. आपली शेवटची आशाही संपली आहे हे त्याला आतून जाणवलं. टचकन त्याचे डोळे भरून आले. पण पर्याय नव्हता. मार्ग नव्हता. अनुज्ञाने तर तो कधीच बंद करून टाकला होता...

रिक्षा गेली. गहिवरल्या डोळ्याने व त्याहून दुःखाने खोल गेलेल्या हृदयाने सूरज असहाय्यपणे जाणाऱ्या रिक्षाकडे पाहत त्याच्या बाईकवर बसून राहिला फक्त. त्या रिक्षाचा पाठलाग करावा असा एकदाही विचार त्याच्या मनात आला नाही. कदाचित काही फायदा होणार नाही हे त्याला माहित असावं!

सूरजच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. डोळे पाण्याने भरल्याने जाणारी रिक्षा त्याला अंधुक दिसू लागली... वेगाने जात ती रिक्षाही नाहीशी झाली...

त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी सूरज पुन्हा कॉलेजवर आला. कॉलेज सुरू व्हायला अवकाश होता. विद्यार्थी कॉलेज मध्ये येत होते. सूरज पळत कॉलेज कॅम्पसमध्ये आला. नंदिनी मैत्रिणींसोबत मेन गेट मधून नुकतीच आत येत होती. सूरज त्यांना क्रॉस करूनच आला होता, पण आपल्याच विचारात असलेल्या सूरजने त्यांना नोटीस केलं नव्हतं. नंदिनीनेच मागे सूरजकडे पाहून त्याला हाक मारली,

"सूरज!"

सूरज घाईनेच वळून नंदिनीकडे आला.

"इतक्या गडबडीत का आहेस?" तिने विचारलं.

"अनु कुठं आहेत?" त्याने अधीरतेने विचारलं.

"ती आज येणार नाही. कालचं तुमचं भांडण मिटलं नाही अजून?"

"ते मिटलं होतं हो, पण आता वेगळाच प्रॉब्लेम सुरू झालाय..." तो निराशेने म्हणाला.

"म्हणजे?" नंदिनीने विचारलं.

"मी सीआयडी ऑफिसर आहे. आणि ही गोष्ट कळल्यावर त्या चिडून निघून गेल्या. त्यांच्या मते, एक तर मी माझा जॉब सोडावा नाही तर त्यांना विसरून जावं." सूरजने नंदिनीला सांगितलं.

"अरे पण तिला तर आधीपासूनच माहीत होतं हे..." नंदिनी चिंतित होत म्हणाली.

"हो? कसं?" सूरजला हे खूपच शॉकिंग होतं. सूरजने विचारात गढून नंदिनीला विचारलं.

"निलेशकडून कळालं होतं."

"मग त्यांनी असं का करावं?" सूरजचा गोंधळ वाढला होता...

नंदिनीने त्याच्याकडं क्लूलेस एक्सप्रेशन दिले. तिलाही हे तितकंच धक्का देणारं ठरलं होतं, जितकं ते सूरजसाठी होतं.

"नंदिनी, तुम्हाला त्यांचं घर माहीत असेल ना?" सूरजने काही तरी आठवल्यासारखं नंदिनीला विचारलं.

"हो माहितीय ना." नंदिनी तितक्याच तत्परतेनं म्हणाली.

"पत्ता सांगता?" सूरज अधीरतेने विणवला.

"शिवाजी पेठ. घर नं. एकोणपन्नास." नंदिनी म्हणाली.

"धन्यवाद!" सूरज क्षणाचा विलंब न लावता गेटकडे पळाला.

"काय ते कळंव." नंदिनी ओरडून त्याला म्हणाली.

पुढं जात सूरज मागे नंदिनीकडे पाहून ओरडला,

"हो!"

आणि तो बाईकवर बसून दिसेनासा झाला...

सूरज अनुज्ञाच्या घराबाहेर पोहोचला होता. बराच वेळ तो आशेने अनुज्ञाच्या घराकडे पाहत रस्त्याकडेला बाईकसोबत थांबला होता. सकाळची संध्याकाळ झाली होती... अमेय अनुज्ञाचा लहान भाऊ, वय वीस. पुष्ट अशी शरीरयष्टी असलेला अमेय कुठेतरी जाण्यासाठी घराबाहेर आला तेव्हा त्याची नजर सूरजवर पडली. बहुदा सकाळ पासून त्याने सूरजला इथंच पाहिलं असावं. शंकीत नजरेने तो त्याच्या बाईकवर सूरजकडे पाहत बसून राहिला. हे सूरजच्या लक्षात आलं. आणि मग अमेयला आणखी संशय येऊ नये म्हणून सूरज बाईक स्टार्ट करून निघून गेला.

सूरज बाईकवर बसून होता. कॉलेज सुटल्याने विद्यार्थी कॉलेजमधून बाहेर येत होते. अनुज्ञाही तिच्या मैत्रिणींसोबत कॉलेजमधून बाहेर आली. सूरज बाईक घेऊन तिच्याकडे आला. त्याला समोर पाहून अनुज्ञा व मैत्रिणी थांबल्या.

"अनु, मला तुमच्याशी बोलायचंय!" सूरज गंभीरपणे खाली पाहत बोलला.

"पण मला काहीच बोलायचं नाही!" अनुज्ञा कठोरता शब्दांत आणत बोलली.

ती पुढं चालली. मैत्रिणीही तिच्या मागून गेल्या. नंदिनी मात्र सूरजपाशीच थांबली.

"काही काळजी करू नको. मी समजवते तिला." नंदिनी आश्वस्त करत त्याला म्हणाली.

सूरजने खाली पाहतच हताशपणे होकारार्थी मान हलवली. नंदिनी अनुकडे गेली. सूरज मात्र त्यांच्याकडे पाहण्याची हिंमत करत नव्हता... काय होणार आहे याचा त्याला अंदाज असावा...

"अनु..." नंदिनीने अनुज्ञाला हाक मारली.

"सूरजबद्दल बोलणार असशील, तर मला ऐकून घ्यायचं नाही! आणि सूरजला सांग, मी कोणा दुसऱ्यावर प्रेम करते! त्या मुलाला जलस फिल व्हावं म्हणून मी त्याच्याशी फक्त प्रेमाचं नाटक केलं होतं!" अनुज्ञा रागावून सूरजला ऐकू जाईल अशा आवाजात थोडं मोठ्यानेच ओरडली होती.

सूरजने थोडावेळ डोळे बंद करून घेतले. डोळे उघडले व बाईक चालू करून वळाला. तो बसस्टॉपच्या दिशेने निघून गेला.

सूरज बाईक कडेला लावून बसस्टॉपवर बाईक सोबत थांबला होता. अनुज्ञा आली. त्याच्याकडे दुर्लक्ष करून मैत्रिणींचा निरोप घेऊन रिक्षाच्या दिशेने गेली. मैत्रिणी बससाठी वाट पाहत उभारल्या. अनुज्ञा रिक्षात बसली. रिक्षा निघून गेली. सूरज मात्र निराशेने जाणाऱ्या रिक्षाकडे पाहत उभारला...

रात्रीच्या वेळी सूरज अनुज्ञाच्या घराकडे येऊन बाईकसह रस्त्यापलीकडे घरासमोर उभारला होता. सूरजला काही जाणवलं. त्याने खिडकीकडे पाहिलं. त्याला दिसलं, की अमेय रागाने सूरजकडेच पाहतोय. दोघांची नजरानजर झाली. आणि मग अमेय काही काळासाठी दिसेनासा झाला. पण काही क्षणांतच अमेय रागाने घराबाहेर येत असलेला सूरजला दृष्टीगोचर झाला.

अमेय सूरजजवळ आला.

"काय हवंय?" अमेयने रागाने सूरजला विचारलं.

"क... काही नाही..." सूरज गोंधळला.

"मग इथं का उभायस?"

"मी... मी..." सूरज इतकंच पुटपुटला. काय उत्तर द्यावं हे तक्षणी त्याला सुचलं नाही.

अमेयने चिडून सूरजची कॉलर पकडली...

"रोज तुला इथं घुटमळताना बघतोय मी! पुन्हा जर इथं दिसलास, तर हात-पाय तोडून ठेवीन! समजलं?!" अमेयने धमकी दिली!

सूरजची नजर पुन्हा खिडकीकडे गेली. त्याला दिसलं, की अनुज्ञा पडद्याआडून चिंतित भाव चेहऱ्यावर घेऊन बाहेर त्यांच्याकडे पाहत उभी होती...

अमेयने सूरजची कॉलर अजून घट्ट पकडली. अधिक चिडून...

"तिकडं काय बघतोयस ए?" तो सूरजला जाब विचारत ओरडला.

अमेयने मागे पाहिलं. त्याला अनुज्ञा दिसली. यामुळं अमेयचा जास्तच पारा चढून त्याने सूरजला ढकलून दिलं. सूरज बॅलन्स जाऊन मागे असलेल्या घराच्या भिंतीला थडकला. खाली पडणारी बाईक सूरजला टेकून राहिली.

"दीदीच्या मागं कोणीतरी लागलाय हे मला समजलं होतंच! तो तूच आहेस तर!!!" अमेय असिमित रागाने ओरडला.

सूरजची नजर अनुज्ञाकडे होती. ती घाबरून घाईने बाहेर येऊ लागली... अमेयने पुन्हा सूरजची कॉलर पकडली. दोघांच्या झटापटीत सूरजला टेकलेली बाईक अमेयने पुन्हा अटॅक केल्याने त्या इम्पॅक्टने खाली पडली. तक्षणी अनुज्ञाने तिथं पोहोचून अमेयचा हात सूरजच्या कॉलर पासून बाजूला घेतला. आणि ती सूरजवर ओरडली...

"का माझ्या मागे लागलायस? मी तुला माझं उत्तर दिलंय ना?! अनेकदा सांगूनही समजत नाहीत का तुला? मी आणखी किती वेळा सांगावं लागणार आहे? निघून जा इथून, माझ्या आयुष्यातून! मला तुझं तोंड सुद्धा पहायचं नाही!" पण हे बोलत असताना तिचे डोळे मात्र पाणावले होते. तिला दुःख लपवायचं होतं, पण ते लुप्त होत नव्हतं!

अनुज्ञाने सूरजला ताकीद दिली आणि ती जाण्यासाठी वळली. सूरजला रहावलं नाही.

"अनु..." सूरजने पाणावलेल्या डोळ्यांनी आशेने अनुज्ञाला साद घातली...

पण याने अनुज्ञा अधिकच चिडली. मागे वळून तिने सूरजला मुस्काटात मारली...

## ९. वर्तमान - तारीख: २३ एप्रिल -

अनुज्ञाने सूरजला मारलेला आवाज सूरजच्या कानात घुमत होता... सूरज अचानक मोठा श्वास घेत भानावर आला. चेहरा घामाने थबथबलेला. घाम संपूर्ण चेहऱ्यावरून ओघळत होता. चीफ लगबगीने उठून लाईट स्विच शोधू लागला.

"तुम्ही सुखी रहाल अशी आशा करतो..."

"तुला कळत नाही का ती काय म्हणाली?! आता जर पुन्हा कधी तू मला इथं दिसलास, तर जगायच्या लायकीचा ठेवणार नाही! कळालं? निघ इथून!..."

अनुज्ञाने मारल्या नंतरचा अमेय व सूरजचा संवाद सूरजच्या कानात घुमला. दरम्यान चीफला स्विच सापडला. त्याने लाईट चालू केले आणि परत सूरजकडे आला.

"सूरज... सूरज, ठिक आहेस ना? सूरज!" चीफने काळजीने त्याला हलवत सूरजला पूर्ण जागं करण्याचा प्रयत्न केला.

सूरज नीट भानावर येऊ लागला. त्याचा मोठ्याने श्वासोच्छवास चालूच होता...

"ठिकाय... ठिकाय..." सूरज अस्वस्थपणे म्हणाला... आपल्याला होणारा त्रास लपवण्याचा तो नाहक प्रयत्न करत होता... जो त्याच्या अवस्थेपुढे हरला होता खास... तरी... स्वतःला सावरत सूरज निश्चयी म्हणाला,

"पण सर, मी ही केस हँडल नाही करू शकत...!"

चीफ शॉक्ड् झाला.

"का?" त्याने सूरजला विचारलं.

पण सूरज काहीच बोलला नाही. त्याने उत्तर देणं टाळलं.

"मित्च्! बोल सूरज!" चीफ वैतागाने ओरडला.

पर्याय नाही पाहून सूरज स्वतःला सावरत परिस्थिती कथन करू लागला,

"गांवात एक टी-फॅक्टरी आहे. त्या फॅक्टरीतले कामगार चहाच्या थैलींतून आसपासच्या गांवांत ड्रग्स सप्लाय करतात. त्यांची इन्क्वायरी करण्याचं काम मी स्विकारलंय..."

"असं असेल, तर याची इन्क्वायरी एनसीबी करेल!" चीफने पर्याय सुचवला.

"फॅक्टरीचे मालक माझ्या ओळखीचे आहेत. त्यांच्या फॅक्टरीत जे काही चालू आहे, त्यात त्यांचा अजिबात हात नाही. त्यामुळं ते यात अडकू नयेत म्हणून मी या सगळयाची चौकशी करावी अशी त्यांची इच्छा आहे. म्हणून या संदर्भात मी तुम्हालाही काही बोललो नाही..." शांतपणे सूरजने चीफची सूचना धुडकावून लावली,

"मला माफ करा सर; पण ही केस मी नाही स्वीकारू शकत!" तो निश्चयी बोलला.

"पण तू तिच्यावर प्रेम करतोस ना?!" चीफ वैतागून, थोडं रागावून ओरडला.

सूरजवर याचा काही परिणाम झाला नाही. तो शांतपणे म्हणाला,

"हो. पण मला माझ्या स्वार्थापेक्षा माझं कर्तव्य जास्त महत्त्वाचं आहे. प्लिज सर; ही केस तुम्ही दुसऱ्या कोणाला तरी द्या. प्लिज!" सूरज कळवळला.

"मला माहितेय सूरज, हे फक्त एक कारण आहे. तू तुझ्या दुःखांपासून पळण्याचा प्रयत्न करतोयस. आणि कर्तव्यच तुझ्यासाठी महत्त्वाचं आहे ना, तर जा; वाचव त्या मुलीला! एक माणूस म्हणून, एक ऑफिसर म्हणून आणि तिचा प्रियकर म्हणून देखील तिचं रक्षण करणं हेच तुझं कर्तव्य आहे! हे विसरू नको!" सूरजला टीज करण्यासाठी चीफ म्हणाला,

"ते काही नाही! ही केस तूच हँडल करणार आहेस. अँड इट्स माय ऑर्डर! दॅट्स इट!" थोडं थांबून चीफने आपला फायनल निर्णय सुनावला.

"पण सर..." सूरज कंविन्सिंग्ली ओरडला.

चीफ काही ऐकून न घेता खात्री देत सूरजला म्हणाला,

"काही काळजी करू नको. एनसीबीच्या तपासात फॅक्टरी ओनर खरंच निर्दोष आढळले, तर मी त्यांना काही होऊ देणार नाही. मी पर्सनली लक्ष घालीन ना. विश्वास ठेव माझ्यावर. मी वचन देतो तुला!" काहीही करून त्याला सूरजला कामासाठी तयार करायचंच होतं.

"तसं नाही सर, पण त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवलाय. त्यामुळं त्यांची मदत करणं हे माझं पहिलं कर्तव्य आहे. म्हणून म्हणतोय. शिवाय मीच या प्रकरणाचं इन्वेस्टीगेशन करीन असं मी त्यांना वचन दिलंय." सूरजने आपली बाजू बोलून दाखवली.

थोडा विचार करून तो परत निश्चयी बोलला,

"सर, मला फक्त एका दिवसाची मुदत द्या."

"२ दिवस देतो! पण त्यानंतर तुला मी सांगेन ते करावं लागेल. दरम्यान या किडनॅपिंगचं प्रायमरी इन्वेस्टीगेशन जोश्वा करेल." चीफ तातडीने बोलला.

सूरजने असहाय्य होकरार्थी मान डोलावली. तोच बाहेरून कोणीतरी दार ठोठावलं.

"कोण?" सूरज ओरडला. कदाचित चीफवरचा राग इथं निघाला असावा.

"मी आहे!" बाहेरून सूरजच्या वडिलांचा आवाज आला.

सूरजने परवानगीसाठी चीफकडं पाहिलं. चीफने दार उघडण्यास इशारा केला. सूरजने लगबगीने दार उघडलं. सूरजचे वडील आत आले. चीफवर त्यांची नजर पडली.

"सर, नमस्कार!" वडिलांनी हसत त्यांना अभिवादन केलं.

"प्लिज सर म्हणून नका. नांव घेतलंत तर चालेल." चीफ स्माईल करत उभारला.

वडील हसले,

"बसा. बसा. आपण अचानक?" वडिलांनी चीफला विचारलं.

"आलो होतो सूरजला भेटायला." चीफ पूर्व जागी बसत म्हणाला.

वडील नकळत इमोशनल झाले...

"धन्यवाद मिस्टर गोम्स. तुम्ही सूरजला मुलासारखं सांभाळून घेता." ते चीफला म्हणाले.

चीफने स्माईल केलं...

"हो. म्हणूनच याच्या आयुष्यात काही प्रॉब्लेम असू नयेत असं वाटतं मला. शिवाय आपल्या एम्प्लॉईजची काळजी घेणं हे तर बॉसचं कामच असतं. नाही का?" तो म्हणाला.

वडिलांनी परत स्मित केलं,

"माहितेय मला." ते म्हणाले.

"पप्पा काही काम होतं?" दोघांच्या संभाषणात सूरज मधेच बोलला. वडिलांनी इथं थांबू नये असं त्याला वाटत असावं...

वडिलांनी सूरजकडे पाहिलं,

"नाही. काम काही नाही. तुला जेवायला बोलवायला आलो होतो. पण येण्याआधी चार दिवसासाठीचं तुझं सामान पॅक कर. नंतर गडबड नको." ते म्हणाले.

"का?" सूरजने विचारलं.

"माझ्या मित्राच्या मुलीचं लग्न आहे. आपल्या सगळ्यांना चार दिवस त्याच्या गांवी जावं लागणार आहे. उद्या निघायचंय." वडिलांनी स्पष्ट केलं.

आधीच त्याने स्वतः हाती घेतलेले जबाबदारी, मग चीफने सोपवलेलं काम आणि आता हे मध्येच काय...?

"सॉरी सर! तो कुठेही जाऊ शकत नाही! एक महत्त्वाची केस आहे. डिटेल्स डिस्क्लोज करू शकत नाही. पण सूरजची गरज आहे." चीफने वडिलांना इंटरप्ट् केलं.

"असं असेल, तर ठिक आहे. अफ्टर ऑल ड्युटी फस्ट!" वडील समजून घेत बोलले. पुढे म्हणाले,

"आम्हीच जातो. सूरज, काळजी घे स्वतःची. जेवणाची काळजी करू नको. शेजारी सांगून ठेवतो."

ते चीफकडे वळाले,

"मि. गोम्स, तुम्हीही आता जेवूनच जा."

"नाही नको. दुसरी एक मिटिंग आहे. त्यांच्यासोबत जेवण होईल. आपण नंतर निवांत बेत करू." चीफ हसत म्हणाला.

"बरं. चालू द्या तुमचं." वडीलही हसून बोलले.

"मी पण निघतोयच आता." चीफ म्हणाला.

"सूरज, जेवायला ये." वडील सूरजला बोलले.

सूरजने मान हलवली. वडील चीफकडे पाहून निरोपाचं स्मित करून खोली बाहेर पडले.

"बरं आता खूप रात्र झाली आहे. मी पण निघतो. टेक सम रेस्ट." चीफ उठून उभारत सूरजला म्हणाला.

"सर तुम्ही थांबला असता तर बरं झालं असतं." सूरज चीफला बोलला.

"नो थँक्स. मी हॉटेलरूम बुक केलीय. ओके देन, मी येईन परवा दिवशी. बाय!" चीफ स्मित करून म्हणाला.

सूरजनेही तणाव चेहऱ्यावर असून स्माईल केलं.

"गुड नाईट सर!" तो म्हणाला.

"गुड नाईट. इट समथिंग अँड हॅव सम स्प्लिप!" चीफ हसून बोलला व दाराजवळ गेला. सूरजने त्याला फॉलो केलं.

"सूरज, इथून पुढं तुला निवांत झोप लागेल; कायमचीच! हं! हे माझं वचन आहे तुला!" चीफ मनातल्या मनात म्हणाला आणि पुन्हा त्याने स्माईल केलं,

"गुड नाईट!" चीफ सूरजला म्हणाला.

चीफने जाता-जाता दार ओढून घेतलं. सूरजनेही दार आतून लॉक करून घेतलं. लाईट्स घालवून तो छताकडे पाहत बेडवर पडून राहिला... जेवायला जाण्याचं भान त्याला राहिलं नव्हतं...

## १०. तारीख: २४ एप्रिल -

उजाडलं होतं. सूरजचा रात्री कधीतरी डोळा लागला होता... सुर्यप्रकाश किलकिल्या फटीतून जागा मिळेल तसा आत डोकावला. त्यामुळे त्या प्रकाशाला तीव्रता होती. तो सरळ सूरजच्या डोळ्यांवर येत होता... त्या प्रकाशानेच सूरजला जाग आली. त्याने जवळच्या टेबलवरील मोबाईल घेतला. वेळ पाहिली.

मोबाईलमध्ये वेळ '8:47 am'. त्याने लॉक काढून विकासचा नंबर डायल केला.

"गुड मॉर्निंग साहेब. घरीच आहेत ना?" सूरजने मोबाईलवरून विकासला विचारलं.

"होय." विकास पलिकडून म्हणाला.

"बरं. मी येतो तिथं." सूरजने कॉल कट केला. त्याने मोबाईल बेडवर फेकून दिला आणि उठून बाथरूममध्ये गेला.

सूरज गाडी चालवत ब्लुटूथवर बोलत होता...

"शोएब, विकास साहेबांच्या फॅक्टरीतल्या पकडलेल्या माणसाला सोडून दे. त्याला सांग, त्यांच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही. फक्त त्यांना तुला हफ्ता पोहोचवावा लागेल. मग ते बिनधास्त त्याचं रॅकेट चालवू शकतात."

"ती माणसं विश्वास ठेवतील?" शोएबने पलिकडून शंका व्यक्त केली.

"त्याला म्हणावं, की तूला एक्शन घ्यायची असती, तर तू कधीच घेतली असतीस. विकासला तू फॅक्टरी चालू करायला भाग पाडशील अशी त्याला खात्री देऊन परसेन्टेजची मागणी कर. विश्वास बसेल त्याला. तो जाऊन त्याच्या बॉसला सांगेल. फॅक्टरी पुन्हा चालू झाली, तर त्यांना

रंगेहात पकडणं सोपं होईल. चौकशीसाठी माझ्याकडे वेळ नाही. मी खूप वेळ घालवलाय. हे करण्याशिवाय पर्याय नाही!" सूरज शोएबची शंका दूर करत म्हणाला.

"तू म्हणतोयस तर प्रयत्न करून बघू." शोएबने त्याची चिंता बाजूला सारली.

"पण त्याच्यावर लक्ष ठेव! कोणाला तरी त्याच्या मागे लाव." सूरजने सूचना केली.

"पण त्याला संशय येईल ना?" शोएब पुन्हा शंकीत झाला.

"आला, तरी आपला प्लॅन त्याच्या लक्षात येणार नाही. तू सांगितल्याप्रमाणं तो वागतोय का नाही हे पाहण्यासाठी तू त्याच्या मागावर माणूस ठेवलायस असंच त्याला वाटेल. मी विकास साहेबांच्याकडं जातोय. त्यांना फॅक्टरी चालू करण्यासाठी सांगणाराय मी. तू हे काम कर." सूरजने पुन्हा शोएबचं शंका निरसन केलं.

तरी हे फक्त अंदाज होते हेही सूरज लक्षात ठेवून होता... पण शोएबला मात्र तो पूर्ण आश्वसन देत होता.

"फाईन! बाय!" शोएबने पलिकडून कॉल कट केला... तो कामाला लागला असावा...

पण सूरजच्या विरोधातील प्लॅनमध्ये हा देखील सामील होता... मग या केसमध्ये त्याने सूरजला सपोर्ट का करावा... चीफसारखं सूरजला गाफील ठेवून आपल्या विश्वासात ठेवणं हा त्याचा उद्देश होता का...?

विकासच्या घराबाहेर सूरज पोहोचला, तेव्हा गाडीतून उतरताना त्याला एक व्यक्तीचा संशय आला. तो विकासवर नक्कीच पाळत ठेऊन असणार. कारण सूरजची गाडी येऊन थांबल्यावर व त्यातून सूरज उतरल्यावर तो जरा मागे सरकला होता. स्वतःला लपवण्यासाठी असावं... पण सूरजच्या नजरेतून त्याचा हा संकोच सुटला नव्हता. सूरज त्याच्याकडेच पाहत होता. सूरजला

त्याच्यावर संशय आलाय हे लक्षात येऊन तो माणूस तेथून घाईने निघू लागतो. सूरजने मग तडख त्याची पिस्टल बाहेर काढली. त्याच्यावर एम केली.

"माझी गोळी तुझ्यापेक्षा फास्ट आहे. टेस्ट करायची आहे?" सूरज त्याच्यावर नेम धरून म्हणाला.

पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेला तो माणूस मग थांबला. सूरजने त्याला जवळ येण्याचा इशारा केला. माणूस जवळ आला. सूरजने त्याच्याकडून मोबाईल काढून घेतला व स्विच ऑफ करून स्वतःच्या खिशात सारला. मग त्याचं बखोट धरून सूरजने मागून त्याच्यावर गन पॉईंट केली व त्याला विकासच्या घराकडे घेऊन गेला...

विकास त्याच्या घरात काही फाईल्स चेक करत सोफ्यावर बसला होता. सूरजने उघड्या दारावर नॉक केलं. विकासने दाराकडे पाहिलं. समोर सूरजला पाहून त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं, पण लगेच त्याच्या सोबतचा माणूस पाहून त्याच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला.

"अरे ये... ये ना." तो चिंतित त्याला म्हणाला.

सूरजने ग्राउंड फ्लोअरच्याच एका खोलीत त्या माणसाला लॉक केलं व तो विकासपाशी आला.

"त्याला ओळखता?" सूरजने विकासला आत्ता पकडलेल्या माणसाबद्दल विचारलं.

"हो. माझ्याच गोडाऊनमध्ये कामाला आहे!" विकास सचिंत म्हणाला.

"तुमच्यावर नजर ठेवून होता. मी नेईपर्यंत याला सोडू नका. नाही तर तुम्हाला धोका होऊ शकतो." सूरजने विकासला ताकीद दिली.

"हो. बस. आता कशी आहे तब्येत?" विकासने सूरजची ताकीद मान्य करत आपुलकीने चौकशी केली.

"बरी आहे..." सूरज त्याच्या बाजूला बसत म्हणाला.

"अरे या लोकांनी कंपनीच्या व्यवहारात सुद्धा अफरातफर केलीये. १५-२० दिवस तेच चेक करतोय. एक आणि एक फाईल धुंडाळून काढलीये..." विकास फाईल पाहतच बोलला.

"साहेब मला माफ करा... महिना होत आला, तरी मी आपल्या केसवर लक्ष दिलं नाही..." सूरज अपराधीपणे मध्येच बोलला.

"असू दे रे. तसंही तू आजारी होतास. म्हणूनच मी पण तुला त्रास दिला नाही. फॅक्टरी बंद असल्यानं सध्या तरी चिंता नाही." विकासने त्याच्याकडे पाहून स्मित केलं.

"तेच! साहेब, तुमच्या गोडाऊन मधूनच त्या लोकांना मी अटक करणार आहे! तुम्ही त्यांना उद्यापासूनच पुन्हा काम चालू करायला सांगा!" सूरजने निर्णय ऐकवला.

विकास चिंतित झाला,

"सूरज; असा घाईने निर्णय घेऊ नको. आधी नीट इन्क्वायरी कर." तो काळजीने म्हणाला.

"चीफनी माझी सुट्टी कॅन्सल करून नवी केस माझ्यावर सोपवली आहे. त्यामुळं इन्क्वायरी करण्याइतका वेळ आता माझ्याकडं नाही. ही केस नसती, तर सुट्टी संपल्यावर मी ती एक्सटेंड करूनही घेतली असती. पण आता ते शक्य नाही..." सूरजने बाजू स्पष्ट केली.

"पण..." विकासची काळजी काही संपली नव्हती.

"चीफनी तुम्हाला काही होऊ देणार नाही असं वचन दिलंय मला. तुम्ही काही काळजी करू नका. मी आहे ना?!" सूरजने त्याला आश्वस्त केलं.

"तुला हवं ते कर. पण मला या संकटातून सोडव." विकास पर्याय नाही पाहून त्याचं म्हणणं मान्य करत म्हणाला.

"डोन्ट वरी साहेब. येतो मी. थँक्स!" सूरज जाण्यासाठी उभारला.

"सूरज!" विकासने काळजीने हाक मारली.

सूरजने त्याच्याकडे पाहिलं.

"काळजी घे!" विकास कपाळावर आठ्या आणत म्हणाला.

सूरजने विकासला आश्वासित करण्यासाठी मानेनेच 'हो' म्हंटलं,

"हं!" असं हुंकारून सूरज निघून गेला.

## ११. तारीख: २५ एप्रिल -

सूरज विकासच्या गोडाऊनच्या दिशेने गाडी घेऊन चालला होता. विकासच्या गोडाऊनमध्ये काम करणारा व विकासवर नजर ठेवून असलेला माणूस बांधलेल्या अवस्थेत सूरजच्या बाजूला होता. त्याचे तोंड देखील बांधलेले होते. सूरजने एक भरलेलं सिरेंज कोटाच्या आतल्या खिशातून काढलं व त्याचे वरील झाकण काढून ते त्या माणसाच्या मानेत खुपसलं. तो माणूस रागाने डोळे मोठे करून सूरजकडे पाहत होता. सिरेंजमधील गुंगीच्या औषधाने त्याचे मोठे डोळे जड होत बारीक झाले व तो शुद्ध हरपून पडला. मग सूरजने त्याचा जप्त केलेला मोबाईल त्याच्या शर्टच्या खिशात टाकला व त्याचे बांधलेले हात व तोंड गाडी चालवतच सोडले...

विकासच्या चहाच्या फॅक्टरीच्या गोडाऊन समोर सूरजची गाडी उभी होती. सूरज गाडीतून उतरला. एक माणूस त्याला अडवायला समोर आला.

"शोएब साहेबांनी पाठवलंय." सूरज त्याला म्हणाला.

त्या माणसाने मागील एका माणसाकडे पाहिलं. सूरजला ऐकून दुसऱ्या एका माणसाने सूरजची अडवणूक करणाऱ्या माणसाला मागे सरकायला सांगितलं.

"तुमच्या माणसाला ताब्यात घ्या! विकासच्या घराबाहेर झोपलेल्या अवस्थेत सापडला. काय कामचुकार लोकांना कामाला लावता...!" सूरज अडवणाऱ्या माणसाला हिणवत म्हणाला. असे बोलून तो त्या माणसाला देखील कामचुकारच म्हणत होता.

सूरजचा टोमणा समजून तो माणूस चिडला, पण सूरज बिझनेस प्रपोसलसाठी शोएबकडून आलाय असं वाटून त्याला सूरजला काही करता येत नव्हतं. त्यानं सूरजकडे चिडून पाहतच त्याच्या माणसाला सूरजच्या गाडीतून बाहेर काढलं. सूरजही त्याला हिणवणारं स्मित करत गोडाऊन मध्ये शिरला.

गोडाऊनमध्ये पाच-सहा कामगार ड्रग्स पॅकिंग करत बसले होते. चहाची पॅकेजिंगची जागा आता ड्रग्स पॅकेजिंगची झाली होती. आता त्यांना मोकळं रान जे मिळालं होतं... म्हणून मग ते निर्भय होते. त्यांचा मॅनेजर खुर्चीत बसला होता. तो सूरजकडे पाहून रागाने उभारला.

"काय हवंय?" मॅनेजरने जरा गुश्श्यातच सूरजला विचारलं.

"तुम्ही सगळे!" सूरज शांतपणे म्हणाला.

आणि त्याने त्याचा सीआयडी बॅज दाखवला.

"चुकीच्या जागी आलयंस पोरा! चोर-पुलीस खेळायची ही जागा नाय!" मॅनेजर मग्रूरीने तिरके ओठ करत हसत म्हणाला.

हा संकेत होता. तो समजलेले कामगार काम सोडून सूरजला घेरून  उभारले. एका कामगाराने सूरजवर हल्ला केला. सूरजने गडबडीने त्याचा बॅज खिशात ठेवला व हल्ला चुकवून त्याला मारले. कामगार खाली कोसळला. आणि गोडाऊनमधल्या कामगारांची व सूरजची फाईट चालू झाली... बाहेर तैनात लोक देखील सूरजला काबूत आणण्यासाठी आत आले, पण सूरज समोर कोणाचेच काही चालले नाही. काही क्षणातच ते सर्व अनकॉन्शस होऊन पडले होते. मग सूरजने चीफला कॉल लावला...

"सर, विकास विभूते यांच्या गोडाऊनला आहे. सिच्युएशन इज अंडर कंट्रोल." सूरज चीफला म्हणाला.

"ठिक आहे. मी एनसीबीला कळवतो. तू त्यांना गोडाऊन मध्येच ठेऊन गोडाऊन सील कर. म्हणजे त्यांना परप्रेटेटर्स आणि एव्हीडेन्स दोन्ही एकत्रच मिळतील. ओके?" चीफ म्हणाला.

"ओके सर!" सूरज.

"अँड मेक शोअर दे वोन्ट एस्केप!" चीफने सुचना केली.

"गोडाऊन माझ्या परिचयाचं आहे सर. येथून पळण्याचा दुसरा मार्ग नाही." सूरजने चीफला आश्वस्त केलं.

"ओके देन बाय. भेटू." चीफ म्हणाला.

"हो सर.." सूरजने कॉल कट केला.

भिंतीवरील वॉलपीसला अडकवलेलं कुलूप घेऊन तो गोडाऊन बाहेर पडला.

बाहेर येऊन सूरजने गोडाऊन लॉक केलं व गाडीकडे चालत बातमी देण्यासाठी विकासाला पण कॉल केला. मोबाईल असलेला हात गाडीच्या टपावर ठेवून मोबाईलवर बोलत तो उभारला,

"हॅलो साहेब. मी तुमच्या कामगारांना मालासह गोडाऊनमध्ये लॉक केलंय. चीफचे नार्कोटिक्स डिपार्टमेंट सोबत बोलणं होत असेल. त्यामुळं इन्क्वायरी होईलच. तुम्ही फक्त त्यांना को-ऑपरेट करा. काळजी करू नका. तुम्हाला काही होणार नाही. मी चीफचा नंबर तुम्हाला मेसेज करतो. त्यांना एक कॉल करा फक्त." सूरज विकासला आश्वस्त करत मोबाईलमध्ये बोलला.

"थँक्स सूरज. मी तुझे आभार कसे मानू समजत नाही..." विकास फोनमधून बोलला. त्याचा आनंद बोलण्यातून सहज स्पष्ट होत होता.

"काय साहेब?! अहो हे तर माझं कर्तव्यच होतं. ठिकाय ठेवतो. बाय!" सूरज म्हणाला.

"बाय!" पलिकडून विकास.

सूरजने फोन कट करून विकासला चीफचा नंबर मेसेज केला व गाडीत बसून निघून गेला...

सूरज दार उघडून त्याच्या बेडरूममध्ये आला. दार बंद करून घेतलं. तो खूप दमला होता. सोबत असलेली पिस्टल काढून त्याने तो बसणार असलेल्या खुर्ची लगतच्या टेबलवर अक्षरशः भिरकावून दिली. तो खूप थकला होता हे स्पष्ट होतं.

तो खुर्चीवर मागे रेलून बसला. शांत डोळे मिटते करून घेतले. धिम्या गतीने त्याचा श्वासोच्छवास चालू होता. काही वेळाने, दारावर नॉक झालं. ताडकन डोळे उघडून सूरजने चिडचिडा होत दाराकडे पाहिलं.

"कोणाय?" सूरज वैतागाने ओरडला.

"सूरज मी आहे!" बाहेरून चीफने साद दिली.

सूरजने गडबडीने उठून दार उघडले.

"सर आत या ना." तो म्हणाला.

"नाही नको. मला फक्त एवढंच सांग, तू ठिक आहेस ना?" चीफने विचारलं.

"हो." सूरजने एवढंच उत्तर दिलं.

"चल तर. आपल्याला पुरुषोत्तम जाधव यांच्या घरी जायचंय."

पुरुषोत्तम जाधव हे नांव ऐकून सूरज गंभीर झाला... त्याने फक्त मान हलवली आणि आपली पिस्टल होल्डस्टरमध्ये खोवत सूरज चीफ मागून गेला...

सूरजच्या खोली बाहेर सूरजने खोलीचा मुख्य दरवाजा लॉक केला. घराचे गेट लावून घेतले. दोघे चीफच्या कारकडे चालले.

"आईल् ड्राइव्ह." गाडीपाशी आल्यावर चीफ सूरजला म्हणाला.

"सर मी असताना..." सूरज संकोचत म्हणाला.

"असू देरे. बस." चीफ स्मित करून सूरजचा दंड थोपटत म्हणाला.

दोघे गाडीत बसले. चीफ कार चालू करून चालवू लागला...

"जोश्वाला अजून काहीच लीड मिळाली नाहीए. रॅन्समसाठीही अजून काही मागणी झाली नाही. केस खूप कॉम्प्लिकेटेड् दिसते..." चीफ गाडी चालवत सूरजला सांगत होता. खरं खोटं त्यालाच माहित...

सूरजसाठी मात्र चीफचा आवाज जड होत होता  त्याचा आवाज कमी कमी होत त्याला ऐकू येणं बंद झालं... सूरज पुन्हा भूतकाळाच्या गर्तेत अडकला होता...

मध्यरात्री कधी सुमसान रस्त्यावर सूरज बाईक चालवत होता. गावातही रात्र असल्याने कोणी बाहेर नव्हतं.

"नाही यार शोएब. बराचवेळ इथं फिरतोय, पण खबरी काही दिसत नाही. तुझ्या खबऱ्याचा विचार बदललेला दिसतोय..." सूरज ब्लुटूथमध्ये बोलत होता.

बोलता-बोलता सूरज बाईकवरून अनुज्ञाच्या घराबाहेर पोहोचला. चप्पल दुकानदार समोरून लांबून आलेला सूरजला दिसला.

"एक मिनिट. दिसतोय. बोलतो. तू चालू ठेव." सूरज ब्लुटूथमध्ये शोएबला  म्हणाला.

आणि सूरज बाईक जरा पुढं घेऊन आला. त्याने थोडा विचार केला. दुकानदार लांब थांबून सूरजकडेच पाहत होता. सूरजने त्याला पुढं येण्याचा इशारा केला व तोही बाईक बाजूला उभी करून पुढं चालू लागला...

दोघे अनुज्ञाच्या घराच्यासमोर थांबले. सूरजने खबऱ्यासोबत भेटण्यासाठी मुद्दामच ही जागा निवडली होती. नशिबात असेल तर एकदा तरी अनुज्ञाला पाहता यावं या निमित्तानं...

"साहेब इथं वस्तीत कशाला बोलावलंय? कुठं तरी निर्जन ठिकाणी भेटलो असतो ना...?" दुकानदाराने हळू आवाजात चिंतेने सूरजला विचारलं.

"थोडं काम होतं इथं. म्हणून. तुम्हाला नंदनबद्दल काही कळालंय का?" सूरज अनुज्ञा दिसेल या आशेने तिच्या घराकडे नकळत नजर टाकत बोलला.

कोणी नव्हतं. सूरज अनुज्ञाच्या घराकडे पाठ करून उभारला.

"होय. म्हणूनच शोएब साहेबांना फोन केलेला तुम्हाला भेटण्यासाठी. नंदनचा ड्रायव्हर साई सुभेदारशी बोललोय." दुकानदार म्हणाला.

"चौकशी दरम्यान त्याला काही संशय नाही आला ना तुमच्याबद्दल?" सूरजने त्याला विचारलं.

"नाही. तुम्ही या केसची चौकशी करण्यासाठी माझ्याकडे आला होता, तेव्हाच त्याला मित्र बनवलाय. माहीत होतं, पुढं-मागं कामी येईल. मित्र म्हणून सहज विचारपूस करतोय असं दाखवल्यानं काही विचारलं तरी त्याला संशय नाही आला." दुकानदार म्हणाला.

"हुशार आहात. मग काय कळालं त्याच्याकडून." सूरजने त्याची प्रशंसा केली.

"उद्या संध्याकाळी नंदन इनामदार स्टँडमार्गे कोल्हापूरला जाण्याची शक्यता आहे."

"स्टँडमार्गे का?"

"तिथं त्याला आधी कोणाला तरी भेटायचं आहे. मग तो पुढं जाईल."

"कोणाला?"

"ते काही माहीत नाही."

"तुम्ही विचारलं नाही?"

"त्यालाही माहीत नाही. नंदनच्या गाडीचा फोटो व नंबर मला मिळाला की मेसेज करतो."

सूरज मानेने 'हो' म्हणाला. त्यावेळी सूरजला काही तरी जाणवलं. त्याने अनुज्ञाच्या घराकडे पाहिलं. त्याची नजर वर गॅलरीत उभ्या अनुज्ञावर पडली. ती त्याच्याकडेच पाहत होती. सूरज

पाहतोय हे लक्षात येताच ती फिरली. सूरजने निराश होऊन खाली पाहिलं. एक-दोन क्षण तसंच थांबून मग त्याने दुकानदाराकडे बघितलं.

"धन्यवाद! नंदनबद्दल तुम्हाला चिंता असून तुम्ही को-ऑपरेट केलंत." सूरज स्मित करून दुकानदाराला म्हणाला.

"त्यावेळी तुमच्याबद्दल शंका होती. पण तुम्ही नंदनच्या वर्कशॉपवर धाड टाकल्याचं कळालं आणि आपली खात्री पटली. पोलिसांना मदत करणं माझं कामच आहे. निघतो." दुकानदार सूरजला बोलला.

सूरजने शेकहँडसाठी हात पुढं केला. दुकानदार शेकहँड करून निघून गेला. सूरजने पुन्हा एकवार आणि शेवटचं म्हणून गॅलरीकडे पाहिलं. अनुज्ञा अजूनही पाठमोरीच उभी होती. मग हताश होऊन शोएबशी ब्लुटूथवर बोलत सूरज बाईकच्या दिशेने मागे जाऊ लागला...

"शोएब, उद्या स्टँडकडून कोल्हापूरला जाणाऱ्या रस्त्यावर नाकाबंदी कर. सगळीच सिव्हिलमध्ये असू देत."

ब्लुटूथचं बटन दाबून कॉल कट करून सूरजने कानाचा ब्लुटूथ काढून खिशात ठेवला. तो त्याच्या बाईकवर बसला. अनुज्ञाच्या गॅलरीकडे पाहत गाडीला किक केली. गाडी एका झटक्यात चालू झाली. पण सूरज काहीवेळ बाईक रेज करत तेथेच उभारला, अनुज्ञा मागे पाहिल या आशेने... काही वेळाने त्याने गॅलरीकडे बघितलं. पण गॅलरी मोकळी होती. अनुज्ञा कधीच आत निघून गेलेली होती. सूरजचे डोळे पाण्याने भरले. त्याने रागाने बाईक वळवली आणि वेगाने निघून गेला...

सूरजने डोळे बंद करून घेतले होते. हेडरेस्टवर डोकं टेकवून तो चीफच्या गाडीत पडून होता...

चीफची गाडी वेगाने धावत होती...

गाडी अनुज्ञाच्या घराबाहेर येऊन थांबली. चीफने सूरजकडे दृष्टीक्षेप टाकला. सूरजची अवस्था पाहून एक हास्याची लकेर चीफच्या ओठांवर तरळली आणि तो लगेच मूड बदलत...

"सूरज, सूरज!" अशी चीफ सूरजला हलवून जागं करत हाक मारू लागला...

"अं... क... काय सर..." सूरज अनकॉन्शियस्ली पुटपुटला.

"अरे कुठं हरवलायस? पोहोचलो आपण." चीफ त्याला जागे करत बोलला.

सूरजने त्याच अवस्थेत मान डोलावली व दार उघडून बाहेर गेला. तो गाडीचं दार उघडच धरून तसाच उभारला. चीफने गाडीची चावी काढून घेतली आणि गाडीतून उतरला.

सूरज गाडीचा दरवाजा धरून भरलेल्या डोळ्यांनी अनुज्ञाला शेवटचं त्यानं ज्या बाल्कनीत पाहिलं होतं, त्या बाल्कनीकडे पाहत उभा होता. चीफ गाडीचा दरवाजा बंद करून पायऱ्या चढू लागला. सूरज सोबत नाही हे लक्षात आल्यावर त्याने मागे पाहिलं.

"सूरज ये ना!" चीफ म्हणाला.

सूरजने चीफकडं पाहिलं. मान हलवली आणि चीफ सोबतच पायऱ्या चढल्या. चीफने मेनडोरची बेल वाजवली.

अनुज्ञाच्या घरात - लिविंगरूम - पुरुषोत्तम जाधव अनुज्ञाचे वडील यांनी येऊन दार उघडलं. दोघे आत आले. चीफच्या हाती गाडीची चावी होती.

"मिस्टर जाधव." चीफ म्हणाला.

"मिस्टर गोम्स, प्लिज कम इन." पुरुषोत्तम म्हणाला आणि तो आत गेला.

दोघांनी त्याला फॉलो केलं.

"लेट मी इन्ट्रड्युस यू." सोफ्यापाशी पोहोचल्यावर चीफ म्हणाला,

पुरुषोत्तमकडे हात करून,

"सूरज; मीट हिम, ही इस अ ग्रेट बिझनेसमन ऑफ युअर टाऊन, पुरुषोत्तम जाधव."

सूरजकडे हात करून पुरुषोत्तमला,

"अँड ही इज सिनियर इंस्पेक्टर सूरज क्षीरसागर."

एक वाईड स्माईल पुरुषोत्तमच्या चेहऱ्यावर नकळत आली. त्याने सूरजचा हात हातात घेतला,

"ओह! तर तुम्ही आहात सूरज क्षीरसागर! मी मिस्टर गोम्सकडून खूप ऐकलंय आपल्याबद्दल... हे तर तुम्हाला सुपरकॉप म्हणतात." पुरुषोत्तम शेकहँड करत सूरजला म्हणाला.

सूरजने दिखाऊ स्मित केलं,

"थँक्यू." तो म्हणाला.

"प्लिज दोघे बसा ना." पुरुषोत्तम म्हणाला.

व स्वतः सोफ्यावर बसला. सूरज व चीफ देखील त्याच्या बाजूला बसले. समोरील टी-पॉयवर चीफने गाडीची चावी ठेवली.

सूरजला माहिती होतं, की अनुज्ञा तिथं नाही ते, तरी पण त्याची नजर तिला शोधत होती. पुरुषोत्तम व चीफ यांनी त्याच्याकडे पाहिलं. मग एकमेकांकडे बघितलं आणि मग...

"काय झालंय हे तर तुम्हाला माहीत असेलच?" पुरुषोत्तम गंभीर होत सूरजला म्हणाला.

सूरजने विदआऊट एक्सप्रेशन पुरुषोत्तमकडे बघितलं,

"हो. सरांनी सांगितलं." तो म्हणाला.

त्याने दीर्घ श्वास सोडला व पुढे बोलला,

"तुम्ही काही काळजी करू नका. अनुज्ञा ह्या माझी जबाबदारी आहेत. त्यांना सुखरूप घरी आणणं हे माझं कर्तव्य आहे. त्यांच्या केसालाही धक्का लागणार नाही. ट्रस्ट मी!"

ही प्रस्तुत परिस्थिती सूरजला असह्य झाली. तो गडबडीने दाराकडे चालला...

"सूरज!" चीफने हाक मारली.

त्रासिक सूरज त्याच्याकडे वळला. चीफने टेबलावरील चावी घेऊन त्याच्याकडे फेकली. सूरजने ती झेलली.

"गाडी घेऊन जा. मला थोड्या डिटेल्स हव्या आहेत म्हणून मी थांबतोय थोडावेळ." चीफ म्हणाला.

सूरज मान हलवून 'हो' म्हणून त्याने अनुज्ञाचं घर सोडलं.

अनुज्ञाच्या घराबाहेर, अमेय  बाईकवरून घराच्या दिशेनेच येत होता. सूरज दार उघडंच ठेऊन बाहेर आला होता. अमेयची नजर सूरजवर पडली. सूरजचं लक्ष खाली होतं. साहजिक अमेयला त्याने नोटीस केलं नव्हतं. गाडीत बसून गाडी वळवून तो निघून गेला. अमेय घरापाशी पोहोचलेला होता. बाईक लावून तो बाईकवर बसूनच जाणाऱ्या सूरजच्या गाडीकडे पाहत थांबला. चेहऱ्यावर गोंधळलेले भाव होते. सूरजची गाडी दिशेनाशी होईपर्यंत तो गाडीकडे पाहतच होता.

"सगळं व्यवस्थित होईल ना? तरी मी बायकोला माहेरी पाठवलंय. ती हे सगळं कसं सहन करेल मला शंका होती..." पुरुषोत्तम चिंतित बोलला.

"तुम्ही योग्यच केलंत. आणि काळजी नको. एव्हरीथिंग विल बी फाईन!" चीफ त्याला बोलला.

चीफने पुरुषोत्तमला आश्वस्त करत मान डोलवली. अमेय गोंधळलेल्या मनःस्थितीतच आत आला.

"बाबा आत्ता गेला तो...?" अमेयने व्यत्यय आणत विचारलं.

पुरुषोत्तम व चीफने त्याच्याकडे पाहिलं.

"ते सिनियर इंस्पेक्टर आहेत. सूरज क्षीरसागर. आपल्या अनुला शोधायचं काम त्यांच्याकडे आहे." पुरुषोत्तमने अमेयची शंका दूर केली.

"ओह! मग काही कळालं दीदीबद्दल." त्याने विचारलं.

यावेळी चीफ बोलला...

"काळजी करू नको सापडेल लवकर."

चीफ कोण ते माहीत नसल्याने अमेयने अनोळखी नजरेने चीफकडे पाहिलं. हे लक्षात येऊन...

"सीआयडी चीफ." पुरुषोत्तम म्हणाला.

अमेयने मग चीफकडे पाहत स्मित केलं, पण भावनारहितच...

"बरं मी खोलीत आहे." सांगून अमेय आत निघून गेला.

सूरज खूपच डिस्टर्ब्ड् होता... तो त्याच्या नेहमीच्या विरंगुळयाच्या ठिकाणी म्हणजे निर्जन तलावाकडे पाहत बसला होता. त्याच्या ओल्या डोळयांमध्ये स्वतःविषयीच खूप राग होता...

## १२. तारीख: २६ एप्रिल - वेळ: मध्यरात्रीची...

सूरज बराच वेळ शांत पाण्याकडे पाहत बसला होता. त्याचा मोबाईल वाजला. सूरजने भानांवर येऊन खिशातून मोबाईल काढला... प्रायव्हेट नंबर होता. स्क्रीनवर "12:00 AM" ची वेळ दिसत होती...

सूरजने कॉल घेतला...

"हॅलो..." सूरज मोबाईलमध्ये चाचपत बोलला.

"रिमेम्बर मी?" फ़ज़लने पलिकडून गुर्मीत विचारलं.

"नाही कोण?" सूरज मोबाईलमध्ये गोंधळून बोलला.

"इतक्यात विसरलास? शेम ऑन यू मॅन! यू हॅव अ व्हेरी शॉर्ट मेमरी! एका ऑफिसरने आपल्या शत्रूला असं विसरणं त्याच्यासाठी घातक असतं! एनीवे; आत्ता बारा वाजलेत. २६ एप्रिलचा दिवस चालू झालाय. हे तरी आठवतंय का?" फ़ज़ल पलिकडून म्हणाला.

'२६ एप्रिल' ही तारीख ऐकून सूरज गंभीर झाला...

फ़ज़लच्या घराबाहेर फ़ज़लची गाडी दारात उभी होती.  त्याचा ड्रायव्हर गाडीत होता. फ़ज़ल मेनडोअर जवळ मोबाईलवर सूरजशी बोलत उभारला होता...

"तुला वाटलं असेल ना, की याने पंचवीस दिवसांत काही केलं नाही, तर आता हा काय करेल? नाही?! तर ऐक! मी माझी खेळी आधीच खेळली आहे. कशी ते सांगू? बरं मला सांग; तुझी गर्लफ्रेंड किडनॅप झालीए म्हणे? सांगू शकशील तिला कोणी किडनॅप केलं असेल?" फ़ज़ल असुरी हसला...

इकडे फ़ज़लचं बोलणं ऐकून सूरजचे डोळे विस्फारले. त्याला फ़ज़लचं गुर्मीत हसणं पलिकडून ऐकू येत होतं...

"येस! यू गेस्ड् इट राईट! यू आर ऑन दि राईट ट्रॅक ब्रदर्! तिला मीच किडनॅप केलंय! आज तुझ्या अनुचा वाढदिवस! आजच्याच दिवशी मी तिच्याशी लग्न करून तुला जीवंतपणीच मरण देणार आहे!" फ़ज़ल पलिकडून बोलला,

"पण चल; तुझ्यावर एक उपकार करतो!" तो गुर्मीत म्हणाला,

"काय आहे मुहूर्ताला वेळ आहे. तोपर्यंत एक खेळ खेळू! आज संध्याकाळ पर्यंतचा तुला वेळ देतो.

"जर तुझ्यात हिंमत असेल ना; तर मला शोधून काढ! आणि तिला सोडवून घेऊन जा! आणि अजूनही तुला कळालं नसेल, की मी कोण? तर ऐक..." दात खात फ़ज़लने सूरजला आव्हान केले.

फ़ज़लने मोबाईल बाजूला घेतला. व्हॉइस मॉड्युलर ऍप चालू कॉलमध्ये क्लोज केलं, जेणे करून फ़ज़लचा खरा आवाज सूरजला ऐकू जावा. फ़ज़लने पुन्हा मोबाईल कानाला लावला.

"मी आहे..." फ़ज़ल ओरडला.

सूरज डोळे बारीक करून लक्षपूर्वक नांव ऐकण्याचा प्रयत्न करत होता... पलिकडून आवाज येत नसल्याने अधीर. आणि अचानक...

"फ़ज़ल! हो फ़ज़ल! हिंमत असेल, तर आडव मला!" पलिकडून फ़ज़लचा धमकी देणारा प् नॉर्मल आवाज.

सूरजचे डोळे रागाने अजूनच मोठे झाले!

"फ़ज़ल तू!..." सूरजचा आवाज फ़ज़ल ऐकत होता...

पण त्याचं काही ऐकून न घेता असुरीपणे हसून फ़ज़लने फोन कट केला. तो गाडीत बसला. त्याच्या ड्रायव्हरने गाडी स्टार्ट केली... आणि ती गाडी आपल्या फायनल डेस्टिनेशनकडे रवाना झाली...

१३.

सूरज रागाने फोनमध्ये ओरडत उठून उभारला...

"हॅलो! हॅलो!..."

पलिकडून उत्तर नाही. फोन कधीच कट झालाय हे लक्षात येऊन रागाने त्याने फोन बाजूला घेतला. चिडून तो जोरात ओरडला,

"फ़ज़ल! तूने सोते हुए शेर को जगाया है! अब तू मौत का वो मंज़र देखेगा, जिससे मुर्दे भी सिंहर उठेंगे!"

फ़ज़लचा ड्रायव्हर गाडी चालवत होता... फ़ज़ल मोबाईलवरून चीफशी बोलत होता, पण विलक्षण अस्वस्थता त्याला नीट बसू देत नव्हती. तो सीटच्या टोकावरच बसून होता.

"सर, मी सूरजला धमकी दिली आहे. पण, तो आपल्या जाळ्यात अडकले ना?..." फ़ज़ल चीफला काळजीने म्हणाला.

"तू त्याची काळजी करू नको. मी त्याला ही केस हँडल करायला खूपच फोर्स केलंय. आणि शिवाय आपण त्याला इतकं डिवचलंय, की तो अविचाराने आपल्याला हवं तेच करेल! शेवटी अनुज्ञाचा प्रश्न आहे! ही इज टोटली ट्रॅप्ड् फ्रॉम एव्हरीवेअर्! आता आपल्यापासून त्याला कोणीच वाचवू शकत नाही. तू फक्त काही चूक होणार नाही याची काळजी घे. मला विश्वास आहे आपला प्लॅन नक्की यशस्वी होईल. डोन्ट वरी! अँड रिमेम्बर, डू नॉट डाऊट!" चीफने त्याची चिंता दूर करत पुन्हा त्याला ठणकावले.

"ओके सर. बरं ठेवतो. फॅक्टरीकडं जातोय. नंदन आणि त्याची माणसं पोहोचलीत फॅक्टरीवर."

फ़ज़लची गाडी रोडवर वेगाने धावू लागली... तिचा वेग अधिकच वाढत होता...

दुसरीकडे चीफने सूरजला दिलेली गाडीही आपला वेग वाढवत चाली होती...

सूरजच्या गाडीत, सूरजने रिस्टवॉच पाहिलं. घड्याळात "3:40 AM" झाले होते...

सूरजच्या मोबाईलची मेसेज ट्यून वाजली. मोबाईल डॅशबोर्डवरच ठेवलेला होता. सूरजने मोबाईलकडे नजर टाकली. मोबाईलची रिंग वाजत होती... चीफचा कॉल...

सूरजने फोन रिसिव्ह केला व स्पीकरवर ठेवला.

"सर!" सूरज उद्गारला! त्याला आपला राग लपवता येत नव्हता.

"तू पाठवलेल्या नंबरवरून लोकेशन मिळालंय. मोबाईल बंद असल्यानं लोकेशन शोधायला उशीर झाला. पण आत्ता तो मोबाईल अब्दुल्ला इंडस्ट्रीजच्या एरियात एक्टिवेट झालाय! पण ती फॅक्टरी सध्या बंद आहे..." चीफ सूरजला म्हणाला.

"गॉट द लोकेशन सर! बाय!"

सूरजने फोन कट केला आणि चिडलेल्या भावमुद्रेत पाय एक्सलेटरवर जोराने प्रेस केला... तो कठोर भावमुद्रेने गाडी चालवत होता...

सूरजची गाडी पूर्वीपेक्षा अधिक जोराने धावू लागली होती... त्याचा गाडीला काही स्पीड लिमिटच नाही असं झालं होतं...

सूरजची गाडी येऊन 'श्री स्वामी समर्थ' मंदिरासमोर विसावली. सूरज घाईने मंदिराकडे पळत गेला. मेनगेट बंदच होतं. पण म्हणून सूरज थांबला नाही. त्याने गेट वरून उडी मारली आणि प्रवेशद्वाराकडे पळाला.

मंदिर बंद होतं. सूरजने आत पाहिलं. पुजारी मंदिरातच झोपलेले होते. सूरजने त्यांना कासावीस हाक मारायला चालू केलं...

"आजोबा! आजोबा!..."

सूरजच्या मारलेल्या हाकांमुळे पुजाऱ्याला जाग आली. सूरजला पाहून त्यांनी लगबगीने मुख्य प्रेवेशद्वार उघडले व सूरजला आत घेतलं.

"माफ करा आजोबा. अवेळी तुम्हाला त्रास दिला..." सूरज खजील म्हणाला.

"असुदे रे. भक्त आणि भगवंत यांच्या भेटीची वेळ ठरवणारा मी कोण? तसंही थोड्यावेळात माझी उठण्याची वेळ होतेच. काही झालंय का? तुझा चेहरा सांगतोय." पुजारी त्याला शांत करण्यासाठी म्हणाले.

"कर्म-कर्तव्य या उंबरठ्यावर घेऊन येईल असं वाटलं नव्हतं. आज पुन्हा मला माझ्याच माणसांविरुद्ध लढावं लागणार आहे. मी ढळू नये म्हणून स्वामींचा आशीर्वाद हवाय!" सूरज विचलित म्हणाला.

"जा दर्शन घे." पुजारी गंभीर होत म्हणाले.

सूरज "हो" म्हणून गर्भगृहाकडे गेला. लीन नतमस्तक होऊन त्याने स्वामींना नमस्कार केला. पुजारी त्याला आधार म्हणून त्याच्या मागे येऊन उभारले.

सूरजने गाडीच्या खिडकीतून बाहेर पाहिलं. त्याला फ़ज़लची ती फॅक्टरी दिसली...

बाहेर सूर्योदय देखील होत होता... उजव्या बाजूला दूर फॅक्टरी दिसत होती. सूरजची गाडी हायवेवर धावत होती...

गाडीत - सूरज समोर पाहून ड्राइव्ह करू लागला.. चेहऱ्यावर अजूनही अपरिमित राग होताच. अनुज्ञाला सुखरूप पाहिल्याशिवाय तो शांत होणारही नव्हता! अशातच त्याला पुजाऱ्याचा श्लोकोच्चार आठवला...

"मयि सर्वाणि कर्माणि सन्नयस्याध्यात्मचेतसा । निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ माझी नित्य नैमित्तिकादि विहित सर्व कर्मे विवेकबुद्धीने मी ईश्वराला अर्पित करत आहे, अशा भावनेने तू तुझे कर्म ईश्वराला अर्पण कर! कोणत्याही इच्छेविना फलाशारहित व ममतारहित होऊन, शोकरहित होऊन युद्ध कर!..."

हे आठवल्यावर सूरजची मुद्रा शांत होत गेली...

फॅक्टरीमध्ये फ़ज़लही नमाज पढत होता...

आणि तिकडे मशिदीत शोएबचं नुकतंच नमाज पढून झालं होत...

"या अल्लाह! हमारे इस पाक इरादे को आज मुक़म्मल कर दे! बस यही दुआँ करता है तेरा यह बंदा! या ख़ुदा; रहमत! आमेन...!" शोएबने दोन्ही हात चेहऱ्यावरून फिरवत अल्लाहतालाकडे दुआ मागितली.

सकाळ झाली होती. सूरज फॅक्टरी बाहेर पोहोचला. गाडीतून उतरून तो एंटरेन्सकडे पळाला.

त्याला येताना पाहून एक गुंड सूरजच्या दिशेने पळत आला. त्याने सूरजपासून दोन फुटांवर थांबून सूरजवर रिव्हॉल्व्हर पॉईंट केली. सूरजने त्याच्याकडून डाव्या हाताने गन हिसकावून घेतली. अचानक गोळी सुटली.  सूरजने हाफ कार्टव्हील करून गोळी चुकवली आणि उजव्या पायाने त्या गुंडाच्या जबड्यावर किक केली. गुंड स्विंग करून खाली कोसळला. सूरजने मग त्याच्या डाव्या हातात आलेल्या त्या गुंडाच्या गननेच फायर करून त्या गुंडाला जीवे मारलं. सूरज पुढं पळत गेला...

फॅक्टरीच्या प्रवेशाजवळ सूरज पळत आला. समोर दोन गुंड होतेच. त्यांच्याकडे फ्लेमेबल केमिकलच्या बादल्या होत्या. दोघांनी ते केमिकल सूरजवर ओतले. आता फायर करून काही साध्य होणार नाही, आपणच जखमी होऊ हे लक्षात येऊन सूरजने हातातली रिव्हॉल्व्हरच्या गोळया रिलीज केल्या, ज्या जमिनीवर विखुरल्या गेल्या. मग त्याने ती रिव्हॉल्व्हर त्याच्या उजव्या बाजूच्या गुंडावर फेकली. लगोरीतून दगड सुटावा अशा वेगाने ती रिव्हॉल्वर गुंडाला डोक्यावर जोरात हिट झाली. तो डिस्ट्रॅक्ट झाला. इतक्यात वाऱ्याच्या वेगाने सूरज त्यांच्याजवळ पोहोचला व त्या दोन्ही गुंडांना मारून आत पळत गेला.

फॅक्टरीत सूरज प्रवेशल्याक्षणी सात गुंड समोर आले. सूरज जागीच थांबला. सगळयांनी त्याला चारी बाजूंनी घेरलं.

दुसऱ्या मजल्यावर फ़ज़ल सूरजकडे पाहत उभा होता.

"वेलकम सूरज! फायनली यू हॅव आराईव्ड्! माझ्या बंद पडलेल्या फॅक्टरीत तुझं स्वागत आहे! थँक्स टू यू!"

फ़ज़लने एक्सप्रेशन चेंज केले,

"तुला आठवतंय? या फॅक्टरीच्या आवारात आपण लहानपणी खूप खेळलोय." फ़ज़ल सूरजला म्हणाला व त्याने क्रूर भाव चेहऱ्यावर आणले,

"आता हीच फॅक्टरी कब्रस्तान बनेल!" तो कठोरपणे पुढे म्हणाला.

फ़ज़लचं बोलणं हा इशारा आहे असं समजून सूरज समोरच्या एकाने काडीपेटीची काडी पेटवून सूरजवर फेकली. सूरजच्या कोटने आग पकडली. सगळे हसू लागले. पण सूरज ढळला नाही. तो गुंडांसमोर ठामच उभा होता.

"भौंक लो कुत्तों! मगर ये मत भूलों, की सूरज अगर जल सकता है, तो जला भी सकता है!" तो गुंडांना म्हणाला.

आणि सूरजने कोट काढून खाली फेकला. तोच सूरजच्या डाव्या बाजूला असलेल्या प्रवेशद्वारापासून मघाशी सूरजकडून मार खाल्लेले बाहेरील दोन गुंड आत आले. त्यांतील एक गुंड चिडून सूरजच्या दिशेने पळत आला. सूरजने बाजूच्या एका गुंडाला मारून त्याचा लोखंडी रॉड हिसकावून घेतला होता. तो डाव्या बाजूने पळत येणाऱ्या गुंडाच्या पायाच्या दिशेने फेकला. रॉड लागून तोल जाऊन गुंड खाली पडू लागला. सूरजने डावा पाय वर करून त्या गुंडाचं मुंडक आग लागलेल्या डाव्या मांडीवर लटकत घेतलं. त्या आगीवर त्या गुंडाचं तोंड आदळलेलं होतं. सूरजने गुंडाच्या केसांना धरून त्याचं तोंड मांडीवर घासून त्याच्या तोंडानेच ती आग विझवली व त्याला पुढं भिरकावून दिलं. तो गडगडत जाऊन निपचित पडला. सगळे थोडावेळ दचकले. मग सूरजने पुढं पळत जाऊन जम्प केली. पुढील दोघांना हात व पायांत अडकवून घेऊन मागे फ्लिप केलं. तिघेही जमिनीवर कोसळले. सूरज हातापायांच्या विळख्यात अडकलेल्या गुंडांच्या माना आवळून दोघांना ठार केलं. हे करत असताना तो फ़ज़लकडे रागाने रोखून पाहत होता. सूरज रोल होऊन उठून उभारला.

बाकीच्या गुंडांनी स्वतःला सावरून सूरजवर अटॅक केला. अगदी क्रूर लढाई चालू झाली...

फ़ज़ल भावनारहित चेहरा घेऊन गुंडांशी लढणाऱ्या सूरजकडे पाहत उभा होता. फ़ज़लचा मोबाईल वाजला. त्याने फोन घेतला...

"काही प्रोग्रेस?" चीफनी फोनवरून विचारलं.

"हो सर. सूरज आलाय. हे लोक त्याला मारायचा प्रयत्न करतायत. सध्या सूरज लीडवर आहे! पुढचं सांगता हेत नाही..." फ़ज़ल चिंतित होऊन चीफला बोलला.

"डोन्ट वरी! एव्हरी थिंग विल वर्क्ड् एज प्लॅन्ड्! यू रिलॅक्स अँड एन्जॉय द शो!" चीफ निष्काळजी बोलला.

फ़ज़लने फोन कट करत मोबाईल खाली घेतला. नजर सूरजवरच. सूरजचं त्या गुंडांना मारणं चालूच होतं... दरम्यान सूरजला तेथे साठलेल्या हौदातील पाण्यात फेकण्यात आलं. त्यात त्याला बुडवून मारण्याचा बहुदा मानस असावा. पण हे सूरजच्या मात्र पथ्यावर पडलं. यामुळे सूरजवर ओतण्यात आलेलं केमिकल साफ झालं...

...अखेर सूरजने सर्वांना हरवले. त्याच्यासमोर कोणाचाच टिकाव लागला नाही! शेवट राहिलेल्या एका गुंडाने सूरजवर हल्ला केला. सूरजने तो हल्ला ब्लॉक करून गुंडाच्या मानेला पकडलं. सूरजने चिडून फ़ज़लच्या दिशेने पाहिलं व फ़ज़लकडे पाहतच त्याने त्या गुंडाची मान मुरगळून त्याला ठार केलं. गुंडाचं शरीर निर्जीव होऊन खाली पडलं. फ़ज़लची नजरही सूरजवर रोखलेली!

फ़ज़लने त्याचा शर्ट काढून पायात फेकला व दुसऱ्या फ्लोरवरून थेट खाली उडी मारली. दोघे फेस टू फेस झाले. काही काळ शांतता... मग फ़ज़लच सूरजच्या दिशेने पळू लागला. सूरजनेही मग त्याच्या दिशेने पळण्यास सुरुवात केली.

सूरज व फ़ज़लमध्ये घमासान मुष्टियुद्ध सुरू होते... लढाई दरम्यान - मध्येच ते थोडा वेळ थांबले. मुष्टियुध्द करणारे दोघे एकमेकांविरुद्ध जोर लावत होते. फ़ज़लने सूरजच्या डोळयांत रोखत क्रूर स्मित केलं. हे पाहून सूरजला तळपायाची आग मस्तकात गेल्यासारखं झालं...

"एका मराठी माणसाला चॅलेंज केलंयस तू फ़ज़ल! मराठा कधीच हारत नाही!" सूरज चिडून ओरडला.

फ़ज़लने भाव बदलले,

"ऐसा है, तो मैं भी मराठा ही हूँ! चल आ! देखते है किसमें ज्यादा दम है!" फ़ज़लही चिडून ओरडला.

"हो पण सत्य माझ्या बाजूने आहे! आणि; सत्य आणि मराठा, हे कॉम्बिनेशन खूप डेंजरस असतं!" सूरज त्याला म्हणाला.

फ़ज़लने सूरजच्या बोलण्याची कीव करणारं स्मित केलं. तो म्हणाला,

"प्रत्येकालाच असं वाटत असतं, की सत्य त्याच्याच बाजूनं आहे! पण तुझा हा भ्रम लवकरच दूर होईल."

फ़ज़लने क्रूर स्मित केलं,

"सूरज; सत्य त्याच्याच बाजूचं असतं, जो विजयी होतो!" फ़ज़ल सूरजला दुःससवासी बोलला.

आणि फ़ज़लने सूरजला मागे ढकलून त्याच्यावर हल्ला केला. आणि पुन्हा हल्ला करण्यासाठी तो पुढं झाला. सूरजने वार ब्लॉक केला व फ़ज़लवर पलटवार केला. फ़ज़लने सूरजचा हात अडवला व पुन्हा-पुन्हा सूरजवर अनेक वार केले. मग फ़ज़लने सूरजला उचलून जमिनीवर भिरकावून दिलं. सूरज पलटला. त्याने उजवा गुडघा व डावा तळपाय जमिनीवर टेकलेले असा स्टान्स घेतला. फ़ज़लने पुढं होऊन सूरजला किक केली, पण सूरजने डाव्या हाताने त्याचा पाय अडवला. फ़ज़लने मग पायावर आलेला सूरजचा हात पायानेच वर घेऊन त्याच्या उजव्या हातात पकडला व सूरजला पुढं खेचलं. सूरजने बॅलन्स सावरण्यासाठी उजवा हात जमिनीवर टेकवला. जमिनीवरील सूरजचा हात फ़ज़लने डाव्या पायाने जोर लावून चिरडला. सूरज अतीव वेदनेने कळवळला... ओरडला...

आत अंधाऱ्या खोलीत कुठे तरी अनुज्ञा डोळे बंद करून होती. सूरजचा ओरडण्याचा आवाज तिच्या कानांवर पडला. तिने ताबडतोब डोळे उघडले. ती अधीर झाली. अस्वस्थ झाली. पण आपण काही करू शकत नाही हे लक्षात येऊन तिने असहाय्यतेने पुन्हा डोळे मिटून घेतले. तिला खुर्चीला बांधून ठेवण्यात आलं होतं. तिच्या कपाळावर पडणाऱ्या आठ्या सांगून जात होत्या, की तिला सूरजबद्दल किती काळजी वाटते ते...

बाहेर, फ़ज़ल सूरजचा उजवा हात डाव्या पायाने चिरडत असुरी हसत होता... आणि मग त्याने सूरजचा हातात असलेला डावा हात देखील जोरात दाबला. सूरज वेदनेने कळवळला...

"आता मी पूर्वीचा फ़ज़ल राहिलेलो नाही सूरज! आजच्या या क्षणासाठी मी पूर्ण एक वर्ष वाट बघितली आहे. तयारी केली आहे! आता कोणी वाचवू शकत नाही तुला माझ्यापासून!" फ़ज़ल सूरजला म्हणाला.

एका पॉईंटला सूरजला त्या वेदना असह्य झाल्या. त्याने गुडघा टेकलेला उजवा पाय हवेत घेऊन फ़ज़लला पोटात किक करून बॅकवर्ड फ्लिप केलं व डाव्या पायाने फ़ज़लच्या हनुवटीवरही किक केलं. फ़ज़लची ग्रीप सुटून तो वेगाने मागे गेला. सूरज मुक्त झाला. मग तो उठून फ़ज़लकडे पळत गेला. त्याने फ़ज़लवर अटॅक केला. त्यांच्यात पुन्हा फाईट चालू झाली... यावेळी सूरजने रॅपिड अटॅक केल्याने सूरज फ़ज़लवर वरचढ ठरला. फ़ज़ल अर्धमेला खाली कोसळला. सूरजने त्याच्याकडे जाऊन त्याची कॉलर पकडली...

"बोल कुठायत अनु?" त्याने ओरडत विचारलं. फ़ज़लने उत्तर दिलं नाही. सूरजने त्याला जोराने हलवलं,

"बोल!" सूरज पुन्हा ओरडला.

" वर... खोलीत..." फ़ज़ल वेदनेने कसं तरी बोलला.

"कधीकाळी मी तुला माझा मित्र माणलं होतं. म्हणून मी तुझा जीव घेणार नाही! पण तू जे केलंस, त्याची शिक्षा तर तुला मिळणारच!"

सूरज फ़ज़लला म्हणाला व त्याने त्याला ढकलून दिलं. सूरज लोखंडी पायऱ्या चढू लागला. सूरजला वर जाताना पाहून फ़ज़लने डोकं जमिनीवर टेकवलं आणि काही तरी 'कार्य आपण पूर्ण केलंय' असे डोळे मिटून घेतले...

फॅक्टरीत - सेकेंड फ्लोअरवर सूरज वेगवेगळया खोलीत अनुज्ञाला शोधू लागला..

एका ठिकाणी त्याला समोर गोल्ड माफिया नंदन उभा दिसला. तोही रागाने सूरजकडेच पाहत होता. सूरज त्याच्या दिशेने पळाला. माफियाने पण पुढं होऊन सूरजवर वार केला. सूरजने त्याचा वार डाव्या पायाने ब्लॉक केला व त्याच पायाने त्याच्या डोक्यात किक मारली. माफिया त्याच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर डोकं आदळून पुन्हा सूरज समोर आला. सूरजने त्याला दोन्ही हातांनी ढकलत करत मागे नेलं. सूरजने त्याला मागील भिंतीवर आदळलं व पुढं खेचून मग सूरजच्या उजव्या हाताला असलेल्या खोलीच्या दारावर ढकलून त्याच्या पोटात जोराचा पंच करून जोरात लाथही मारली. दार मोडलं व दारासह गोल्ड माफिया खोलीत कोसळू लागला. तशी सूरजला समोर अनुज्ञा बांधलेल्या अवस्थेत दिसली...

अनुज्ञाच्या चेहऱ्यावर राग होता. खरंच राग होता का? की तिला काय रिएक्ट करावं हेच कळत नव्हतं...

सूरज खोलीत एंटर झाला.

"तू कर्तव्य म्हणून मला वाचवायला आला आहेस, की माझ्यावर प्रेम आहे म्हणून?" अनुज्ञाने कठोर स्वरात सूरजला विचारलं.

अनुज्ञाचं बोलणं सूरजला हर्ट करून गेलं. सूरजच्या मागे, माफियाने जमिनीवर पडलेल्या अवस्थेतच त्याच्याकडे असलेला चाकू बाहेर काढला. तो उठला. त्याला सूरजच्या मागे उठताना पाहून अनुज्ञाचे डोळे भीतीने मोठे झाले. अनुज्ञाच्या रिएक्शनवरून सूरजच्या ही गोष्ट लक्षात आली. माफियाने सूरजवर मागून हल्ला केला. मागील माफियाची हालचाल सूरजलाही जाणवलेली होती. सूरज जलद मागे वळला व जोरात माफियाला डोक्यात मारलं. माफिया फ्लिप होऊन खाली पडला. सूरजने मग त्याला खेचून उठवलं.

"तुम्ही कधीच मला समजू शकणार नाही!" सूरज चिडून माफियाला अनुज्ञाच्या मागे भिंतीवर भिरकावत ओरडला.

माफिया भिंतीला उलटा थडकून खाली पडला. त्याच्या हातातील चाकू बाजूला पडला. माफियाला हार मंजूर नव्हती. म्हणून जखमी अवस्थेतही माफिया चाकू उचलून उठला. सूरज नाही तर अनुज्ञा म्हणून त्याने मागून अनुज्ञाला चाकूने स्ट्राईक करू पाहिलं. सूरजने मग चाकू उगारलेला माफियाचा हात पकडून अनुज्ञाची खुर्ची बाजूला सारली व त्याला पाठीवर लिफ्ट करून खाली आदळला. आणि मग त्याची सर्व्हिस पिस्टल होल्डस्टर मधून घेचून घेत सूरजने गोळ्या घालून माफियाला कायमचं ठार केलं. सूरजचं हे निर्घृण कृत्य सहन न होऊन विचलित होत अनुज्ञाने दुसऱ्या बाजूला पाहिलं.

माफिया निपचित पडला होता. सूरज माफियाकडे पाहत काही वेळ तसाच थांबला. त्याच्या मागे अनुज्ञाने बाजूला पाहत डोळे घट्ट मिटलेले होते. सूरज मग पिस्टल मागे खोचत अनुज्ञाकडे वळला. सूरज अनुज्ञाकडे गेला. त्याने तिला खुर्चीला बांधलेल्या स्थितीतून मुक्त केलं... दोघांनी ती खोली सोडली.

सूरज व अनुज्ञा लोखंडी पायऱ्यांवरून खाली उतरून इग्झिटकडे चालू लागले... सूरज सावधपणे अनुज्ञाला प्रोटेक्ट करण्यास सज्ज असलेल्या पवित्र्यात अनुज्ञाच्या जरा पुढे चालत होता...

पुढे, आल्यावर फ़ज़ल तिथं निपचित पडलेला अनुज्ञाला दिसला. ती पुन्हा जरा विचलित झाली. पण सूरजला फॉलो करत बाहेर निघून गेली.

सूरज व अनुज्ञा फॅक्टरीच्या बाहेर आले. सूरजने फॅक्टरीचं दार बंद करून बाहेरून लॅच लावला. अनुज्ञा व सूरज गाडीच्या दिशेने गेले.

गाडीजवळ शोएबला फोन लावत सूरजने पॅसेंजर सीटचं दार उघडून अनुज्ञाला आत बसण्याची खूण केली. अनुज्ञा गाडीत बसली. सूरजने दार बंद केलं.

"हा शोएब, फ़ज़लच्या गांवाबाहेरच्या फॅक्टरीत मी काही क्रिमिनल्स बंद करून ठेवलेत. येऊन घेऊन जाशील?" सूरजने शोएब विनंती केली.

केबिनमध्ये बसलेला शोएब गडबडीने उठून उभारला.

"हो. मी पोहोचतो!" बोलतच तो बाहेर पळला...

"पण त्यांच्यातल्या एका क्रिमिनलला बघून विचलित होऊ नको! भेटून बोलू." फ़ज़लच्या फॅक्टरीबाहेर उभ्या सूरजने शोएबला ताकीद वजा सूचना दिली.

सूरजने कॉल बंद करून मोबाईल खिशात टाकला व तो गाडीत बसला. गाडी चालू करून वळवून त्याने गाडी अनुज्ञाच्या घराच्या दिशेला लावली...

सूरजची गाडी परतीच्या रस्त्याने धावत होती... सूरज गाडी चालवत होता... अनुज्ञा खिडकीतून बाहेर पाहत होती. आणि काही वेळाने...

"बोलणार नाहीस माझ्याशी? रागावलायस माझ्यावर?" अनुज्ञाने निराश मनःस्थितीत हळू आवाजात बाहेर पाहतच सूरजला विचारलं.

"माझा काय संबंध तुमच्यावर रागवायचा? तसंही तुम्ही मुली खऱ्या प्रेमाला कधी समजून घेत नाही; दिखाऊपणाला मात्र भुलता! जो खरं प्रेम करतो त्याला कधी किंमत देत नाही. आणि एक दिवस अनोळखी माणसाशी लग्न करून निघून जाता... आम्हाला आयुष्यभराचं दुःख देऊन..." सूरज समोर पाहत भावना विरहित चेहऱ्याने म्हणाला.

सूरजच्या बोलण्याने अनुज्ञा खूप आहत झाली... तिचे डोळे पाण्याने भरले...

अनुज्ञाचं कॉलेज सुटलं होतं... अनुज्ञा मैत्रिणींना बाय करून रिक्षाकडे येत असताना तिची नजर दूर उभ्या एका गाडीवर पडली. गाडीजवळ सूरज उभा होता. डोक्यावर टोपी घातली होती. सूरजसोबत शोएब व एक कॉन्स्टेबल. सर्वच साध्या कपड्यांत वेष बदलून होते. सिच्युएशन नॉर्मल वाटण्यासाठी चहा घेत होते. कोणी ओळखू नये म्हणून सगळेच सावध. पण अनुज्ञाने दुरून पाहूनही सूरजला ओळखलंच. ती त्याला पाहण्यासाठी रस्ता क्रॉस करून थोडी लपून उभारली. अनुज्ञाच्या मागील रस्त्यावरून गोल्ड माफियाची यावेळी वेगळी असलेली कार आलेली सूरजला दिसली. आपल्याला शोधले जाऊ नये म्हणून माफियाने ती बदलली असावी...

पुढील रस्ता सूरजच्या प्लॅननुसार आधीच गाड्यांनी ब्लॉक केलेला होता अगदी नॉर्मल ट्रॅफिक वाटावं असा. गाडीत माफिया दिसताच सूरजने शोएबला अलर्ट केलं.

"शोएब!" सूरज दबक्या आवाजात ओरडला.

"ऍक्ट!" शोएबने कानात असलेल्या वायरलेसमध्ये गडबडीत आपल्या सहकार्यांना ऑर्डर दिली.

आणि मग बऱ्याच गाड्यांनी येऊन मागूनही ट्रॅफिक जॅम केलं. माफियाने गाडी बाजूने काढू पाहिलं, पण स्टॉपमधून एक गाडी येऊन त्याच्या आडवी अचानक थांबली. पण ही गाडी मात्र

एका नॉर्मल सिटीझनची होती. काही माहीत नसल्याने त्याने मध्येच गाडी घातली होती. पण यामुळे माफियाची कार सगळीकडून अडकली. संधी साधून सूरज हातातील चहाचा ग्लास गडबडीने सोबतच्या कॉन्स्टेबलच्या हातात देऊन माफियाचा दिशेने पळाला. आडव्या आलेल्या गाडीच्या छतावर उडी मारून त्याने पलीकडे विरुद्ध दिशेला आडव्या असलेल्या गाडीत ड्रायव्हिंग सीटवर असलेल्या माफियाची कॉलर पकडली व छतावरून खाली उतरला.

"ए काय करतोयस?" त्या गाडीच्या ड्रायव्हर चिडून सूरजला ओरडला.

सूरजच्या चेहऱ्यावर राग होता. त्याने माफियाच्या डोळयांत रोखून पाहत आपला बॅज काढून मागे त्या ड्रायव्हरला दाखवला. ड्रायव्हरचा सूरच बदलला.

"सॉरी सर!" ड्रायव्हरने आदराने माफी मागितली.

आणि तो गाडी बसस्टॉपमध्ये घालून वळवून दुसऱ्या मार्गाने निघून गेला. शोएब व कॉन्स्टेबल देखील तिथं पळत आले.

"शोएब, आपल्याला मिळालेली इन्फॉर्मेशन बरोबर होती. शेवटी हा सापडलाच!" सूरज बोलला.

"पण याचा ड्रायव्हर? आणि हा स्टँडवर ज्याला भेटणार होता तो?" शोएबची शंका.

"गुळाची ढेप मिळाली आहे! आता मुंगळे पण मिळतीलच!" सूरज शोएबला म्हणाला.

मग सूरजने दार उघडण्याची तसदी न घेता लठ्ठशा माफियाला ड्रायव्हिंग सीटच्या खिडकीतूनच बाहेर खेचलं व त्याला शोएबकडे सोपवलं. शोएबने त्याला ताब्यात घेतलं.

"दीक्षित, ही कार घेऊन स्टेशनला चला." सूरज कॉन्स्टेबलला म्हणाला.

कॉन्स्टेबल "हो" म्हणून माफियाच्या गाडीत बसला. सूरजने रस्ता मोकळा करण्यासाठी इतर कार्सना इशारा केला. सगळ्या कार्सनी ट्रॅफिक रिक्त केलं. कॉन्स्टेबलने माफियाची गाडी पोलीस स्टेशनच्या दिशेने घेतली. शोएबनेही माफियाला त्याच्या गाडीकडे नेलं. त्याच्यासोबत

जाण्यासाठी सूरज वळत असताना आता त्याच्या लक्षात आलं, की अनुज्ञाही तेथेच आहे. पण तो न थांबता तिला दुर्लक्षित करून गाडीत जाऊन बसला. गाडीतील सिव्हिल ड्रेस मधील कॉन्स्टेबलने गाडी पोलीस स्टेशनकडे घेतली. सूरज बसलेली गाडी अनुज्ञाच्या जवळून गेली, पण सूरजने तिच्याकडे दृष्टीक्षेप देखील टाकला नाही. अनुज्ञा जाणाऱ्या गाडीकडे पाहत उभारली. डोळयांत पाणी दाटले होते...

अनुज्ञा बाहेर पाहत होती. प्रस्तुत घटना आठवून तिच्या डोळयांतून अश्रू ओघळत होते. ती रडतीये हे सूरजला समजू नये म्हणून ती त्याच्या नकळत ते अश्रू टिपत होती. पण अनुज्ञाचं रुदन सूरजच्या लक्षात आल्याशिवाय राहिलं नाही. अनुज्ञाचं दुःख त्याला कळणार नाही असं कसं होणार होतं?...

त्याने मान जरा तिरकी करून तिच्याकडे पाहिलं. त्यालाही वाईट वाटल्याशिवाय राहीलं नाही. मग काही तरी विचार डोक्यात घेऊन पुढं पाहत तो ड्राईव्ह करू लागला...

सूरजने गाडी थांबवली. तो गाडीतून उतरला. अनुज्ञा गोंधळून त्याच्याकडे पाहत होती. त्याने अनुज्ञाच्या बाजूला जाऊन तिच्यासाठी दार उघडलं आणि तलावाकडे चालत गेला. आणि निळयाशार शांत पाण्याकडे पाहत उभारला. थंड वारा खेळत होता व त्यामुळे सूरजचे कपडे फडफडत होते. अनुज्ञाही मग गाडीतून उतरून तिचा केस संभार सांभाळत सूरजपाशी येऊन उभी राहिली... सूरजला तिचं येणं जाणवलं. अनुज्ञाकडे न पाहता स्मित चेहऱ्यावर घेऊन आल्हादपणे तो बोलू लागला,

"माणसाला जेव्हा दुःख होतं, तेव्हा त्यानं निसर्गाकडं जावं. माणूस आपलं दुःख विसरून जातो. निसर्ग; आपलं मन त्याच्याकडं मोकळं करायला आपल्याला भाग पाडतो. आणि मग त्याच्या सोबतच स्वतःशी पण आपला संवाद घडतो..."

"मी तुझ्याशी इतकी वाईट वागले, तरी अजून तुला माझी काळजी वाटते?" अनुज्ञाने सूरजकडे न पाहता गंभीरपणे विचारलं.

सूरजने तिच्याकडे पाहिलं. म्हणाला,

"कारण अजूनही मी तुमच्यावर प्रेम करतो!"

हे ऐकून अनुज्ञानेही सूरजकडे पाहिलं,

"म्हणजे तुझं माझ्यावर प्रेम आहे म्हणून तू मला वाचवायला आलास?..." तिने गंभीरपणे विचारलं.

सूरज गंभीर झाला... वास्तविक चिडलाच,

"म्हणूनच मी म्हणालो, तुम्ही कधीच मला समजून घेऊ शकत नाही. मी तुम्हाला माझ्या प्रोफेशनबद्दल सांगितलं नव्हतं, कारण आपलं नवीन नातं तयार होत होतं. अशात मला तुम्हाला त्यावेळी कोणत्याच संकटात टाकण्याची इच्छा नव्हती. कारण मी ज्या केसवर काम करत होतो, ती कशी वळण घेईल हे सांगता येत नव्हतं. आपलं गांव इतकंस. नंदन, तो क्रिमिनल; त्याला तुमच्यापर्यंत पोहोचायला वेळ लागला नसता. म्हणून नंदनला कॅप्चर केल्यानंतर आणि आपली नीट ओळख झाल्यानंतर मी तुम्हाला सगळं सांगणार होतो. हे मी लपवणारच कसा होतो? मी सीआयडी ऑफिशियल आहे! काही क्रिमिनल नाही, की मी ते लपवून ठेवावं... मला सांगावंच तर लागणार होतं. आणि निर्णय देखील मी तुमच्यावरच सोडणार होतो... माझ्यासोबत येणं न येणं ही अल्टीमेटली तुमचीच चॉईस असणार होती."

निराशेने दीर्घ श्वास सोडून तो पुढे बोलला,

"कधीच कोणी मला समजून घेतलं नाही. वाटलं होतं, तुम्ही तरी मला समजून घ्याल; पण नाही!"

त्याने समोर पाहिलं,

"मला एकटं सोडून गेलात तुम्ही. आणि कारण काय; तर मरणाची भीती आणि स्वार्थ!

"आयुष्यभर एकत्र राहिल्यानं प्रेम यशस्वी होतं असं नाही अनु! त्यामुळं कधीतरी भविष्यात घडणाऱ्या संभाव्य घटनांचा विचार करून स्वतःला स्वतःच्या प्रेमापासून दूर ठेवण्यात काय अर्थ आहे, सांगा ना?!" अनुज्ञाकडे पाहत सूरजने तिला रागाने पृच्छा केली.

अनुज्ञाचे डोळे पाणावले होते...

"तू माझ्यावर प्रेम केलंस खरं; पण कधी 'तू' मला समजून घेण्याचा प्रयत्न केल्यास?" तिनं नाराजीने विचारलं व ती ठामपणे पुढे म्हणाली,

"मी स्वार्थ आणि भीतीपोटी तुझी साथ सोडली असं वाटतं ना तुला? तुला जाणून घ्यायचंय खरं कारण काय आहे ते?

"तर ऐक! मीही तुझ्यावर प्रेम केलंय सूरज! आणि प्रेमात आपण स्वतःचा नाही, तर आपल्या प्रियकराचा विचार आधी करतो! तुझ्यासोबत मला मरण जरी आलं ना, तरी त्याची मला पर्वा नाही." तिने सूरजकडे पाहिलं,

"तुला मी नकार का दिला माहितेय? जेव्हापासून मी तुला हो म्हणाले होते, तेव्हापासून तुझं सगळं लक्ष माझ्यावरच केंद्रीत होतं. अशानं तू तुझं कर्तव्य कसं पार पडणार होतास? हा; सुरवातीला तू माझी किती काळजी करतोयस हे बघून मला बरं वाटलं होतं. पण नंतर माझ्या लक्षात आलं, की हे चुकीचं आहे! सूरज, आपलं कर्तव्य फक्त आपल्या लोकांप्रती नसतं, तर संपूर्ण समाजाप्रती असतं आणि हेच तू विसरत चालला होतास... हे मला समजलं... म्हणून मला पहायचं होतं, की स्वार्थ आणि कर्तव्य यांपैकी तू कशाची निवड करतोस. आणि तू मला हवा तोच निर्णय घेतलास. आणि म्हणून तुझ्या कर्तव्यपूर्तीमध्ये बाधा येऊ नये यासाठी मला तुला सोडून जाणं भाग होतं! तू साधारण व्यक्ती असतास, तरीही मी हेच केलं असतं!"

बोलता बोलताच अनुज्ञा दुःखी झाली. तिनं हताशपणे खाली पाहिलं. थोडावेळ शांत राहिली. आपली तगमग बोलून दाखवावी की नाही हा विचार तिच्या मनात घोळला. पण मग ठरवून ती बोललीच. म्हणाली,

"तुला माहितेय? मी तुझ्यावर हात उचलला तेव्हा रात्रभर मी खूप रडले... तुला जेवढ्या वेदना झाल्या असतील, त्याहून किती तरी जास्त वेदना मला झाल्या होत्या...!"

सूरजने अपराधीपणे अनुज्ञाकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर खूप संमिश्र असे भाव होते. डोळयांत आसवं दाटत होती...

"अनु...!" दाटलेल्या कंठाने सूरज गहिवरून उद्गारला.

अनुज्ञा मात्र सूरजशी नजर चोरत त्याला प्रतिसाद न देता पुढं... बोलली,

"एकदा तू त्या क्रिमिनलला स्टँडवर पकडलं होतंस. त्यावेळी मी तिथंच होते. आणि हे तुला माहीत आहे हे मला जाणवत होतं. तरी तू माझ्याकडं पाहिलं देखील नाहीस. मला दुःख तर झालं, पण नंतर मला विसरून तू तुझं कर्तव्य पार पाडतो आहेस या भावनेनं मी सुखावले!"

सूरजने क्षमा याचनेसाठी अनुज्ञाचे हात हातात घेतले. तो गहिवरला होता...

"मला माफ करा अनु... माझ्या कर्तव्यपूर्तीसाठी तुम्ही स्वतःच्या प्रेमाचा त्याग करून स्वतःवर इतका मोठा अन्याय केलात; आणि मी पण तुम्हाला समजून न घेऊन तुमच्यावर अन्यायच केला. मला माफ करा...!" तो आसवं ढाळत शब्दांना वाट करून देत होता...

तो डोकं अनुच्या हातांवर ठेऊन रडू लागला...

अनुज्ञाने भरलेल्या डोळयांनी सूरजला सावरत त्याला साद घातली...

"सूरज..."

तिने सूरजचा चेहरा वर करत त्याचे डोळे पुसले.

"अनु, ज्या हेतूसाठी तुम्ही मला सोडून गेलात, तो हेतू तर साध्य झालाच नाही. मी माझ्या कर्तव्यात कमी पडू नये अशी तुमची इच्छा होती ना... पण मी... मी मात्र माझ्या कामाकडं दूर्लक्षच केलं. तुम्हाला वाटत असेल ना, की मी... तुम्हाला विस्... विसरलो; पण नाही अनु! माझ्यात तुमचा सामना करण्याची हिंमत उरली नव्हती... अनु, तुम्ही माझी स्ट्रेंथ आहात. माझं कर्तव्य पार पाडण्यामागची माझी प्रेरणा तुम्ही आहात! प्लिज अनु इथून पुढं तुम्ही कधी मला सोडून जाऊ नका. प्लिज..." सूरज सद्गदीत रडत म्हणाला.

अनुज्ञाने पुन्हा सूरजचे अश्रू टिपले.

"आएम सॉरी सूरज! आएम सॉरी! आता मी तुझ्यापासून कधीच दूर नाही जाणार...!" अनुज्ञा गिल्टीली म्हणाली.

त्यांनी प्रेमाने एकमेकांना आलिंगनात घेतलं... काहीवेळाने सूरजने अनुज्ञाला बाजूला करून तिचे अश्रू पुसले. ते समाधानी नजरेनं एकमेकांकडे पाहत काही काळ तसेच उभारले. दोघांच्याही चेहऱ्यावर समाधानी हसू व डोळयांत आनंदाश्रू...

काही वेळाने मग सूरजने अनुज्ञाचा हात हाती घेतला. असा; की जणू आता तो कधीच सोडायचा नाही... दोघे गाडीच्या दिशेने चालू लागले...

१४.

शोएब जीपमधून घाईने उतरून पळत फॅक्टरीच्या एंटरन्सकडे धावला. तो आत शिरला, तर चार माणसं कोण - कोण क्रिमिनल्स जीवंत आहेत हे पाहून त्यांना फायर करून ठार करत होते. त्यांतील एकजण जखमी असलेल्या फ़ज़लजवळ आला. फ़ज़ल अजूनही जमिनीवरच पडलेला. त्या माणसाने फ़ज़लवर गन ताणली. फ़ज़ल डोळे उघडून त्या माणसाकडे फक्त बघत होता. माणसाने त्याच्या पिस्टलची मॅगझीन चेंज करून पिस्टल लोड केली व ती फ़ज़लवर एम केली. तो ट्रिगर दाबणार इतक्यात... शोएब तेथे पोहोचला. विचलित होऊन त्यांच्याकडे पाहत राहिला...

मंदिराबाहेर सूरजची गाडी थांबली. सूरज व अनुज्ञा उतरून मंदिरात गेले.

सूरजने दाराजवळूनच श्री स्वामी समर्थांना नमस्कार केला. राहिलेले काही भक्त मंदिराबाहेर जात होते...

"आपण सोबत नव्हता, त्यावेळी समर्थांनीच मला सावरलं. नाही तर माहीत नाही, माझं काय झालं असतं..." समर्थांना नमस्कार करणाऱ्या अनुज्ञाला सूरज बोलला.

सूरजची नजर भक्तांसाठी मांडलेल्या चटया गोळा करत असलेल्या पुजाऱ्यावर पडली. सूरजने हसत मुखाने त्यांना हाक मारली,

"आजोबा!"

पुजाऱ्याने चटई उचलत वर सूरजकडे पाहिलं. सूरज लगबगीने त्यांच्याकडे येत त्यांना चटया गोळा करण्यास मदत करू केली व पुजाऱ्याच्या हातातील चटया त्यांच्याकडून घेतल्या.

"तुझं कार्य यशस्वी झालं म्हणायचं तर." पुजारी सूरजला चटया देत हसत मुखाने म्हणाले.

"हो." सूरज हसून उत्तरला.

अनुज्ञाही आतापर्यंत थोडी पुढं आलेली होती. सूरजने तिच्याकडे हस्तनिर्देश केला,

"आजोबा, या अनुज्ञा!"

सूरजने चटया बाजूला योग्य ठिकाणी ठेवल्या.

पुजारी अनुज्ञाकडे पाहत स्मित करतच म्हणाले,

"म्हणजे हिच्यामुळंच तू तुझ्या कर्तव्यापासून दुरावला होतास तर..."

त्यांनी मागे सूरजकडे पाहिलं. सूरज होकारार्थी मान डोलावत होता.

"पुन्हा असं करू नको!" पुजारी त्याला म्हणाले.

सूरजने पुन्हा सिरियस्ली होकारार्थी मान डोलावली. पुजाऱ्यानी अनुज्ञाच्या दिशेने येत भगवद्गीतेतील अध्याय 'चार - ज्ञानकर्मसन्यासयोग' मधील एकरावा श्लोक उच्चारला...

"ये यथा माँ प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् । मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ हे अर्जुन! जो मनुष्य मला ज्या प्रकारे भजतो, ज्या इच्छेने माझे स्मरण करतो; त्या अनुरूप मी त्याला प्राप्त होतो! सर्व लोक सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुसरण करतात! असं स्वामी म्हणतात."

पुजारी बोलता बोलता अनुज्ञापाशी पोहोचले व पुढे बोलले,

"आणि मला वाटतं, तू ईश्वराला ज्या प्रकारे स्मरण केलेस, त्या प्रकारे तो तुला प्राप्त झाला आहे." त्यांनी मागे सूरजकडे पाहिलं व स्मित केलं,

"नाही?!" त्यांनी सूरजला हसून विचारलं.

"होय!" सूरज स्मित करून मान्य करत म्हणाला.

"बरं स्वामींपुढंचा दिवा विझलाय. लाव. जा." पुजारी त्याला म्हणाले.

सूरज "होय" म्हणून गर्भगृहात प्रवेशला. दिवा लावू लागला...

इकडे पुजारी अनुज्ञाला हळू आवाजात बोलू लागले,

"तुमच्या विना सूरजची काय अवस्था झाली होती याची कदाचित तुम्हाला कल्पना नसेल. तो खूप हळवाय. त्यामुळं तो तुमचा विरह सहन नाही करू शकत. तुमच्यावरच्या प्रेमामुळं तो स्वतःच्या ईश्वराला तुमच्यामध्ये शोधतो आहे. त्याला तो भेटलाही आहे. त्यामुळं त्याला त्याची कर्तव्यं पार पाडण्यासाठी तुमची साथ खूप गरजेची आहे. समजतंय ना मी काय म्हणतोय?"

गहिवरलेल्या अनुज्ञाने तिच्याही न कळत गंभीरपणे होकारार्थी मान डोलावली. सूरज प्रसादाचं पात्र घेऊन त्याच्यापाशी आला. तो आलेला पाहून अनुज्ञाने तोंड बाजूला करत त्याच्या न कळत आपले डोळे पुसले. पुजारीही नॉर्मल झाले. सूरजने अनुज्ञाला प्रसाद देऊ केला.

"संध्याकाळची आरती झाली वाटतं?" सूरज पुजाऱ्याला म्हणाला.

अनुज्ञाने प्रसाद ग्रहण केला. पुजाऱ्याने सूरजकडून पात्र घेतलं व सूरजला प्रसाद देत ते म्हणाले,

"हो. तासभर झाला."

सूरजनेही प्रसाद ग्रहण केला. त्याने पुजाऱ्याचे चरण स्पर्श केले.

"असाच यशस्वी होत राहा!" पुजाऱ्याने स्मित करत त्याला आशीर्वाद दिला.

सूरज उभारला. पुजारी थोडं गंभीर होत पुढं म्हणाले...

"सूरज, आयुष्यात कोणी कुणालाही पुरत नाही. प्रत्येकाचा प्रवास वेगळा. त्यामुळं मार्गही वेगळा. म्हणून मोह नको. आपल्यासाठी दुसऱ्या कोणी कष्ट का सोसावेत? प्रेम आणि आसक्ती यातला फरक समजून घे! कळलं? काही जरी झालं, तरी यापुढं आपलं उत्तरदायित्व विसरू नको!"

सूरजने गंभीर होत मानेनेच 'हो' म्हंटलं. अनुज्ञानेही पुजाऱ्याचे चरण स्पर्श केले. पुजाऱ्याने तिलाही भरभरून आशीर्वाद दिले...

"सांगितलेलं लक्षात आलं ना?" पुजारी तिला म्हणाले.

अनुज्ञाही मानेनेच 'हो' म्हणाली.

"काय?" सूरजने उत्सुकतेने विचारलं.

"ते आमचं सिक्रेट आहे!" पुजारी स्मित करून त्याची मस्करी करत म्हणाले.

उद्देश हाच की त्यांच्या व अनुज्ञा मधील बोलणं त्यांना सूरजला कळू द्यायचं न्हवतं. पुजाऱ्याने सूरजची मस्करी करत हसून अनुज्ञाकडे पाहिलं. अनुज्ञाच्या चेहऱ्यावरही हसू आलं. हे पाहून सूरजही हसला. 'असो' अशा अर्थाने त्याने खांदे उडवले.

"बरं आजोबा येतो." सूरज पुजाऱ्याला म्हणाला.

"या." पुजाऱ्याने प्रसन्न चेहऱ्याने त्याला परवानगी दिली.

अनुज्ञानेही नजरेनेच जाण्यासाठी पुजाऱ्याची परवानगी घेतली. पुजारी स्मित करत मान डोलावत 'हो' म्हणाले. मग अनुज्ञा व सूरज यांनी स्वामी समर्थांच्या मूर्तीकडे वळून स्वामींना नमस्कार केला. अनुज्ञा व सूरज जाऊ लागले... पुजारी त्यांच्याकडेच पाहत होते. त्यांच्या चेहऱ्यावर सद्चिदानंद स्मित उमटलं होतं...

मंदिराबाहेर - गाडीजवळ अनुज्ञा थांबली.

"काय झालं अनु?" सूरजने तिला अचानक थांबलेलं बघून विचारलं.

"मला एक वचन देशील?" अनुज्ञाने सूरजचा हात हातात घेते गंभीरपणे विचारलं.

"हं." सूरजनं तिला वचन देण्याचं मान्य केलं.

"मी आयुष्यभर तुझी साथ देईन. पण भविष्य कोणालाही माहीत नाही. काही कारणानं मी दुरावले, तरी तू तुझ्या रिस्पॉन्सिबिलिटीज् पार पाडत राहशील..." अनुज्ञा त्याला बोलली...

सूरजने काही न बोलता गंभीरपणे, जड अंत:करणाने होकारार्थी मान डोलवली.

"बसा गाडीत." तो विषय टाळत म्हणाला.

अनुज्ञा मग पुढे काही न बोलता गाडीत बसली. सूरजही गाडीत बसून मग ड्राइव्ह करू लागला...

सूरज चालवत असलेली गाडी अनुज्ञाचं घर जवळ करत होती... आजूबाजूला असलेल्या झाडांच्या कमानीमुळे रस्त्यावर सावली पडली होती. आणि त्यामुळेच वातावरणातली हवा प्रखर ऊन असून थंड जाणवत होती. झाडांमुळे उन्हाची तीव्रता खूप कमी झाली होती.

ती संध्याकाळ अनुज्ञा आणि सूरज दोघांनाही खूपच रमणीय भासत असणार हे नक्की! त्यांची गाडी मोकळया रस्त्यावर एकटीच धावत होती...

सूरजने प्रेमाने स्मित करत अनुज्ञाकडे पाहिलं. आणि मग तो समोर पाहून स्वतःशीच बोलला...

"समर्थ म्हणतात, कोणत्याही गोष्टीचा मोह बाळगू नका. प्रेम म्हणजे मोह का? प्रेम हे बंधन आहे का? नाही! पण अनु जेव्हा माझ्यासोबत असतात, तेव्हा माझ्या मनातील सारे विकार लोप पावतात. मन विरक्त होतं. पण कर्तव्याचा विसर मात्र पडत नाही. उलट कर्तव्याची जाणीव तीव्र होते. मोह आणि स्वार्थ नाहीसे होतात. यालाच स्थितप्रज्ञता म्हणत असावेत का? उत्तर काहीही असो; पण मला माझी कर्तव्यं पार पडायची असतील, तर माझ्या अनु माझ्यासोबत असणं खरंच खूप गरजेचं आहे एव्हढं मात्र नक्की!"

समाधानी नजरेने अनुज्ञाकडे बघत तो विचार करू लागला,

"तरीही मी वचन देतो अनु! काही जरी झालं, तरी मला जे काम करायचंय ते करत राहीन! आपण जरी दुरावलात, तरी!"

अनुज्ञाही प्रेमभाऱ्या नजरेनं सूरजकडे पाहून मंजुळ स्मित करत होती. जणू सूरज काय बोलतोय हे तिला समजत असावं... तिने त्याचा हात घट्ट धरला व सूरजच्या खांद्यावर डोकं टेकवलं. तृप्त भावनेने सूरज समोर पाहून ड्राइव्ह करू लागला...

अनुज्ञाच्या घराबाहेर येऊन सूरजची गाडी थांबवली. दोघे गाडीतून उतरले. अनुज्ञा आनंदाने व अधीरतेने दरवाजाकडे पळत गेली. सूरज मात्र गंभीर होत काहीवेळ घराकडे पाहत उभारला व मग त्यानेही पायऱ्या चढल्या. अनुज्ञा अधीरतेने बेल वाजवत होती...

पुरुषोत्तमने येऊन दार उघडलं. समोर अनुज्ञाला पाहून तो बेहद खुश झाला. अनुज्ञानेही त्याला अधीरतेने मिठी मारली. तिच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता.

"बाबा!" ती आनंदाने उद्गारली.

"कशी आहेस बाळा? तुला काही झालं तर नाही ना?" पुरुषोत्तमने काळजीने डोळयांत पाणी आणून विचारलं.

"काही नाही. मी अगदी ठिक आहे!" अनुज्ञा पुरूषोत्तम सोबत आत येत त्याला निश्चिंत करत म्हणाली.

सूरजही त्यांच्या मागून आत आला. अनुज्ञा बाजूला झाली. पुरुषोत्तमने कृतज्ञतापूर्वक पुढं होऊन सूरजचे हात हातात घेतले.

"आय ओव्ह् यू मिस्टर सूरज! तुमचे खरंच खूप उपकार आहेत. तुमचे आभार कसे मानू तेच कळत नाही. धन्यवाद हा शब्द देखील लहान आहे तुमच्या उपकरापुढे..." सूरजला पुरुषोत्तम कृतज्ञतेने म्हणाला. आणि अचानक आठवल्यासारखं त्यानं विचारलं,

"पण एक गोष्ट मला समजली नाही. जाताना तुम्ही असं का म्हणालात, की अनु तुमची जबाबदारी आहे?"

सूरज जरा संकोचला. पण बोलला,

"सर! खरं सांगायचं, तर मी अनुज्ञांवर खूप प्रेम करतो. मी सांगू शकत नाही, की अनु माझ्यासाठी काय आहेत. पण इतकं मात्र सांगू शकतो, की या माझं सर्वस्व आहेत! यांच्यामुळंच माझ्यातला माणूस जीवंत आहे. माझ्यातलं सत्य जीवंत आहे. आणि म्हणूनच मी यांना गमावू इच्छित नाही! शिवाय अनुज्ञाही माझ्यावर प्रेम करतात. पण तुमची इच्छा नसेल, तर मी अनुज्ञांच्या आयुष्यातून निघून जायला ही तयार आहे!" सूरजने त्याची भूमिका स्पष्ट केली.

सूरजचं बोलणं ऐकून घेतल्यावर पुरुषोत्तमच्या चेहऱ्यावर हसू उमटलं.

"मिस्टर सूरज, जर आमची अनु देखील तुमच्यावर प्रेम करत असेल, तर तिच्या सुखाच्या आड आम्ही कसं येऊ शकतो? मला कायम तिला सुखीच तर बघायचंय!" पुरुषोत्तम म्हणाला.

सूरज आश्चर्याने व अविश्वासाने पुरुषोत्तमकडे पाहत राहिला. त्याचे डोळे पाणावले. अनुज्ञाने आनंदाने पुरुषोत्तमला मिठी मारली.

"थँक्स बाबा!" अनुज्ञा बोलली.

"धन्यवाद सर!" सूरजने कृतज्ञतापूर्वक पुरुषोत्तमचे आभार मानले.

पुरुषोत्तमने डोके हलवून सूरजचे आभार स्वीकारले.

"मला आता निघायला हवं." सूरज अनुज्ञा व पुरुषोत्तम दोघांना उद्देशून म्हणाला.

पुरुषोत्तम व अनुज्ञा दूर झाले. सूरज जाण्यास वळला. अचानक त्याला काही आठवलं. तो पुन्हा पुरुषोत्तम व अनुज्ञाकडे वळला.

"सर, आपली हरकत नसेल, तर... मला अनु यांना एक गिफ्ट द्यायचंय!" सूरज अनुमती मागत पुरुषोत्तमला म्हणाला.

"हो हो. नक्की!" पुरुषोत्तमने हसून परवानगी दिली.

सूरजने त्याच्या उजव्या करंगळीतून एक अंगठी काढून अनुज्ञाच्या डाव्या हाताच्या 'अनामिके'त घातली व अनुज्ञाला म्हणाला,

"माझ्या आईने मला गुडलकसाठी दिलेली ही अंगठी."

त्यानं स्वतःशीच स्मित केलं,

"या गोष्टींवर माझा विश्वास नाही, पण आईचा आशीर्वाद म्हणून जवळ ठेवतो. माझ्यासाठी खूप किंमती आहे. हॅपी ब'डे अनु! अनु; आज आपल्या प्रेमाला तुमच्या वडिलांची संमती मिळाली. आज खऱ्या अर्थानं आपल्याला आपलं प्रेम मिळालं. खऱ्या अर्थानं आज आपलं प्रेम यशस्वी झालं!" तो गहिवरल्या अंतकरणाने तिला म्हणाला.

अनुज्ञाने भरल्या डोळयांनी स्माईल करत होकारार्थी मान हलवली.

"काळजी घ्या." सूरज तिला म्हणाला.

अनुज्ञाने पुन्हा मान डोलवली,

"तुही!" ती म्हणाली.

सूरजने मग पुरुषोत्तमकडे पाहिलं.

"येतो सर." तो म्हणाला.

पुरूषोत्तमनेही स्मित करत 'हो' म्हंटलं. सूरज निघून गेला. अनुज्ञाने परत आनंदाने पुरुषोत्तमला मिठी मारली. पुरुषोत्तमने देखील आनंदाने व प्रेमाने तिला थोपटलं.

"जा फ्रेश हो. आणि अमेयला पण भेट. तोही खूप काळजीत आहे." पुरुषोत्तम अनुला बाजूला करून म्हणाला.

अनुज्ञा तिच्या रूमकडे गेली. पुरुषोत्तमने चीफला कॉल केला,

"हा. मिस्टर गोम्स, सूरज अनुला घेऊन घरी आला आहे!"

## १५. पुढील दिवस - तारीख: २७ एप्रिल -

सूरज पेठ वडगांव पोलीस स्टेशनला आला. कार कडेला पार्क करून तो पोलीस स्टेशनमध्ये शिरला.

सूरजने शोएबच्या केबिनचं दार ढकललं. त्याने पाहिलं, की फ़ज़ल शोएबसमोर खुर्चीत बसला होता. दोघे दिलखुलास हसत होते. सूरजला खूप राग आला...

सूरज अनावर रागाने पळत आत केबिनमध्ये आला व फ़ज़लच्या खुर्चीला लाथ मारून त्याने फ़ज़लला खाली पाडलं. शोएब भीती व गोंधळ हे मिश्र भाव घेऊन उठून उभा राहिला. सूरजने दोन्ही हातांनी फ़ज़लची कॉलर पकडून त्याला उठवलं व शोएबसमोर त्याला खेचत आणलं.

"शोएब, मला तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती!" सूरज चिडून शोएबकडे पाहत म्हणाला.

त्याचवेळी मग चीफ केबिनमध्ये प्रवेशला. सूरजने फ़ज़लला पकडलंय हे त्याने पाहिलं व गडबडीने पुढं येऊन सूरजचे फ़ज़लच्या कॉलरवर असलेले हात त्याने बाजूला केले.

"सूरज काय करतोय हे?" चीफने ओरडून विचारलं.

"हा कोणी सामान्य सिटीझन नाही सर! यांनंच अनुंना किडनॅप केलं होतं!" सूरज भान विसरून ओरडला.

"ठिकाय मी बघतो काय करायचं ते." चीफ शांत होत म्हणाला व त्याने मोठ्याने हाक मारली,

"हवालदार!"

कॉन्स्टेबल पळत आत आला. त्याने सल्युट केलं.

"याला बाहेर घेऊन जा!" चीफ फ़ज़लकडे बोट करत कॉन्स्टेबलला बोलला.

कॉन्स्टेबल फ़ज़लला घेऊन गेला.

"सर, तुम्ही इथं..." चीफ तिथं येण्याची अपेक्षा नसल्याने सूरजने चीफला विचारलं.

"केस शोएब यांच्या ज्यूरिस्डिक्शन अंडर येते ना म्हणून त्यांना भेटायला आलो होतो. बरं झालं तूही इथंच आहेस. रिपोर्ट आहे आत्ता तुझ्याजवळ?" चीफने विचारलं.

"हो. गाडीत आहे."

"आण. जा."

सूरजने हो म्हणून चीफला सल्युट केलं. आणि शोएबकडे न पाहताच बाहेर निघून गेला.

केबिन बाहेर - फ़ज़लला केबिनला लागूनच असलेल्या बाकावर बसवलेलं होतं. त्याला बाहेर घेऊन आलेला कॉन्स्टेबल त्याच्या बाजूला उभारला होता. सूरजने फ़ज़लकडे जळजळीत नजर टाकली. फ़ज़ल देखील सूरजकडे पाहतच होता. थोडावेळ रागाने फ़ज़लकडे बघून सूरज पोलीस स्टेशनबाहेर पडला.

सूरजने गाडीचे दार उघडून डॅशबोर्डवरील फाईल घेतली व पुन्हा पोलीस स्टेशनच्या पायऱ्या चढू लागला...

पोलीस स्टेशनमध्ये शोएब व चीफ फ़ज़लसोबत उभे होते. हे पाहून सूरज मग दारापाशीच थबकला. चीफ पाठमोरा होता. त्यांच्यात काय बोलणं चालू आहे हे सूरज ऐकण्याचा प्रयत्न करू लागला...

आधी फ़ज़ल शोएबच्या केबिनमध्ये, नंतर फ़ज़लला लॉक न करता त्याला फक्त बाहेर बसवलं गेलं होतं आणि आता चीफ शोएब व फ़ज़ल तिघे एकत्र! शंकेला जागा होती... आणि म्हणूनच सूरज दरवाजापाशी थांबला... चीफचं बोलणं त्याच्या कानांवर पडलं...

"आपलं मिशन होतं, अनुज्ञा आणि सूरजला पुन्हा एकत्र आणणं. आणि ते सक्सेसफूल झालंय. सूरज इथून गेला, की तू निघ."

हे ऐकून सूरज स्तब्ध झाला. अक्षरशः त्याला सुचणं-समजणंच बंद झालं...

फ़ज़लने होकारार्थी मान हलवली. अचानक त्याची नजर सूरजवर पडली. सूरजला पाहून फ़ज़लच्या चेहऱ्यावरील भाव बदलले. चीफला हे जाणवलं. त्याने मागे बघितलं. तर सूरज डोळयांत आसवं घेऊन त्यांच्याकडे पाहत उभा त्याला दिसला. चीफला हे अपेक्षितच होतं तरीही...

"सूरज..." चीफ खोटं दचकून उद्गारला...

सत्य काय ते सूरजला समजावं यासाठीच तर त्याने हे घडवून आणलं होतं... नाही तर सूरज पुन्हा आपल्या जबाबदाऱ्या व कर्म-कर्तव्य यामध्ये वाहवत जाण्याची शक्यता होती आणि त्याची प्रचिती त्याने आत्ताच केबिनमध्ये पाहिली होती.

"हो. हा रिपोर्ट..." सूरज गहिवरून म्हणाला.

आणि त्याचा कंठ दाटला. चीफ सूरजकडे आला. त्याच्या मागून शोएब व फ़ज़लही सूरजपाशी आले. सूरजने फ़ज़लला घट्ट मिठी मारली. अपराधीपणे सूरजला रडू कोसळलं...

"मला माफ कर... मी तुला समजायला चुकलो... प्लिज मला माफ कर!... मी विनाकारण मारलं ना तुला..." तो रडत म्हणाला.

फ़ज़लनेही त्याला घट्ट धरलेलं होतं. मन मोकळं करण्यासाठी तो त्याला रडू देत होता... फ़ज़लच्या डोळयांत देखील पाणी आलेलं होतं, पण वर्षभराने आपला मित्र परत मिळाल्याने त्याच्या ओठांवर हसू होतं...

"दोस्ती में चलता है यार! चल छोड़ अब, रोना बंद कर!" फ़ज़ल त्याला म्हणाला.

काही वेळाने, सूरज स्वतःला सावरून मागे सरकला.

"पण तुला तर माझ्यावर राग होता ना? मग..." सूरजने डोळे पुसत विचारलं.

फ़ज़लने त्याच्या प्रश्नांवर ब्रॉड स्माईल केलं,

"दोस्ती तो ऐसेही होती हैं ना यार! राग, रूसवा असतोच ना रे. पण तो जास्त काळ टिकत नाही." तो बोलायचं थोडं थांबला आणि मग पुढे म्हणाला,

"हो. त्यावेळी मी तुझ्यावर खूप रागावलो होतो. या रागातूनच मागच्या वर्षी अनुज्ञाच्या वाढदिवसा दिवशी मी तुझं आणि नदिनीचं बोलणं ऐकलं होतं. तेव्हा माझ्या लक्षात आलं, की तू तिला आपल्या नेहमीच्याच रेस्टॉरंटला नेणार. तू जसं अनुज्ञा समोर माझा अपमान केलास, तसा मलाही तिच्यासमोर तुझा बदला घ्यायचा होता. मला संधी हवी होतीच..." तो म्हणाला.

फ़ज़ल व माफिया नंदन त्याच्या हाईडआऊटच्या ठिकाणी बसले होते...

"बोल फ़ज़ल, आज इथं कसं येणं केलंस?" माफियाने त्याला विचारलं.

"एकाचा काटा काढायचाय!" फ़ज़ल चिडून म्हणाला.

आणि त्याने मोबाईल मधील सूरजचा फोटो माफियाला दाखवला.

"हा आहे होय!" माफिया फोटो पाहत म्हणाला व त्याने मोबाईल हातात घेतला. तो सूरजचा फोटो पाहत एक्साईटेड् झाला,

"फ़ज़ल; तू माझ्याकडं येऊन उलट तू मलाच मदत केली आहेस!" तो म्हणाला.

"ते कसं?" फ़ज़लने विचारलं.

"तुला तर माहीतच आहे, मी सोन्याची तस्करी करतो. धंदा एकदम व्यवस्थित चालू होता. पण यानं माझ्या कामगारांना अटक केली. माझा मालही जप्त केला. मला वर्कशॉप बंद करावं लागलं. माझं करोडोंचं नुकसान तर झालंच, पण आता उंदरासारखं या फार्महाऊसवर लपून बसावं लागलंय याच्यामुळं! याला संपवला, की मी काम चालू करायला मोकळा. तू मला फक्त सांग, हा कुठं भेटंल. पुढचं सगळं माझी माणसं सांभाळून घेतील!" माफिया म्हणाला.

"योग्य वेळ आली की कळवतो." फ़ज़ल माफियाला म्हणाला.

फ़ज़ल सूरजला पुढं सांगू लागला,

"आणि अनुज्ञाच्या वाढदिवसाला मला ती संधी मिळाली! तू अनुज्ञाला घेऊन रेस्टॉरंटला जाणार हे ऐकल्यावर मी त्याच्या माणसांना तुला मारण्यासाठी तिथं घेऊन आलो. अनुज्ञा तुला सोडून गेली, तेव्हा मी तिथंच होतो. नंतर तुझ्या मागावर राहिलो, पण तुझी होत चाललेली वाईट अवस्था बघून मग काही काळानं मला माझी चूक लक्षात आली. आणि..."

"आणि तुझा हा मित्र मला येऊन भेटला..." चीफ मधेच बोलला.

चीफ त्याच्या केबिनमध्ये खुर्चीत बसला होता. फ़ज़ल अपराधीपणे त्याच्या समोर उभा...

"बसा." चीफ त्याला म्हणाला.

"नाही असू द्या." फ़ज़ल.

"बोला." चीफ

"मी फ़ज़ल अब्दुल्ला. सूरजचा मित्र. माझं आणि सूरजचं एकाच मुलीवर प्रेम होतं. त्यामुळं त्यानं माझ्याशी भांडण केलं. पुढं तिनंही सूरजला होकार दिला. त्यामुळं मी चिडून एका माफियाला त्याची सुपारी दिली..." फ़ज़ल अपराधीपणे चूक कबूल करत होता.

हे ऐकून चीफला राग अनावर झाला. तो डेस्कवर हात आदळत उठून उभारला. पुढचं काही ऐकून न घेता...

"काय? तुला माहितीय तू किती मोठा गुन्हा केलायस? एका सीआयडी ऑफिसरला मारण्याचा प्रयत्न केलायस तू!" चीफ चिडून ओरडला.

"तीच चूक मला सुधारायची आहे..." फ़ज़ल आशेने खाली मान घालून म्हणाला.

चीफने थोडा विचार केला... शांत होत म्हणाला,

"ठिकाय! सूरजचा मित्र आहेस म्हणून तुला माफ करतो. बोल; काय मदत हवी आहे तुला माझ्याकडून?"

"जेव्हा अनुज्ञाला समजलं, की सूरज सीआयडी ऑफिसर आहे, तेव्हा ती सूरजला सोडून गेली. मला त्या दोघांना पुन्हा एकत्र आणायचंय. आणि हेच माझ्या चुकीचं प्रायश्चित्त असेल!" फ़ज़ल म्हणाला.

चीफ गंभीर झाला. विचार करू लागला...

"देन वी केम अप विथ एन आयडिया. आम्हाला माहीत होतं, की तुला तुझं कर्तव्य खूप महत्त्वाचं आहे. म्हणून ठरवलं, की असं काही तरी करायचं, ज्यानं तुझं कर्तव्यच तुला तुझं प्रेम परत मिळवून देईल..." चीफ सांगत होता...

चीफ व पुरुषोत्तम पुरुषोत्तमच्या ऑफिसमध्ये बसले होते... चीफ त्याला सूरज व अनुज्ञाबद्दल सांगत होता...

"माझा एक ऑफिसर आहे, सूरज क्षीरसागर. व्हेरी सीन्सियर्! मोअर ऑफ ऑल, ही इज अ गुड पर्सन. दॅट्स वाय, ही इज लाईक अ सन टू मी."

'तुम्ही हे मला का सांगत आहात' हे भाव पुरुषोत्तमच्या चेहऱ्यावर उमटलेले पाहून मग चीफने मुद्द्याला हात घातला,

"आणि तो तुमच्या मुलीवर खूप प्रेम करतो. हेही तितकंच खरं आहे, की तुमची मुलगी अनुज्ञा देखील सूरजवर प्रेम करते. पण जेव्हा तिला हे समजलं, की सूरज सीआयडीत आहे, तेव्हा तिनं सूरज समोर कर्तव्य की प्रेम असा प्रश्न उपस्थित केला. आणि सूरजने कर्तव्याची निवड केली. त्यामुळं ते मग वेगळे झाले. आणि आता सूरज त्याचं कर्तव्य तर पार पाडतो आहे, पण स्वतःची सद्सद्विवेक बुद्धी मात्र गमावून बसलाय. आणि विवेक बुद्धिशिवाय केलेलं कर्म, हे कर्त्यासाठीच नाही, तर समाजासाठी देखील घातक असतं."

"आपल्याला हवंय काय?" पुरुषोत्तमने थेट प्रश्न केला.

"सूरजला तुमच्या अनुज्ञाची आवश्यकता आहे. पण दोघंही एकमेकांसोबत बोलणार नाहीत हे स्पष्ट आहे. सो, या दोघांना एकत्र आणण्यासाठी एक प्लॅन आहे. पण यात तुमची संमती अत्यंत गरजेची आहे. मी तुम्हाला विश्वास देतो, की सूरज तुमच्या मुलीला खूप सुखी ठेवेल. तिला कोणताही त्रास होऊ देणार नाही. ही इज द बेस्ट इन हिज वर्क. त्यामुळे तुमच्या मुलीला सुखी ठेवण्यातही तो बेस्टच असेल. आणि एक बापाला त्याच्या मुलीसाठी हेच तर हवं असतं. ट्रस्ट मी. मला त्याच्या सारखं पोटेन्शियल वाया जाऊ द्यायचं नाहीये! आणि असं होण्यापासून फक्त तुमची मुलगी रोखू शकते! बीकॉज, दे आर इन लव!"

पुरुषोत्तम थोडा विचार करून चीफकडं पाहत चेहऱ्यावर हास्य घेऊन आनंदाने म्हणाला,

"कर्तव्यासाठी आपल्या स्वार्थाचाही त्याग करणारा असा कर्तव्यनिष्ठ जावई मिळणार असेल, तर मी तुम्हाला हवी ती मदत करायला तयार आहे!"

चीफ भाव न बदलता बोलला,

"पण अनुज्ञाला यातलं काही कळता कामा नये. ज्याअर्थी ती त्याच्यापासून दूर गेली आहे, त्याअर्थी मला नाही वाटत, की ती आपल्याला साथ देईल. त्यांच्यात संवाद घडवण्याचा हाच एक मार्ग आहे."

पुरुषोत्तमने विचार केला व म्हणाला,

"माझी मुलगी तशी हट्टी आहेच म्हणा... ठिकाय! आय कॅन अंडरस्टँड! पण वचन द्या, तिला काही होणार नाही!"

"नक्कीच नाही. सूरज असताना तर अजिबात नाही!" चीफ स्मित करत पुरुषोत्तमला आश्वस्त करत म्हणाला.

"आणि मी त्यांना फ़ज़लचा प्लॅन सांगितला." चीफ सूरजला बोलला व त्याने स्मित केलं. फ़ज़लकडे इशारा करून चीफ सूरजला पुढे म्हणाला,

"याच्या इतका चांगला तुला कोणी ओळखत नाही."

सूरजने हसून फ़ज़लकडे पाहिलं. फ़ज़लनेही स्माईल केलं. चीफ पुढं म्हणाला,

"त्यानंतर २३ तारखेला तुला भेटण्यापूर्वी मी तुझ्या घरच्यांना भेटलो..."

सूरजचे वडील व चीफ बोलत होते... चहाचे भरलेले कप, पाण्याचे ग्लास टी-पॉयवर ठेऊन होते. सूरजची आई गंभीर चेहऱ्याने भिंतीलगद चिंतित उभारली होती. सोबत तिची बहीण नलिनीही होती.

"सूरजला मी माझा मुलगाच मानतो. पण फक्त एवढंच कारण नाही; तर समाजाला आणि पर्यायानं आमच्या डिपार्टमेंटलाही त्याच्या सारख्या कर्तव्यनिष्ठ अशा देशावर, समाजावर प्रेम

करणारा ऑफिसर्सची गरज आहे! तो कर्तव्यनिष्ठ आहे, आता त्याला कर्मठ बनवायचंय! म्हणून मी हे करतोय!" चीफ गंभीरपणे म्हणाला.

"त्याला काही होणार तर नाही ना...?" विचारमग्न आईने डोळयांत पाणी आणत सचिंत विचारलं. तिच्या आवाजात जडत्व होतं.

चीफ बोलत होता... त्याने आईकडे पाहिलं. तिला आश्वासित करत तो म्हणाला,

"त्याला थोडा मानसिक त्रास होईल. पण आपल्या पुढं दुसरा पर्याय नाही. त्याला समजायला हवं, की आयुष्यात संतुलन खूप महत्त्वाचं आहे! त्यानं कर्तव्यासाठी प्रेमाचा त्याग केला खरा; पण तो आता त्याच्या कर्तव्यातच कमी पडतो आहे. तो सध्या सारासार विचार करू शकत नाहीये... आणि म्हणूनच आपल्याला हे करावंच लागणार आहे. काळजी करू नका ताई. त्याला कोणतीही शारीरिक इजा होणार नाही. मला त्याच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे. शिवाय काही गडबड झालीच, तर बॅक-अप टीमही तयार आहेच!"

चीफने वडिलांकडे पाहिलं व बोलला,

"तुम्ही फक्त ४ दिवस कुठं तरी गावी जा. एवढंच करा."

वडील, आई, नलिनी मावशी सर्व खाली पाहत विचारांत गढून गेले. चीफ वडिलांच्या निर्णयाच्या प्रतीक्षेत त्याच्याकडे पाहत होता...

"फेक बॉम्ब असलेली कार, अनुज्ञाचं किडनॅपिंग, हे सगळं प्लॅनचाच भाग होता! पण तिला एक महिन्यापूर्वी बंधक बनवलं नव्हतं. प्लॅन एग्झेक्युट करण्याच्या दिवशी म्हणजे २५ तारखेला तिला कॉल करून बोलवलं होतं...

"त्या क्रिमिनल्सना मुक्त करण्याचं आश्वासन देऊन त्यांनाही मी या प्लॅनमध्ये सामील करून घेतलं. त्यांना फुकट पोसण्यापेक्षा, म्हंटलं त्यांचं जीवन सार्थकी लावावं. हं!" चीफ सूरजला बोलला व कुटील हसला,

"आणि मी दिलेल्या सूचनेप्रमाणे ते आता त्यांच्या जीवनातून मुक्त झालेत!"

"निलेशही माझ्या सोबत होता. कारण तो एकटाच असा होता, जो नॉर्मली तुझ्या घरी येऊ-जाऊ शकत होता. तोच अनुज्ञाला काही काम काढून माझ्या फॅक्टरीत घेऊन आला होता. हा! शोएबने भी इसमें बहुत मदद की।" फ़ज़लने आणखी काही गोष्टी स्पष्ट केल्या.

सूरजने शोएबकडे पाहिलं. आणि मस्करीत त्याच्या पोटात मारलं,

"मुझे पहले ही समज जाना चाहिए था, जब तूने रेस्ट्रॉन्ट में अनु का जिक्र किया था।" सूरज त्याला म्हणाला.

शोएब मोठ्याने हसला,

"पर तब तो तू सोचने-समझने की कुवत गवाँ चुका था ना।" तो सूरजला हसत बोलला.

'यांचं करायचं काय' या भावमुद्रेने सूरजने स्मित करत मान डोलावली. आणि मग अचानकच काही सुचून चीफकडं पाहून तो गंभीर झाला...

"पण सर, आता सुपिरियर्सना काय सांगायचं?" त्याने विचारलं.

"तू त्याची काळजी सोड." चीफ त्याला चिंतामुक्त करण्यासाठी म्हणाला.

सूरजने प्रश्नार्थक नजरेनं त्याच्याकडे पाहिलं. मग चीफने एक्स्प्लेन केलंच,

"ते क्रिमिन्सल जेल तोडून पळाले आणि पेठ वडगांव या गावी ते लपून बसले. एका मुलीलाही हॉस्टेज म्हणून त्यांनी किडनॅप केलं होतं. त्या क्रिमिनल्सना कॅप्चर करून मुलीला वाचवण्यासाठी सिनियर इंस्पेक्टर सूरज क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली एक टीम गेली असता, त्यांना जीवे

मारण्याचा प्रयत्न त्या क्रिमिनल्सकडून केला गेला. म्हणून सूरज क्षीरसागर व त्यांच्या टीमला त्या क्रिमिन्सलना मारणे भाग पडले. असा रिपोर्ट मी तयार केलाय.

"असो; बरं मला एक सांग, तू अनुज्ञाच्या बाबतीत इतका हायपर का होतोस? म्हणजे मान्य, की तू तिच्यावर प्रेम करतोस, पण तरी तुझं तिच्याप्रती असलेलं ऑब्सेशन एक वेगळयाच लेवलच आहे." म्हणत चीफ हसला.

सूरज मात्र गंभीर झाला,

"बीकॉज शी इज माय स्ट्रेंथ! शी इज गॉड टू मी! म्हणूनच मला त्यांना गमवायचं नाही..." तो म्हणाला.

सूरजला ऐकून फ़ज़लही मग गंभीर झाला,

"सूरज, अरे तू तिच्यावर इतकं प्रेम करतोस हे जर आधी सांगितलं असतंस, तर मी तुझ्या वाटेतून दूर झालोच असतो. शिवाय तुला हवी ती मदत केली असती. पण तू काही बोललाच नाहीस. आणि सगळं समोर आलं, ते तसं... अरे, काही जरी झालं तरी आपण मित्रच तर आहोत. एकदा बोलला असतास यार..." फ़ज़ल म्हणाला.

"बोलत जा रे सूरज... बोलत जा! संवाद नसल्यानं अनेक गैरसमज निर्माण होतात. आणि त्या गैरसमजातून मग हे असं काही तरी उभं राहतं. तू आणि अनुज्ञानं पण आधीच बोलून गोष्टी सॉर्टआऊट केल्या असत्या, तर हे आम्हाला घडवावंच लागलं नसतं. पण त्यावेळीही तू मौन धरलंस. आणि तीही दूर राहिली. फ़ज़लनेही तुझ्याशी बोलून तुमच्यातला वाद मिटवायला हवा होता, पण त्याने पण चुकीचंच पाऊल उचललं. हा... नंतर हा सावरला खरा... एकंदर संवाद नसणं हा तुमच्या पिढीचाच दोष दिसतोय... बोलत जा!" चीफने खंत व्यक्त केली.

हे ऐकून सूरजला पुन्हा गहिवरून आलं...

"पण यामुळं माझा मित्र तर मला परत मिळाला!" सूरज चीफला म्हणाला व त्याने फ़ज़लकडे पाहिलं,

"मी चुकलो फ़ज़ल, मला माफ कर! तुझे खूप उपकार आहेत माझ्यावर...! बाकीच्या मित्रांची पण माफी मागावी लागेल. त्यांनाही दुखावलंय...!"

"परत असं काही बोललास, तर पुन्हा उचलून घेऊन जाईन तिला. आणि यावेळी परत पण करणार नाही हं!" फ़ज़ल वातावरण निवांत करण्यासाठी मस्करीत हसून सूरजला म्हणाला.

हे ऐकून सूरजला पण हसू आलं. भरलेल्या डोळयांनी तो हसला. फ़ज़लने स्मित करून सूरजला त्याच्याकडे ओढलं. दोघे कडकडून भेटले. दोघाच्यांही डोळयांच्या कडा पाणावलेल्या होत्या...

"माफीचं राहू दे. परत आलास, की सगळे मित्र मस्त ट्रिप प्लॅन करू." फ़ज़ल सूरजला म्हणाला.

शोएबनेही लहान मुलासारखी त्या दोघांना घट्ट मिठी मारली.

"सूरज, तुझ्या मित्रांसारखे मित्र शोधून सापडणार नाहीत. तू खूप लकी आहेस मुला. डोन्ट लूज देम!" चीफ हसत म्हणाला.

सूरजने फ़ज़ल व शोएबच्या मिठीतच समाधानी स्मित चेहऱ्यावर घेऊन होकारार्थी मान हलवली. त्याचे डोळे पाणावलेले होते... आणि तो गहिवरलेला...

## ०.१

सूरज अचानक झोपेतून जागा झाला. काहीवेळ गेल्यावर त्याला लक्षात आलं, की तो स्वप्न पहात होता. आणि... एक स्मित त्याच्या चेहऱ्यावर तरळलं. पण ते दुर्दैवी होतं, की समाधानी...?

त्याने बाजूच्या टेबलवरील मोबाईल उचलला. टेबलवर बाजूला "ज्ञानेश्वरी" होती. जवळच अनुज्ञाच्या लग्नाची पत्रिका पडलेली. सूरजने मोबाईल पाहिला. एक व्हॉईस-मेल येऊन पडलेला होता. सूरजने तो ऐकला... बोलणारा आवाज अनुज्ञाचा होता...

"तू पत्र वाचलंच असशील... तरी राहवलं नाही म्हणून व्हॉईस-मेल पाठवते. माफ कर. गिल्ट आहे म्हणून डिरेक्टली फोन करून तुझ्याशी बोलत नाही... पण मी जे करतीये... ते तुझ्याच भल्यासाठी... तू कशाच्याही मागे वाहवत जाऊ नयेस असं मला वाटतं. अगदी माझ्याही... व्यक्तीपेक्षा काम महत्त्वाचं हे लक्षात ठेव. कारण आपलं काम हे समाजाला प्रभावित करत असतं. आणि तुला हे समजावं म्हणूनच मला हेच करणं योग्य वाटलं... सॉरी... तू माफ करशील अशी आशा आहे..."

सूरज काही काळ शांतच बसला. या दरम्यान आपलं आयुष्य पुढं कसं जगायचं याचा त्याने पक्का निर्धार केला होता... अनुज्ञाची इच्छा तो कशी टाळू शकणार होता...

आपल्या पूर्व कल्पना, विचार, समज-गैरसमज, आस्था, विश्वास या सगळ्यांतून आत्ता सूरज खऱ्या अर्थाने जागा झाला होता! त्याच्या ईश्वरातून तो मुक्त झाला होता! आणि म्हणूनच त्याचं कर्तव्य, उत्तरदायित्व पार पाडण्यासाठी तो खऱ्या अर्थी योग्य झाला होता. आणि म्हणूनच इथून पुढे त्याचे कर्म हे 'विशुध्द' होणार आहे...! कारण पूर्वी जरी तो त्याचे कर्तव्य निरपेक्ष व निरिच्छ भावनेने पार पाडत असला, तरी तो कर्तव्यपूर्तीचं माध्यम म्हणून अनुज्ञाकडे पाहत होता आणि म्हणूनच तो दुःखात बुडाला होता; पण अनुज्ञाच्या निर्णयाने त्याचा भ्रम दूर केला... त्याला

समजलं, की त्याचे कर्म करण्यासाठी त्याला कोणत्याही साधनांनी आवश्यकता नाही! गरज असेलच, तर ती सातत्त्याच्या साधनेची आहे...

सूरजने  एक व्हॉट्सऍप ग्रुप उघडला. ग्रुपचे नांव होतं, 'फ्रेंड्स फॉरेव्हर!'

'सॉरी मित्रांनो! लेट्स मिट! पर्सनली सर्वांची माफी मागायची आहे... प्लिज... उद्या संध्याकाळी सहाला रेग्युलर रेस्टॉरंट...'

त्याने मग फ़ज़लला संबोधित करत एक मेसेज टाईप केला,

'फ़जल, भावा; माफ कर... मी आणि अनु एकत्र यावे म्हणून तू माझ्या मार्गातून दूर झालास. तसे मागील वर्षी तू बोललाही होतास मला... थँक्स भावा... प्लिज भेट...'

सूरजने असा मेसेज टाईप करून सेंड केला व व्हॉट्सऍप मधून बाहेर येऊन विकासला फोन लावला...

"हॅलो साहेब, गोडाऊन बंद करू नका. मी आजपासूनच तुमच्या फॅक्टरीतल्या कामगारांचे इन्वेस्टीगेशन चालू करतोय. डोन्ट वरी. एव्हरीथिंग विल बी फाईन...!"

सूरजने विकासचा फोन कट केला. दुसरा कॉल शोएबला लावला आणि त्याच्याशी बोलत बोलत सूरज त्याच्या त्या अंधाऱ्या रूममधून बाहेर पडला...

"शोएब, टीम तयार ठेव! पकडलेल्या माणसाला सोडून दे. लेट्स वर्क ऑन दि प्लॅन!" सूरज मोबाईलमध्ये शोएबला सूचना देत होता...

**समाप्त...!**

## काही महत्वपूर्ण -

ही कथा वाचून काही गैरसमज होण्याची शक्यता आहे म्हणून ही स्पष्टता. कृपया वाचावी ही विनंती...

सुरुवातीलाच स्पष्ट करू इच्छितो, की मी कोणत्याही धार्मिक वा तत्सम सामुदायिक व सांप्रदायिक विचारसरणीशी संलग्न किंवा प्रभावित नाही. कोणत्याही विशिष्ट धर्म-जाती-समुदायाला टार्गेट करण्यासाठी प्रस्तुत कथा लिहिली गेली नाही. परस्पर प्रेम व बंधुभाव दर्शवणे हा एकच या कथेचा मानस आहे. कोणाच्याही व कोणत्याही प्रकारच्या भावना दुखावण्याचा उद्देश नक्कीच नाही.

आपल्या समाजातील प्रत्येक घटकांतील आपापसात सर्वांमध्ये एकता, एकात्मता, बंधुता, समानता, सौदार्य, परस्पर आदर, प्रेम आणि उदारता टिकून रहावी याच विचारांतून आणि फक्त याच उद्देशाने ही कथा लिहिली गेली आहे. मी स्वतः देव मानत नाही, पण खूप लोक त्याला मानतात म्हणून तोही या कथेत अंतर्भूत होतो. गंमत म्हणजे ही कथा मी 'ज्ञानेश्वरी' वाचण्याआधी लिहिली होती. म्हणजे 2012 च्या जून महिन्यात आणि मी 'सार्थ ज्ञानेश्वरी' वाचली, ती 2012 च्याच नोव्हेंबर मध्ये. आणि मला हे पाहून खूप आश्चर्य वाटलं, कि मी जे या कथेत सांगू पाहतोय तेच तर या 'श्री ज्ञानेश्वरी' मध्ये आहे... म्हणून मग मी अनावश्यक सर्व श्लोक गाळून मी स्वतःला देऊ इच्छिणाऱ्या संदेशाशी एकरूप असलेलेच श्लोक मी बाजूला काढले व ते या कथेत अंतर्भूत केले आहेत. [स्वतःला समजवण्यासाठीच मी ही कथा लिहिली. कोणाला काही सांगण्या इतका मी मोठा नाही.]

जेव्हा माझ्या लक्षात आलं, की जे मी स्वतःला सांगू पाहतोय तेच ज्ञानेश्वरीमध्ये आहे आणि तेथेच मला स्पष्ट झाले, की ज्ञानेश्वरी वा भगवद्गीता हे ग्रंथ धार्मिक नाहीत, तर ते 'स्वतःचा शोध' आहेत. ही कथा 'कम्युनल' नाही हे मी आवर्जून व नम्रपणे सांगू इच्छितो. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या शेवटी जे 'पसायदान' मागितलं आहे, ते सकळ विश्वाच्या कल्याणासाठी आहे, विशिष्ट धर्म-जाती-मनुष्य-समुदायाच्या समृद्धीच साठी फक्त नाही. त्यामुळे मी ज्ञानेश्वरीकडे

कधीही धार्मिक दृष्टीकोनातून पाहत नाही. पाहतो, ते सर्वसमावेशक व असिमित ज्ञानाचे स्त्रोत म्हणून! म्हणूनच 'ज्ञानेश्वरी' किंवा 'श्रीमद् भगवद्गीता' माझ्यासाठी धार्मिक ग्रंथ कधीच नव्हते. आणि नसणार आहेत!

भगवद्गीता श्री कृष्णाने फक्त अर्जुनाला सांगितली नाही, तर ती समूळ व संपूर्ण मानवजातीला उद्देशून होती. तसाच इथेही सूरजला जो संदेश मिळाला तो त्याच्या एकट्यापुरता सीमित नाही, तर सर्वसमावेशक आहे व सर्वांना लागू होतो, मग कोणी कोणत्याही जाती-धर्माचा वा कोणत्याही क्षेत्रात काम करत असो...

आपण नीट पाहिलं, तर वरील नमूद ग्रंथांत कुठेच सांप्रदायिक धर्माचा उल्लेख नाही. तिथे धर्म हा 'सत्य' व 'कर्म निर्वाह' या अर्थाने येतो.

या ग्रंथांत सांगितलेले 'युद्ध' हे देखील 'सांप्रदायिक' किंवा 'हिंसक' युद्ध नाही. जरी ते धार्मिक असले, तरी इथे त्याचा उल्लेख व अर्थ प्रचलित धर्मांच्या अनुषंगाने येत नाही. इथं धर्म हा शब्द सत्य म्हणून येतो. पण सत्याच्या मार्गाने चालायचं म्हणजे नक्की काय? कारण सत्य तर व्यक्ती परत्वे बदलते... हो! म्हणूनच तर आपल्या विचारांना, इच्छांना, अभिलाषा, संकल्पनांना आणि संकल्पांना सद्सद्विवेक बुद्धीची जोड असावी. अशाने आपण चुकीच्या मार्गी जाणार नाही... हेच या ग्रंथांतून सिद्ध होते.

हे प्रस्तुत युद्ध आहे ते 'आंतरिक' युद्ध आहे. 'स्व'चा संघर्ष आहे. आणि हेच माझ्या कथेतून देखील प्रस्तुत आहे.

इतर धर्माचे धार्मिक ग्रंथ देखील 'प्रेम' व 'मानवता' यांचाच संदेश तर देतात, पण आपण नेहमी त्याचे आपल्या सोयीने व आपल्या फायद्यानुसार चुकीचे अर्थ लावतो. या संत - महापुरुषांना धर्म नको होते म्हणून तर ते धर्मांतून बाहेर पडले, पण लोकांनी त्यांच्याच नांवाने धर्म स्थापन केले. आणि त्यांच्या विचारांवर चालण्याचे सोयीस्करपणे विरून त्यांचीच पूजा बांधली. कारण हे करणं त्यांच्या विचारांवर चालण्यापेक्षा खूप सोपं गणित असतं...

आपण ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय पाहिला, तर त्यात असा उल्लेख आहे, की मूळ ज्ञानेश्वरीमध्ये नंतरच्या काळात खूप भेसळ झाली होती, ती एकनाथ महाराजानी नंतर निर्दोष केली. यावरून हे लक्षात येतं, की भगवद्गीतेत देखील कोणी मुद्दाम धार्मिक गोष्टी नंतर घुसवल्या असाव्यात अशी शक्यता नाकारता येत नाही. शिवाय एकनाथ महाराजांच्या नंतर पुन्हा कोणी ज्ञानेश्वरी सदोष करण्याचा प्रयत्न केला असण्याची संभावनाही नाकारता येत नाही. माझ्यासाठी मात्र हे ग्रंथ 'आचार-संहिता' आहेत. म्हणून मी यांतील फक्त 'कर्मयोग' व काही अंशी 'सांख्ययोग्य' यावरच विश्वास ठेवतो व त्यातील मला आवश्यक तेच आणि तेवढंच एकत्र केलं आहे या कथेत... बाकी सर्व धार्मिक बाबी मी वगळल्या आहेत. ज्या मुळात मलाच रुचत नाहीत.

काही संवादातून ही कथा जातीय वगैरे भासेल कदाचित, पण ते तसे नाही...

उदाहरण द्यायचे झाले, तर जेव्हा सूरज फ़ज़लला म्हणतो, की...

"एका मराठी माणसाला चॅलेंज केलंयस तू फ़ज़ल! मराठा कधीच हारत नाही!"

तेव्हा फ़ज़लही त्याला म्हणतो, की...

"ऐसा है, तो मैं भी मराठाही हूँ! चल आ! देखते है किसमें ज्यादा दम है!"

तर हे संवाद कोणत्याही सांप्रदायिकतेतून उद्धृत होत नाहीत, तर येथे दोघे आपली इंडिव्हिज्युएलिटी (स्वतंत्र व्यक्तित्व) स्पष्ट करत आहेत. फ़ज़ल जरी मुस्लिम असला, तरी तो महाराष्ट्रीयन असल्याने स्वतःला 'मराठा' म्हणवतो आणि हेच सूरज देखील करतोय. याचा कोणताही धार्मिक वा सांप्रदायिक उद्देश व अर्थ नक्कीच नाही... हे ते कोणत्याही धार्मिक भावनेतून बोलत नाहीत. माझे बरेच मुस्लिम मित्र आहेत, अनेक ख्रिश्चन्स व इतर जाती-धर्माचे लोक देखील ओळखीचे आहेत. त्यांचे आपल्या देशावर किती प्रेम आहे व आपल्या जवळील इतर धर्मीय लोकांची ते किती काळजी घेतात, कसे एकमेकांची आस्था जपतात हे मी पाहतो. सर्वच जण परस्पर वेगळया धर्माचे असले, तरी भारतातील प्रत्येकासाठी ते रहात असलेली भूमी सर्वप्रथम आहे हे नेहमी पाहिलं आहे. आणि हाच हेतू ठेऊन ही कॅरेक्टर्स ठराविक धर्माची दाखवली आहेत. यातून हेच स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे, की आपण सर्वांनी आपले सांप्रत सर्व भ्रम त्यागून

एकमेकांना सांभाळून, सावरून पुढं जायचं आहे. तरच आपण एक उत्तम समाज निर्माण करू; जो सर्वांनाच राहण्यासाठी योग्य असेल... यानेच तर भारताची व्याख्या स्पष्ट होते.

मला या संवादांबद्दल शंका वाटत होती, की तत्सम संवाद काढावेत का? कारण त्याने गैरसमज उभा होण्याची शक्यता मला वाटत होती. पण शेवटी तसेच राहू दिले. त्यांतून कोणताही चुकीचा संदेश पोहोचवणे हा हेतू नाही, तर त्यातून आपण सर्व समावेशक व धर्मनिरपेक्ष बनलं पाहिजे हेच सांगण्याचा प्रयत्न केला आहे खास... कारण सूरज हिंदू, शोएब व फ़जल मुस्लिम तर ऍरन गोम्स ख्रिश्चन आहेत. दोन वेगळया धर्माचे लोक एकत्र येऊन एका धर्मातील व्यक्तीला त्याच्या विषदात बुडून नष्ट होण्यापासून त्याला प्ररावृत्त करतात. आपला भारत अशाच तर आहे. एकाच्या संकट समयी दुसरा पुढे येतो. आणि तसे होत नसेल तो यावा हीच सद्भावना आहे या कथेची. आपण एकत्र एकमेकांना आधार देऊन जगलं पाहिजे हेच अप्रत्यक्ष यातून दिसतं. भारतच नाही, तर जगभरातील सर्वजण न भांडता एकत्र रहावेत हाच माझा व या कथेचाही मानस आहे. हे नक्कीच वाचकांच्या लक्षात आले असेल...

कथेत पुढे सूरज म्हणतो, की...

"हो पण सत्य माझ्या बाजूने आहे! आणि; सत्य आणि मराठा, हे कॉम्बिनेशन खूप डेंजरस असतं!"

यातून हेच अधोरेखित होतं, की सूरज फ़ज़लला त्याच्यापासून वेगळा समजत नाही, तर फ़ज़ल जे करतोय ते चुकीचं आहे हे फ़ज़लला समजण्यासाठी सूरज वरील वाक्य उच्चारतो. इथेही हे कोणताही सांप्रसायिक विचारातून आलेले नाही हे मी अधोरेखित करू इच्छितो. दुसरं म्हणजे हे वाक्य मला यासाठीही महत्वपूर्ण वाटतं, कारण छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन देखील यातून करण्याचा विचार होता... महाराज सत्याच्या बाजूने लढले आणि म्हणून ते देशहित, प्रजाहित साधू शकले व आपल्या शत्रूंना हरवू शकले. हे देखील वरील वाक्याने स्पष्ट करायचं होतं. महाराज कधीच विशेष धर्माविरुद्ध लढले नाहीत, तर ते वाईट प्रवृत्ती विरुद्ध लढले हे आपण ठासून लक्षात घेतलं पाहिजे आणि या विचारातून वरील काही संवाद आलेले आहेत. मी पुन्हा

आपणास विश्वास देतो, की कोणत्याही धार्मिक व सांप्रसायिक विचारांतून हे लिहिलं गेलेलं नाही. सर्वांमध्ये समता व बंधुता रहावी हीच सदिच्छा आहे...

आणखी एक उदाहरण द्यायचे तर, सूरजला जेव्हा अनुज्ञाच्या किडनॅपिंगमध्ये फ़ज़लचा हात आहे असे समजते, तेव्हा तो स्वामींच्या मंदिरात धाव घेतो व पुजाऱ्याला बोलतो,

"कर्म-कर्तव्य या उंबरठ्यावर घेऊन येईल असं वाटलं नव्हतं. आज पुन्हा मला माझ्याच माणसांविरुद्ध लढावं लागणार आहे. मी ढळू नये म्हणून स्वामींचा आशीर्वाद हवाय!"

तो निलेशशी बोलताना पण फ़ज़ल, अनु, त्याचे इतर मित्र यांना "माझी माणसं" म्हणूनच संबोधित करतो. यातून तो कोणालाच आपल्यापासून वेगळं समजत नाही हे स्पष्ट होतं. आणि हेही स्पष्ट होतं, की तो सांप्रदायिक विचारसरणीचा नाही!

मी स्वतः धर्मनिरपेक्ष आहे. वास्तवत: मी धर्म त्यागलाच आहे. कारण सुजाण व सर्व बाजुंनी निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी आणि तो समाज एकत्रित बांधून टिकवण्यासाठी ज्या धर्माचा उपयोग होत नाही. तो धर्म नसलेलाच बरा हे नक्की! शिवाय प्रचलित धर्म आपल्याला बळ देण्याचे काम करत नाही, तर बळहीन, बुद्धीहीन व अविवेकी बनवतो आणि याची चित्रंही आपण वेळोवेळी पाहत आलोय... मग तो धर्म कोणताही असो...

आपल्या कथेत वापरलेला 'धर्म' हा शब्द 'सत्य', 'कर्तव्य' व 'कर्म पालन' याच्याचसाठी समानार्थी म्हणून वापरला आहे. आणि तसाच तो भगवद्गीता व ज्ञानेश्वरी मधून देखील याच अर्थाने येतो.

आता हा प्रश्न पडतो, की माझे कर्म काय? माझं कर्तव्य काय? आणि ते कसं ओळखायचं? एक तर आपल्याला एक 'जबाबदार नागरिक' बनायचं आहे एवढं जरी लक्षात ठेवलं, तरी काम पुरेसं आहे आपलं कर्तव्य काय हे समजण्यासाठी. शिवाय येथेच तर विवेकबुद्धी मदत करते. म्हणून स्वतःच्या सद्सद्विवेक बुध्दीवर विश्वास ठेवावा. पण विवेकबुद्धी देखील आपल्याला योग्य मार्ग तेव्हाच दाखवते, जेव्हा आपण आपल्या आसपासच्या परिस्थितीचा सतत सर्वांग अभ्यास करत राहू... याला आपण विवेकबुद्धीचं पॉलिशिंग म्हणू शकतो.

कथेतील पात्रांच्या विषयी थोडंस. या कथेतील पात्रं ही जे काही चूक - बरोबर वागतात, ते मानवी भावनांच्या प्रभावाखाली येऊन. ना की कोणत्याही सांप्रदायिक विचारांतून. यांच्या नांवांची देखील खूप गंमत आहे. माझ्या सगळयाच कथांमधील नांवे ही त्या कथेचे सार असतात. तसेच इथेही आहे.

'सूरज' व 'अनु' यांच्या नांवाचा संबंध तर कथेतच स्पष्ट केलाच आहे... की 'अनु हा सूर्याचा (सूरजचा) शक्तीस्रोत...'

'फ़ज़ल' म्हणजे कृपा; जी फ़ज़ल सूरजवर करतो. त्याचे आडनांव 'अब्दुल्ला' याचा अर्थ 'अल्लाहचा बंदा''अल्लाहचा सेवक' असा होतो. फ़ज़लकडे पाहिलं तर तो आपल्या आडनांवाला किती जागतो हे स्पष्ट दिसून येत नाही का? तो आधी सूरजबद्दलच्या रागाने चुकीचे पाऊल जरी उचलतो, तरी शेवटी सूरजची खालावणारी अवस्था पाहून त्याच्या मनात सूरज विषयी करुणा, प्रेम उत्पन्न होते, जे आधीपासून सूरजबद्दल त्याच्या हृदयी होतंच! आणि म्हणूनच तो अनु व सूरज यांच्या मार्गातून दूर होतो. शिवाय तो शिंदे नामक त्याच्या इम्प्लॉईला आपल्या वडिलांच्या जागी ठेवतो. फ़ज़लचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. यावरून फ़ज़ल देखील धार्मिक व सांप्रदायिक विचारसरणीचा नाही हेच दिसतं!

आता 'शोएब'चा अर्थ पाहू; त्याचा अर्थ असा आहे, की 'जो योग्य मार्ग दाखवतो'. जे त्याने सूरजच्या बाबतीत केलं. शिवाय समृद्धी, सतत विजयी असणारा, विनम्र व सर्वांत चांगला असेही काही अर्थ होतात या नांवाचे. शोएब असाच नाही का?!

मग उरतो 'ऍरन!' या नांवाचा अर्थ पाहू. बायबल, कुराण व हिब्रू बायबलच्या म्हणण्यानुसार हे प्रोफेट म्हणजे देवाचे प्रेषित आहेत. प्रेषित हे नवीन सिद्धांत व तत्वज्ञान समाजात रुजवण्यासाठी सत्याचे व चांगल्याचे संदेष्टा म्हणून येत असतात. प्रोफेट ऍरन हे प्रोफेट मुसाचे भाऊ आहेत. ऍरन या नांवाचा अर्थ एक उंच पर्वत, शक्तीचा पर्वत, उदार, उन्नत, उच्च पदावर असलेला, ज्ञानी, प्रबुद्ध व लोकभ्रमापासून दूर असलेला असा आहे. ऍरनकडे पाहून तो असाच आहे हे नक्कीच जाणवते! ऍरन ख्रिश्चन असून सूरजला आपल्या मुलाप्रमाणे मानतो, ते सूरजची कर्तव्यनिष्ठा पाहून. सूरज

देखील ऍरनला मान देतो, तो फक्त त्याचा बॉस आहे म्हणून नाही, तर ऍरनच्या मनातून सूरज विषयी स्रवणारे प्रेम व  ऍरनची कर्तव्यनिष्ठा पाहूनच. या दोघांमध्ये कुठेच धर्म डोकावत नाही. आता ऍरन या पात्राला हे नांव किती चपखल बसतं पहा बरं.

आणि 'सूरज'चा अर्थ तर सर्वांना माहीत आहेच. सूरज हे मूळ नांव हिंदू धर्मात अधिक वापरलं जातं. याचा अर्थ 'सूर्य' आहे जो स्वतः जळतो, पण जगाला प्रकाशमान करतो. देवपुत्र असाही या नांवाचा अर्थ होतो. आपल्या कथेतील सूरज असाच तर आहे... नाही?! वास्तविक या पात्राचं नांव आधी 'भास्कर' असं होतं, पण 'अनु-सूरज' यांच्या नांवांचा संबंध स्पष्ट करण्यासाठी व फॅक्टरी मधील "सूरज अगर जल सकता है, तो जला भी सकता है!" या वाक्याचा अर्थ स्पष्ट व्हावा या दोन कारणांसाठी भास्कर हे नांव बदलून 'सूरज' केलं, कारण सूरज हे सूर्याचे नांव भास्करपेक्षा अधिक प्रचलित आहे व त्यामुळे या दोन गोष्टी वाचकांच्या पटकन लक्षात येतील असा माझा समज...

अनुज्ञाचा अर्थ 'अनुमती' वा 'आज्ञा'. आणि कथेत अनुज्ञा सूरजला त्याचा राग, लोभ, द्वेष, मोह, आशा, दुःख इ. सर्व दुर्गुण झुगारून देऊन त्याचं कर्तव्य पार पडण्याची आज्ञाच तर देते!

यासर्वांमुळे आपल्या कथेचं असलेलं "अ प्योर् वन!" हे नांव आपल्या प्रत्येक पात्राला अनुरूप ठरतं. आहे की नाही गंमत...!

ही कथा लिहिली त्यावेळी मी स्वामी समर्थांना मानायचो व मी देखील दिवस-दिवसभर तेथे मंदिरात बसून असायचो, पण नंतर मलाच माझी चूक लक्षात आली आणि मी स्वतःला काही गोष्टी सांगण्यासाठी म्हणून ही कथा लिहिली. [दैववादी तर मी कधीच नव्हतो, पण जेव्हापासून तर्क संगत विचार करायला लागतो, तेव्हा देव देखील त्यागला. तो आहे - नाही हा प्रश्न नाही. [मी तर्काधिष्टित असल्याने आता माझ्यासाठी देव नाहीच.] माझं असं ठाम मत आहे, की 'देव ही माणसासाठी नेहमीच प्रेम करण्याची नाही तर घाबरण्याची गोष्ट आहे...' पण जे देवावर विश्वास ठेवतात त्यांनी हे लक्षात घ्यावे, की देव जर असेल, तर तो प्रेम करण्यासाठी आहे ना की त्याला घाबरण्यासाठी... त्यामुळे धर्माच्या व देवाच्या नांवाने काही चुकीचे करणे व  आपणच बनवलेल्या

धर्म संज्ञेने आपल्या अन्यायी कृत्यांचे समर्थन करणे हे कधीच योग्य नाही. मग त्यापेक्षा असा देव व धर्म नसलेलाच बरा!

'देव हे माणसाचे आपल्या चुका लपवण्यासाठीचे साधन आहे' असं मला वाटतं, म्हणून तर महान पुरुषांना देखील लोक देव करून टाकतात. कारण कोणी म्हणटलंच, की 'तू अमुक व्यक्तीला इतका माणतोस तर त्याच्या सारखा वागत का नाहीस?' तर तेव्हा, 'ते तर देव आहेत म्हणून त्यांना जमले आपण कोण?' ही पळवाट तयार झालेली असते.

मी नास्तिक आहे, मी देवाला नाकारलं ते त्याने माझं काही वाईट केलं आहे असं मला वाटतं म्हणून नाही, तर हा प्रवास माझा आहे आणि तो मला एकट्याच्या जीवावरच चालायचा आहे इतका साधा विचार आहे. मग मी त्यात जिंकेन किंवा हरेन माझ्यासाठी ते महत्वाचं नाही... यश-अपयश माझं स्वतःचं असावं. त्यात देवाचा कोणताही अंतर्भाव नसावा असं मला वाटतं आणि म्हणूनच मी देव नाकारला आहे. पण मी जे ठरवलं आहे... ते पूर्णत्वास नेण्याचा मी पुरेपूर प्रयत्न करेन हा मी स्वतःला दिलेला विश्वास मला सार्थ करायचा आहे... पण जे करायचं आहे, ते नाही झालं, तरी दुःखात बुडून जायचे नाही हेच मी स्वतःला सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आणि हे सगळं मी या कथेत एकत्र करण्याचा यत्न केला आहे, कारण हे मी कधी विसरू नये असे मला वाटते...

आता थोडं शेवटाबद्दल बोलतो... मला माहित आहे शेवट बऱ्याच जणांना आवडणार नाही. सर्वांनाच शेवट 'गोड' हवा असतो, पण तसा तो नेहमी होतो का? तर नाही. पण म्हणून आपण आपले कर्म त्यागायचे का? तर नाही! हे कोणत्याही गहन प्रश्नाचे व कोणत्याही मोठ्या दुःखावरचे साधे उत्तर आहे. आणि हे अधोरेखित करण्यासाठी शेवट असा करणं मला क्रमप्राप्त होतं...

मी अनेक अशा लोकांना ओळखतो, ज्यांना एखाद्या फळाची शाश्वती आधी हवी असते, मग ते काम करायचं की नाही ठरवतात... एखाद्या कृतीचे फळ तुम्हाला मिळणार की नाही आधीच स्पष्ट झालं असतं, तर प्रयत्न नांवाची गोष्ट अस्तित्वात तरी असती का?!

आणि भविष्य कोणाला कळलंय? मी ते मानतही नाही. आपल्या कर्माने ते निर्माण होत असतं. एवढं साधं गणित आहे! म्हणूच 'कर्म' व 'कर्तव्य निर्वाह' महत्वाचे! पण दुसऱ्या बाजूने विचार केला, तरी भविष्य माहीत नसूनही आपल्याला आपले काम करावेच लागते हे अनेकांच्या लक्षातच येतं नाही. यश-अपयश आपल्या हाती नाही. फक्त काम करणं, कष्ट करणं इतकाच आपला काय तो कार्यभाग! हे अशा लोकांना समजावे म्हणून देखील ही कथा आहे आणि त्यामुळेच शेवट असा आहे! आपल्याला मनोवांच्छित फळ मिळो न मिळो आपल्याला आपली कर्म-कर्तव्ये पार पाडायची आहेत आणि तेही दुःखं न करता! आणि हेच कथेच्या शेवटी सूरज करतो. तो आधीही ते करत होता, पण असिमीत दुःख हृदयात साठवून. पण शेवटी त्याचे दुःख नष्ट होते व तो निर्मोही होतो. तो निष्काम कर्म करण्यास प्रवृत्त होतो! आणि खऱ्या अर्थाने त्याचे कर्म आता निर्भेळ होते! हा कथेचा सार आहे...!

आता आपल्याला समजलं असेल, की ही कथा माझ्या अत्यंत जवळची का आहे ते... शेवटी एवढेच म्हणायचे आहे, की आपण कोणत्याही व्यक्ती, समुदाय, विचार, धर्म, ईश्वर, इ. तत्सम गोष्टींच्या मागे वाहवत जाऊ नये. आपल्या विवेकबुद्धीची कास धरावी. याने आपण दैनंदिन कर्म करताना कधीच चुकणार नाही! असो! आपल्याला कथा आवडली असेल असे गृहीत धरतो... इति...!

**आभार!!!**

**ई साहित्य प्रतिष्ठानचं बारावं वर्षं. सुरज गाताडे यांचं ई साहित्यवरचं अकरावं पुस्तक.**

सत्तावीस महिन्यांत नऊ पुस्तकं. प्रत्येक पुस्तक वेगळं. प्रत्येक पुस्तकाचा वेगळा विषय, वेगळा बाज, वेगळी मांडणी. प्रत्येक पुस्तक सुपरहिट. आता तर त्यांचा स्वतःचा असा एक फॅन ग्रुप हजारांच्या घरात गेलेला आहे. पंधरा मे २०१७ ला जेव्हा त्यांनी आपलं पहिलं पुस्तक प्रकाशनासाठी पाठवलं तेव्हा "प्लीज किमान एकदा वाचून घ्या!!!" अशी विनंती केलेली होती. लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. तेव्हा सूरज यांची ही विनंती साहजिक होती. त्यांना या दुष्टचक्रातून बाहेर पडायचं होतं. अशा लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य.

ई साहित्य प्रतिष्ठान

लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?